


बालशिक्षण विशेषांक

'स्व'-रूपवर्धिनी

# पाकोळी

## रौप्य महोत्सवी वर्ष

बाळे आम्ही छोटी छोटी, आमुच्या हाती शक्ती मोठी
चिमण्या आमुच्या हातांना, काम हवे हो काम हवे
रंगीत सुंदर जग हे भवती, जे जे सुंदर ते ते बघती
सदैव आमुच्या डोळ्यांना, काम हवे हो काम हवे

# ‘स्व’ - रूपवर्धिनी म्हणजेच

सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था

* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था

* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार

* विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा


* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक ‘राष्ट्रीय प्रकल्प’

* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था

* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## ‘पाकोळी’ रौप्य महोत्सवी बालवाडी विशेषांक



### अंतरंग


१) संपादकीय

२) प्रस्तावना

३) पाकोळीचे फुलपाखरू होताना...

४) मखमली पंख

५) मुले बदलली आपण बदलू या

६) मातृभाषेला बनवा ज्ञानभाषा

७) संस्काराची अष्टपदी

८) घरची आणि शाळेतली भाषा

९) मनोगते

१०) आवाहन





**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादन सहाय्य**

प्रा. संजय तांबट

**संपादकीय मंडळ**

श्री. सुनील कुलकर्णी

सौ. मंजुषा कुलकर्णी

श्री. गणेश पवार

कु. अहिल्या धायगुडे

**मुखपृष्ठ**

श्री. आशिष नडे


या अंकातील प्रत्येक पानावर तळटीपांतून
‘शिक्षणतज्ज्ञांची मार्गदर्शक वचने’ सादर केली आहेत.

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी


## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर * श्री. प्रमोद चौधरी * श्री. प्रतापराव पवार

### संस्थापक सदस्य

- कै. पु. व. श्रॉफ
- कै. कृ. ल. पटवर्धन
- कै. कां. गि. शहा
- कै. दत्तोबा तांबे
- कै. अ. न. गोगावले
- श्री. कृ. गो. लवळेकर
- श्री. रा. प. देसाई
- श्री. श्री. शं. सामळ

### विद्यमान कार्यकारी समिति

*अध्यक्ष*
*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

*उपाध्यक्ष*
*श्री. उदय गुजर*
*श्री. आर. ए. मेहता*
*श्री. श्रीकांत सामळ*

*कार्याध्यक्ष*
*श्री. कल्याण वर्दे*

*सहकार्याध्यक्ष*
*श्री. शिरीष पटवर्धन*
*श्री. रामभाऊ डिंबळे*

*कोषाध्यक्ष*
*श्री. कन्हैयालाल बलदोटा*

*सहकोषाध्यक्ष*
*श्री. विलास कुलकर्णी*

*कार्यवाह*
*श्री. ज्ञानेश पुरंदरे*

*सहकार्यवाह*
*श्रीमती पुष्पाताई नडे*
*श्री. विश्वास कुलकर्णी*
*श्री. अमोल उंदरे*

### सदस्य

- श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी
- श्री. अरविंद केळकर
- श्री. विनोद बिबवे
- कु. लता टिळेकर
- सौ. बागेश्री पोंक्षे
- प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर
- डॉ. प्रदीप आगाशे
- श्री. संजय तांबट
- डॉ. विनेश नगरे
- श्री. किशोर सोंडूर
- श्री. अविनाश जोशी
- श्री. अजय कदम
- श्री. सुनील कुलकर्णी
- सौ. मेघना अत्रे
- श्री. पराग लकडे
- ॲड. सौ. निलिमाताई गोखले



**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**

**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६०**



संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६



**PAN No. : AAATS 5461K**

**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**



भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)

ई-मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

## संपादकीय




पाकोळीची 'प्रेरणा' – किशाभाऊ

**पाको**ळीला बघता बघता पंचवीस वर्षे होऊन गेली. ज्यांनी ज्यांनी पाकोळी रुजवण्याकरिता, फुलवण्याकरिता आणि तिला खुलवण्याकरिता गेली २५ वर्षे अखंड आणि अथक परिश्रम घेतले त्यांच्याबद्दल काय म्हणावे...!

एवढेच म्हणतो, जे आहे ते शब्दांच्या पलीकडले आहे.

हां, एक मार्ग आहे. 'पाकोळी' भरताना किंवा सुटताना वर्धिनीत या. पाकोळ्यांचे निरागस डोळे पहा. शब्दांच्या पलीकडची सगळी ओळख पटेल.

खरं म्हणजे पुढच्याच पानावर वर्धिनीच्या पहिल्या बारा जणांच्या गटातले प्रा. संजय तांबट यांची वर्धिनीचं सारं मर्म सांगणारी अन् स्व. किशाभाऊंचं मनोगत उलगडणारी अप्रतिम प्रस्तावना आहे. संपादकीय भावनांचं प्रतिबिंबही त्यातच उमटलं आहे.

❖ ❖ ❖

### प्रस्तावना

## एका 'पाकोळी'ची पंचविशी

**'स्व'**-रूपवर्धिनीची 'पाकोळी' पंचवीस वर्षांची झाली. या बालवाडीतून गेल्या पंचवीस वर्षांत असंख्य पाखरं पंखात बळ घेऊन उडाली आणि ती आज आकाशात स्वच्छंद विहरत आहेत. तरीही नव्यानं दाखल होणाऱ्या बालक-बालिकांना तितक्याच आपुलकीनं आनंदी, आशेनं भरलेल्या जगाचे धडे देण्याचं काम तितक्याच उत्साहानं सुरू आहे.

'ताई, नमस्ते !'

वर्धिनीच्या मंगळवार पेठेतल्या वास्तूत शिरताना बालवाडीच्या मुलांच्या स्वागतासाठी उभ्या राहणाऱ्या हसतमुख पुष्पाताई आणि त्यांच्या इतर सहकारी शिक्षिका हे रोजचंच दृश्य. केवळ मुलंच नाहीत, तर त्यांचे आईबाबा आणि संस्थेत येणारे कार्यकर्ते व युवकयुवतीही हा प्रसन्नतेचा शिडकावा अनुभवतात. त्यातून रोज थोडं का होईना वाढायचं - मोठ्ठं व्हायचं, असं मनाशी ठरवत वर्धिनीतल्या छोट्या पाकोळ्यांसह अनेकांचा दिवस सुरू होतो.

स्वर्गीय किशाभाऊ पटवर्धन सरांनी १३ मे १९७९ रोजी 'स्व'-रूपवर्धिनी सुरू केली, तेव्हा समाजात सर्वत्र विखुरलेली गुणवान मुलंमुली एकत्र करून त्यांच्या विकासाला पूरक वातावरण तयार करण्याचं स्वप्न त्यांच्या नजरेपुढं होतं. पाचवी ते दहावीच्या मुलांच्या रोजच्या शाखेपासून सुरू झालेलं हे काम पुढे अनेक अंगांनी विस्तारलं, त्यात 'पाकोळी' बालवाडी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

किशाभाऊंना माणसांची उत्तम पारख होती आणि आपल्या कामासाठी कोणाचा कसा उपयोग होईल, हे त्यांना चटकन समजत असे. चांगल्या कामासाठी समाज पैसा कमी पडू देणार नाही, पण समाजानं दिलेल्या पै न् पैचा पुरेपूर परतावा आपण समाजाला दिला पाहिजे, याचं भान त्यांना होतं. त्यामुळेच मंगळवार पेठेत वर्धिनीची दुमजली वास्तू उभी राहिली, तेव्हा ती दिवसाचे चोवीस तास वापरात राहिली पाहिजे, यासाठी ते प्रयत्नशील होते. या टप्प्यावर स्वर्गीय नाना जोशी आणि पुष्पाताई या गुरूशिष्यांचा वर्धिनीत प्रवेश झाला. त्यावेळी अनेक कामांची रुजवात झाली, त्यात बालवाडी महत्त्वाची होती. वर्धिनीच्या आवारातील फुलझाडांची जपणूक करणाऱ्या पुष्पाताईंनी परिसरातल्या अनेक उमलत्या कळ्यांना फुलण्यासाठी मदत करावी, हे किशाभाऊंनी सुचवलं. त्यातूनच 'पाकोळी'ची सुरुवात झाली. जे नातं भारतात बालवाडीची सुरुवात करणाऱ्या गिजुभाई बधेका आणि ताराबाई मोडक यांच्यामध्ये होतं, तसंच ते कदाचित किशाभाऊ आणि पुष्पाताईंमध्येही होतं. किशाभाऊंचं बालवाडीला सतत प्रोत्साहन राहिलं आणि त्यासाठी ते सतत नव्या कल्पनाही सुचवत राहिले.

'पाकोळी' सुरू होण्यापूर्वी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी मंगळवार आणि लगतच्या पेठांमध्ये एक पाहणी केली होती. त्यात अनेक मुलंमुली शाळेत न जाण्याचं एक प्रमुख कारण त्यांच्याकडे जन्मतारखांचा दाखला नाही, हे पुढे आलं. त्यावर उपाय म्हणून बालवाडी सुरू केली, तर या समस्येची तीव्रता कमी होईल. दाखले मिळवण्यासाठी पालकांना मदत करता येईल आणि शिक्षणाच्या प्रवाहात ही मुलंमुली दाखल होऊ शकतील, असाही विचार झाला. समाजातल्या सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोचलं पाहिजे, तो त्यांचा हक्क आहे, हा 'सर्व शिक्षा अभियाना'मागचा मूलभूत विचार पाकोळी सुरू करताना प्रबळ होता.

'पाकोळी'चे वैशिष्ट्य हे की, या बालवाडीच्या निमित्ताने मुलांचं कुटुंबच वर्धिनीच्या संपर्कात आलं. त्यातून वर्धिनीत महिलांसाठीच्या विविध उपक्रमांची सुरुवात झाली. वर्धिनीच्या महिला विभागाची मुहूर्तमेढ 'पाकोळी'मुळे रोवली गेली. शिकायला येणारी मुलंमुलीच नाहीत, तर त्यांचं घर, परिसर हा शिक्षणाचा अविभाज्य भाग असतो. त्यामुळं मुलांच्या विकासासाठी त्यांच्या शैक्षणिक परिसरातही पोषक बदल झाले पाहिजेत, याची जाणीव त्यातून झाली.

वर्धिनीची बालवाडी परिसरातील इतर बालवाड्यांपेक्षा वेगळी ठरते, ती तिच्या उपक्रमशीलतेमुळे. पुष्पाताई, कमलताई, स्वातीताई आणि इतर अनेक शिक्षिकांनी ही प्रयोगशीलता जपली. आषाढी वारीची निघणारी दिंडी ही परिसरात कुतूहलाचा विषय बनली. तसंच, इतक्या लहान वयातील मुलांचा गणेश विसर्जन मिरवणुकीतील सहभाग हाही चर्चेचा विषय बनला. एक वेळ मोठी मुलं दमतील; पण या बालचमूच्या उत्साहाला ओहोटी नसते. बालवाडीच्या वर्गांतील नेहमीच असणारं उत्साही, खेळकर वातावरण. मुलांना वाट्टेल ते करण्याची मुभा. यातून त्यांचं शिक्षण आनंदी आणि सहज होतं. या साऱ्याला आणखी बळ यावं, म्हणून बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गही वर्धिनीत सुरू झाला. त्यातून पाकोळीतल्या शिक्षणपूरक उपक्रमांना आणि साधननिर्मितीला आणखी बळ मिळालं.

'पाकोळी'तून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर नावाजलेल्या शाळांमध्ये पहिलीत प्रवेश मिळेल का, अशी शंका सुरुवातीच्या दिवसांत व्यक्त होत असे. पुष्पाताई काही काळ या शाळांमध्ये हिंडून आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी प्रयत्न करत असत. पण या नामांकित शाळांमध्येही 'पाकोळी'तून आलेल्या मुलांची गुणवत्ता, शिस्त वेगळेपणानं उठून दिसत होती. त्यामुळे या शाळा वर्धिनीच्या मुलांना प्रवेशासाठी प्राधान्य देऊ लागल्या. पुढे बालवाडीपासूनच इंग्रजी माध्यमातील शाळांकडे पालकांचा ओढा वाढल्यावर तर वर्धिनीची ही मराठी माध्यमातील बालवाडी अनेक मराठी शाळांच्या आशेचा आणि आधाराचा विषय बनली.

बालवाडीतून बाहेर पडलेली हुशार, चुणचुणीत मुलंमुली नंतरही वर्धिनीच्या संपर्कात रहावीत, अशी पुष्पाताईंची इच्छा होती. त्यातून अभिमन्यू बालशाखा वर्धिनीच्या वास्तूतच सुरू झाली. पहिली

ते चौथीतली ही मुलंमुली उत्साहानं पुन्हा वर्धिनीत रमू लागली. त्यातली काही पुढे रामकृष्ण, निवेदिता शाखांवर जाऊ लागली. त्यातून बालवाडीपासून ते पदवीशिक्षणापर्यंत वर्धिनीशी सतत आपुलकीचा धागा जोडलेली अनेक मुलंमुली उभी राहिली.

'पाकोळी'तून शिकून मोठ्या झालेल्या काही विद्यार्थ्यांची मनोगतं या विशेषांकात आहेत. आजीमाजी शिक्षिका, आजीमाजी पालक यांनीही मोकळेपणानं त्यांचे वर्धिनीविषयीचे आपलंपण व्यक्त केलं आहे. पुष्पाताईंच्या लेखनातून पाकोळीचा आजवरचा प्रवास एखाद्या चित्रपटाप्रमाणे डोळ्यांपुढे उभा राहतो. पण हा फक्त 'पाकोळी'पुरता मर्यादित विशेषांक नाही, तर बालशिक्षणाच्या सध्याच्या स्थिती आणि गतीची चर्चाही त्यात करण्यात आली आहे.

काळ सतत प्रवाही असतो. इतर गोष्टींप्रमाणे बालशिक्षणातही काळानुसार बदल होणं अपरिहार्य आहे. रमेश पानसे सरांनी बालशिक्षणाविषयी मांडलेले विचार नुसते मननीय नाहीत, तर ते आग्रहानं कृतीत उतरवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. 'मुले बदलली, आपणही बदलुयात' हे त्यांच्या लेखाचे सूत्र आहे. अनेक वर्षे 'लहान मूल म्हणजे मातीचा ओला गोळा, त्याला हवा तसा आकार देता येतो,' अशी कल्पना बालशिक्षणाच्या केंद्रस्थानी होती. त्यात आता बदल होत आहे. मोठ्यांप्रमाणेच लहान मुलांनाही त्यांचे त्यांचे व्यक्तिमत्त्व असते. त्यांचा आनंद, कल्पनाशक्तीची झेप मोठ्यांपेक्षा निराळी असते. आणि इतर कोणी घडविण्यापेक्षा मूल स्वत:च स्वत:ला घडवत असते, ही कल्पना आता सर्वत्र रुजत आहे. या कल्पनेमुळं केवळ बालशिक्षणच नव्हे, तर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणातही क्रांतिकारक बदल होत आहेत. याची जाणीव यानिमित्ताने आपल्याला झाली, तर हवी आहे.

शिक्षणाचं माध्यम म्हणून मातृभाषा मराठीला मागं ढकललं जात असून, इंग्रजीतून शिक्षणाचं अवडंबर माजवले जात आहे. त्यासंबंधी डॉ. माधवी वैद्य यांचा लेख वेगळी समज देणारा आहे. 'अक्षरनंदन'च्या वर्षा सहस्त्रबुद्धे यांनी मूल ज्या परिसरात, ज्या परिवारात भाषा आत्मसात करतं, त्याचा विचार करण्याची आवश्यकता मांडली आहे. त्या म्हणतात, 'मूल शाळेत येतं, त्या सुरुवातीच्या काळात त्याला स्वभाषेच्या नजरेनं स्वभाषेच्या खिडकीतून जगाकडे पहायला मिळण्याचा, आणि स्वभाषेतूनच व्यक्त होण्याची संधी मिळण्याचा त्याच्या शिकण्यातल्या सहभागावर, शिकण्याच्या गुणवत्तेवर आणि एकंदर पल्ल्यावर निर्णायकरीत्या परिणाम होतो.'

हे सर्वार्थानं खरं आहे. केवळ वर्धिनीची 'पाकोळी' बालवाडीच नव्हे, तर सर्वच ठिकाणी मुलांना समान संधी देणारं वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांवर आहे. ते आपण साधू शकलो, तर 'पाकोळी'तून बाहेर पडणाऱ्या फुलपाखरांच्या पंखांमध्ये आभाळ पेलण्याची नवी ताकद येईल. या पाखरांचं गरुडात रूपांतर होईल. त्यासाठी सर्वांना शुभेच्छा.

**– प्रा. संजय तांबट**

❖ ❖ ❖

# पाकोळीचे फुलपाखरू होताना...

''**का**य गं ! कसली चिंता करतेस ? केव्हाचा मी हाक मारतोय. लक्ष कुठंय तुझं ?'' नानांनी विचारल्यावर मी एकदम मान वर करून पाहिले.

''चिंता वगैरे नाही नाना,'' असं गडबडीत म्हणत उभी राहिले.

''मग काय चाललं आहे तुझं, कसला विचार चालला आहे ?''

त्यावर मी नानांना म्हटले, ''नाना खरं सांगू, अनोळखी लोकांशी संपर्क करत काम करणं खूप अवघड आहे. यापूर्वी मी ५-६ वर्ष काम केलं ते चार भिंतीच्या आत. छोटी छोटी मुलं बरी अन् मी. ते काम सोडलं पण घरी करमेनासे झाले. तुम्ही वर्धिनीची ओळख करून दिलीत आणि सांगितले तुला इथं काम करायला खूप आवडेल. मनाप्रमाणे काम करता येईल, अगदी समाधान मिळेल. पण नाना गेले महिनाभर मी प्रयत्न करत आहे तरी त्यात यश काही येत नाही.''

''अगं, येईल यश, चिंता करू नकोस.'' म्हणून नाना निघून गेले, अन् मी पुन्हा विचारात बुडून गेले.

मंगळवार पेठेतील 'स्व'-रूपवर्धिनीची दोन मजली वास्तू. सगळेच पुरुष मी एकटीच स्त्री. पण का कोणास ठाऊक इथं भीती वाटत नव्हती. उलट अनौपचारिक शब्दांचा आधार वाटत होता. प्रत्येकजण एकमेकांशी मोकळेपणाने बोलायचे. मला अजूनही आठवते ह्या संस्थेतील माझा पहिला दिवस - १ मे १९८८. लॉ कॉलेजच्या इमारतीत मुलांचे शिबीर चालू होते. तिथल्या वातावरणाने मी पूर्णपणे भारून गेले होते.

वर्धिनीच्या वास्तूवर आल्यानंतर पहिली भेट कै. किशाभाऊ पटवर्धन सरांशी झाली. पहिल्या मजल्यावर कोपऱ्यातील हॉलमध्ये बैठक होती. गोलाकार खुर्च्या मांडल्या होत्या. त्या खुर्च्यांवर सर्व मोठी मंडळी बसली होती. माझ्या ओळखीचे फक्त कै. नाना जोशी होते. मी त्यांना गुरू मानते. त्यांनी नजरेने दाखवलेल्या खुर्चीवर मी बसले. नंतर प्रत्येकाने स्वत:चा परिचय करून दिला. या परिचयाची तेव्हा गंमत वाटली. पण माझा फायदा असा झाला की मला कळले की आपल्यासमोरील मंडळी किती मोठी आणि विद्वान आहेत ते ! त्यात स्वत: किशाभाऊ, श्री. दाते सर, श्री. नाना जोशी, श्री. राजाभाऊ लवळेकर, श्री. देसाई सर, सौ. कुंतीताई मुजुमदार. प्रत्येकजण आपण या वास्तूचा उपयोग कसा करू यावर चर्चा करत होते.

मला पण विचारले, ''हं ! तुम्ही कितीवेळ कामासाठी द्याल अन् काय काय कराल ?'' त्याबरोबर त्यांनी आतापर्यंत मांडलेल्या वक्तव्यावर आपले बोलणे किती फुटकळ असेल असे म्हणून मी सुरुवात केली.

मी म्हटले की, ‘माझा बालवाडी शिक्षिकेचा अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे. नुकतेच मी बालग्राम या संस्थेत छोट्या मुलांबरोबर काम केले आहे. त्यामुळे मातृस्पर्श म्हणजे काय हे थोडं फार कळत आहे. तेव्हा या वास्तूत बालवाडी चालवेन.’

त्यावर किशाभाऊंनी विचारले, ‘किती वेळ द्याल तुम्ही ?’

मी मनात म्हटलं, ‘मला वेळच वेळ आहे.’ तरीपण काहीतरी सांगायचं म्हणून म्हटलं, ‘१० ते ५ वेळ देईन.’

दुसऱ्या दिवशी मी ९.३० वाजताच कार्यालयात पोचले. थोड्या वेळाने नाना आले. पटवर्धन सर आले. देसाई सर आले. एकेक येऊ लागले. मी कुंतीताईंची वाट पहात होते. किशाभाऊ सर्वांशी खूप हसत खेळत बोलत होते. अगदी मोकळे वातावरण होते. म्हणून सरांना म्हटले, ‘बालवाडी सुरू करेन पण मुलं येतील ना !’ यावर सर म्हणाले, ‘मुलं तुम्ही गोळा करायची.’ मी म्हटले, ‘कुठे ?’ त्यावर सरांनी खिडकीकडे पाहत समोरच्या वस्तीकडे बोट दाखवून म्हणाले, ‘या समोरच्या वस्तीमधून.’

मी समोरच्या वस्तीकडे पाहिलं अन् माझ्या छातीत धस्स झालं. बापरे ! इथून मुलं गोळा करायची, किती मोठी पण अस्वच्छ वस्ती. बायकांची रोजची भांडणं, इमारतीच्या बाहेर बसलेली मुलं. या वस्तीमध्ये आत कसे जायचे अन् त्या लोकांशी काय बोलायचे या विचाराने माझी झोपच उडाली. रात्री स्वप्नातही मी वस्तीत फिरत होते. बालवाडीसाठी मुलं मागत होते. विनवणी करून सांगत होते.

दुसऱ्या दिवशी मी एका मुलाला बरोबर घेऊन वस्तीत गेले अन् बायकांशी बोलू लागले. ‘‘आम्ही आमची मुलं पाठवू; पण आम्हाला काय मिळणार ?’’ या प्रश्नाचे उत्तर मी देईपर्यंत आजूबाजूची मंडळी हसायला लागली. जीव मुठीत घेऊन मी त्या वस्तीतून फिरत होते. ज्या गल्लीतून मी आत प्रवेश करत होते तिथून मी कधीच परत येत नव्हते. अगदी वेगळ्याच वाटेने मी बाहेर पडायचे.

पंधरा दिवसांनी मी सरांना म्हटले, ‘‘सर अवघड आहे. अजून एकही मुलगा हाताशी लागला नाही.’’ सर मला म्हणाले, ‘‘अहो मिळतील मुलं, काही घाबरू नका. प्रयत्न करा.’’

सरांनी माझा उत्साह वाढवला. मी पुन्हा नव्या उमेदीने कामाला सुरुवात केली. महिना झाला तरी हाताशी फक्त चारच मुलं लागली अन् त्या चार घरातून सारखा प्रश्न... ‘कधी सुरू करताय बालवाडी ?’

मी म्हणायची, ‘हो, जूनमध्ये होईलच आणि मी सांगेनच तुम्हाला.’

तेवढ्यात सर आले. सरांनी विचारले तर त्यांना काय उत्तर द्यायचे ? माझी शब्दांची जुळवाजुळव सुरू असतानाच सर म्हणाले, ‘मग काय ! पुष्पाताई, किती मुलं गोळा झाली ?’

मी भीतभीतच उत्तर दिले, ‘सर फक्त चार मुलं आहेत.’ ‘वा ! चार. छान, चांगली प्रगती

आहे. पण पुष्पाताई ! अजून जरा जोर लावा. चार काय अहो, चाराची चाळीस होतील.'

मी पुन्हा नव्या ताकदीने, जोमाने वस्तीत जायचे. वस्तीच्या वातावरणाने मन निरुत्साही झाले. म्हणून मग वर्धिनीच्या जवळ असलेल्या एका इमारतीमध्ये गेले आणि बालवाडीबद्दल बोलू लागले तर 'कोण येईल तिथे मुलांना घेऊन ? इतक्या घाणीत इमारत आहे.' दुसऱ्या दिवशी सरांना म्हटलं, 'सर मुलं मिळतील पण इमारतीत घाणीतून कसा प्रवेश करायचा ? हा प्रश्न आहे पालकांचा.' त्यावर सरांचे उत्तर तयार. 'त्यात काय आहे, आपण फळ्या टाकू.' लगेच दुसऱ्या दिवशी दारात दोन मोठ्या कोऱ्या करकरीत फळ्या टाकलेल्या. सरांनी नुसते म्हटले नाही तर ते कृतीत आणले. माझा पण उत्साह वाढला. सरांनी केलेली तेवढी कृतीसुद्धा पुरेशी होती. मी पुन्हा वस्तीत फिरायला सुरुवात केली असता मला भीती वाटत नव्हती.

असे होता होता जून महिना पण संपला. जुलै उगवला. जुलैचा पहिला आठवडा संपला. सरांनी माझ्यासमोर येऊन विचारले, 'मग काय ? किती मुलं मिळाली ?'

मी भीत भीतच सांगितले, 'सर बारा मुलं मिळाली.'

माझे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच सर म्हणाले, 'अरे वा ! छान. बारा तर बारा. करा सुरू. अहो बाराची एकशे वीस होतील. खूप छान !'

माझी भीती कुठल्या कुठे पळाली आणि मी दुसऱ्या दिवसापासून ज्या घरातील बारा मुलं मिळाली त्यांच्या घरी जाऊन '१५ जुलैला बालवाडी सुरू होते आहे तेव्हा तुम्ही वेळेवर मुलांना घेऊन या' असे सांगायला सुरुवात केली.

दुसऱ्या मजल्यावरील २०३ ही खोली बालवाडीसाठी मिळाली, अन् मला अजूनही आठवते, तो दिवस १५ जुलै १९८८. ती १२ मुले, त्यांचे पालक म्हणून आलेल्या त्यांच्या आया, आलेले युवक अन् नेमके कोणी तरी आलेले परदेशी पाहुणे. २०३ क्रमांकाच्या खोलीमध्ये सगळे बसले होते. समोर 'ओम'ची प्रतिमा ठेवली होती. बाहेर पाऊस पडत होता. मला आपले वाटले, 'जणू वरुणराजा पण बालवाडीला आशीर्वाद द्यावयास आला.' मी खूप आनंदात होते कारण एवढी कमी मुलं मिळवूनसुद्धा सरांनी मला बालवाडी सुरू करण्याची परवानगी दिली होती व नुसती परवानगीच नव्हे तर माझ्या कामाचा उत्साहसुद्धा वाढवला होता. दोन अडीच महिने पालकांशी सतत बोलून थोडा माझा पण आत्मविश्वास वाढला होता. खोलीतील वातावरण अगरबत्तीच्या वासाने प्रसन्न झाले होते. कार्यक्रमाला सुरुवात केली. मोठ्या सरांच्या हस्ते ओंकार पूजन झाले. तीन वेळा ओंकार घेऊन सगळे समोर सतरंजीवर बसले होते. व्यासपीठावर कोणी नव्हते. शिरीष पटवर्धन सर उभे राहून बालवाडीबद्दल बोलत होते, 'आपण ही बालवाडी का सुरू केली ? समाजाच्या पदरात आपण काय देणार आहोत? समाजाने आम्हाला काय दिले आहे ?' हे सर्वांसमोर मांडले. मी पण पालकांना बालवाडीच्या

कामाबद्दल सांगायचे म्हणून बाहेर उभे राहून शब्दांची जुळवाजुळव करत होते. 'आता पुष्पाताई बालवाडीत प्रत्यक्ष काय घेणार' हे सांगतील' असं शिरीष पटवर्धन सरांनी सांगताच मी वर्गात आले. पण समोर एवढी माणसं त्यात परदेशी पाहुणे, माझं अवसानच गळाले. माझी ही पहिलीच वेळ असल्याने बोलायला शब्दच आठवेनात. माझी परिस्थिती ओळखून शिरीष पटवर्धन पालकांना म्हणाले, ''पुष्पाताई आता बोलणार नाहीत पण त्या कृती करून आपल्या मुलांवर छान संस्कार करतील याची खात्री आहे.''

सगळे पाहुणे गेले. युवक आणि पालकवर्ग गेला. सर्वांना पेढा दिल्यानंतर पालकांशी गप्पा मारून, उद्यापासून मुलांना सोडा, असे सांगितले, १० ते १ अशी शाळेची वेळ ठरली. मी तशीच रिकाम्या खोलीत एकटीच बसले. आणि मला आठवले मोठ्या सरांचे, नानांचे शब्द. मोठे सर नेहमी कामाविषयी बोलत, ''अहो, पुष्पाताई ही इमारत बांधली तेव्हा आपल्याकडे एकही पैसा नव्हता. लोकांनी आपणावर पैसे देऊन भरभरून प्रेम केले आहे. का तर आपण त्यांच्या परीक्षेला उतरलो आहोत. लोकांना आपले काम आवडते मग समाजाच्या पदरात मोबदला म्हणून सेवा द्यायला हवी म्हणून आपल्या ह्या वास्तूमध्ये असे सेवाभावी प्रकल्प सामाजिक कामात व्यस्त असली पाहिजे''. सरांच्या अशा आग्रही बोलण्याने खरोखर खूप उत्साह वाटे, कामाचा शीण निघून जाई.

वर्धिनीची बारा मुलांची बालवाडी सुरू झाली. आपण जे अभ्यासक्रमात शिकलेलो असतो त्याचा पूर्ण उपयोग होतोच असे नाही. कारण आपणासमोर असलेला पालकवर्ग फार वेगळा असतो. मुख्य म्हणजे त्यांच्या मागे लागून त्यांच्या मुलांना आमच्या शाळेत घाला असा आग्रह करून आणलेली मुले असतात. मी त्यांना नुसत्या सूचना करून चालणार नाही हे माहीत होते. कित्येक वेळा शाळेत येणारी मुले झोपेतून उठून आल्यासारखी आंघोळ न केल्यासारखी वाटत. त्यांच्या पालकांशी ह्या गोष्टी गोड भाषेत समजाव्या लागत. मुलांना सोडून पालक गेले की प्रथम स्वच्छतेचा कार्यक्रम अर्धा एक तास चाले. आता सगळीजणं कशी छान दिसत आहेत! असे खूष करून मग प्रार्थना, भजने, बडबडगीत, गोष्टी वगैरे सुरू. यामुळे मुलांच्यातील बदल सर्वांनाच जाणवायला लागला आणि त्यामुळे अगदी डिसेंबरमध्ये 'आमचीपण मुले घ्या तुमच्या बालवाडीत' असा काही पालकांचा आग्रह सुरू झाला. आम्हीपण त्यांचे आनंदाने स्वागत केले. वर्षाअखेरीस पटावर बावीस मुले झाली. मला आनंद वाटू लागला. सर पण खूष झाले.

असे महिने अन् वर्ष संपले. पुन्हा नवीन मुलं नव्या वर्षासाठी येऊ लागली. मग मला कधीच ''तुम्ही मुलांना पाठवा.'' असा आग्रह करावा लागला नाही. नंतर नंतर जागा कमी पडायला लागली. एकदा विनोदाने श्री. दाते सर किशाभाऊंना म्हणाले, ''बघा ! उंट तंबूत शिरला पहा.'' ''अहो, शिरू देत. काही हरकत नाही मी आहे ना!.'' अन् खरेच सरांचा उत्साह म्हणजे अगदी एखाद्या पंचविशीतील

***विसर्जन मिरवणुकीतही बालसेना***

*एक दिवस मी वर्ग घेत होते. सर वर्गावर आले अन् म्हणाले, ''पुष्पाताई बालवाडीच्या मुलांचा लक्ष्मी रोडवरील गणपती विसर्जन मिरवणुकीत खेळ घेऊ.'' मी पण त्यांच्या हो मध्ये हो मिळवून कामाला लागले.*

*'आओ बच्चो' हे मुलांच्या परिचयाचे हिंदी गीत निवडले. रोज शेवटचा अर्धा तास वर्गात सराव सुरू झाला. ट्रकमधील जागेएवढी आयताकार आकृती वर्गात काढली. गाण्याची पाच कडवी, प्रत्येक कडव्यामध्ये किमान पाच म्हणजे २५ मुलं, शिवाय एका कोपऱ्यात मी दोन्ही पायांवर बसून सराव केला. आखलेल्या रेषेमध्येच प्रत्येक कडव्याला पाच मुलांनी पुढे येऊन अभिनय करायचा. पालकवर्गाकिडूनही मला अनुकूल असा प्रतिसाद मिळाला.*

*सर्वात मुख्य म्हणजे मुलांनी अजिबात त्रास दिला नाही. आणि संपूर्ण लक्ष्मी रोडवर 'आओ बच्चो तुम्हे दिखाए'.. हे गीत स्पीकरवर सुरू झाले की मुले लगेच अभिनय करू लागत. मी त्यांचा उत्साह वाढवत होते. पूर्ण रस्त्यावर लोकांनी कौतुक केले आणि महापौरांनी अलका टॉकीजजवळ वन्स मोअर देऊन ५०० रु चे बक्षीसही दिले. त्यावेळचा सरांचा चेहरा अजून आठवतो. किती-किती कौतुक सरांनी केले. बाप रे! माझ्या मुलांनी खूप कष्ट केले. एवढ्याशा जागेत तिथल्या तिथे मागे-पुढे व्हायचे हे फार कठीण. मग काय दरवर्षी वर्धिनीच्या गणेशोत्सवात बालवाडीचा सहभाग असे.*

तरुणाला लाजवेल असा होता.

हळूहळू पालकवर्ग बदलू लागला. मुलं आपापल्या आईवडिलांना सूचना करू लागली. 'जेवण्यापूर्वी हात धुवा, प्रार्थना म्हणा, चपाती ताटात ठेवा, एकाच हाताने जेवा' वगैरे. मुलांचे पाठांतर, श्लोक म्हणणे, व्यवस्थित राहणे ह्याचा परिणाम पालकांवर होऊ लागला. त्यांच्या घरातही बदल घडू लागले. पालक व वर्धिनी यांचं नातं निर्माण झाले. एखाद्या घरगुती अडचणीवर पालक सल्ला विचारू लागले. मुलांबरोबर पालकही वास्तूवर रमू लागले.

नंतर शिक्षकवर्ग वाढू लागला. त्यांच्या जोडीला सेविका पण आल्या. जागा कमी पडू लागली. असे अनेक प्रकल्प वाढले आणि दोन मजली इमारतीची पाच मजली इमारत झाली. त्यामुळे बालवाडीची ही संख्या वाढू लागली. नवनवीन गोष्टी बालवाडीत होऊ लागल्या. बालवाडीच्या वर्गांच्या भिंती चित्रांनी रंगवल्या गेल्या. वर्गांना फुलांची नावे दिली. पहिली बालवाडी आणि आत्ताची यात खूप फरक आहे. यात दरवर्षी भरच पडत गेली.

शिक्षकांच्या इतर शाळांना, संस्थांना भेटी झाल्या. त्यात मुख्यत्वे कोसबाडला अनुताई

वाघांच्या संस्थेची भेट महत्त्वाची ठरली. त्यांची ग्रामीण भागातील बालवाडी व आपली शहरातील बालवाडी याचा सुरेख मेळ घालून आपल्याला नेमके काय करायचे असे ठरवून बालवाडीचा अभ्यासक्रम तयार केला. वर्धिनीच्या मुलांना चांगल्या नावाजलेल्या शाळेत पहिलीसाठी प्रवेश मिळालाच पाहिजे. यासाठी नवनवीन प्रयोग सुरू केले. त्या प्रकारे शिक्षकांची मानसिकता तयार केली. बालवाडी खरं तर तीन तासांची असते, पण आपल्या मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून मोठा गट चार तासांचा केला.

बालवाडीत सर्व भारतीय सण साजरे करणे सुरू केले. त्यातून भारतीय संस्कृती रुजावी हा उद्देश होता. मुलांच्या सहली, वाढदिवस, बाहुला बाहुलीचे लग्न, बोरन्हाण, बालमेळावा असे उपक्रम सुरू केले. शिक्षकांनी बनवलेल्या खेळांपासून ते अत्याधुनिक खेळापर्यंत सर्व खेळ मुलांना देऊ लागलो.

शिक्षकांमध्ये सुद्धा मानसिक बदल व्हावा म्हणून त्यांची साप्ताहिक बैठक सुरू केली. वर्षाच्या सुरवातीला त्यांचे कधी आदिवासी भागात तर कधी वर्धिनीत शिबिर घेतो. वर्षातून एकदा शिक्षकांची सहल म्हणजे ‘अभ्यास दौरा’ काढला जातो. यामुळे वर्धिनीच्या बालवाडीसाठी सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षिका तयार होतात.

यातूनच वर्धिनीचा स्वतंत्र ‘बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग’ सुरू झाला. यासाठी गुप्तेताई, बदामीकरताई, सोहनीताई, भावेताई, मोडकताई या अनुभवी शिक्षकांची खूप मदत झाली. हा अभ्यासक्रम वर्षभराचा चालवला जातो. त्यात श्री. रमेश पानसे सरांची पण मदत झाली. त्यांचे काम पाहून आलो. अशा अनेक गोष्टीतून जे जे चांगले मिळेल ते राजहंसाच्या भूमिकेतून वेचण्याचा प्रयत्न केला; आणि अजूनही करत आहोत.

या पंचवीस वर्षात अनेक शिक्षिका येऊन गेल्या. प्रथम एक वर्ग होता. मग दोन, पुढे तीन नंतर सहा, नऊ असे वर्ग वाढत गेले. प्रथम एकच शिक्षिका. तीच सेविका अन् तीच मुख्याध्यापिका असे. नंतर दोन शिक्षिका, पुढे तीन शिक्षिका, एक सेविका अशी प्रगती होत होत आता तीनशे-साडेतीनशे मुले, १५ शिक्षिका आणि ३ सेविका असा बदल झाला. प्रत्येकीच्या कल्पनेला वाव मिळाला. गत पंचवीस वर्षांमध्ये साधारणत: ५,००० मुलं बालवाडीमध्ये घडली. त्यातील अनेक मुलं-मुली कार्यकर्ते म्हणून शाखेच्या माध्यमातून संपर्कात आहेत.

दरवर्षी काहीतरी नवीन आव्हाने असतात. इंग्रजी माध्यम शाळा हे एक आव्हान आहे. त्यावर शहरातील काही प्रतिष्ठित शाळांच्या मुख्याध्यापिका व शिक्षिकावर्ग, शिक्षणतज्ञ यांचा ‘मातृभाषा मराठी, मराठी शाळा’ या विषयावर परिसंवाद घेतला. मुलांचे उच्चार सुधारावेत यासाठी संस्कृत भाषावर्ग सुरू आहे. तर इंग्रजी भाषेची तोंडओळख करून दिली जाते. असे नवनवीन प्रयोग केले गेले.

अशी ही ‘पाकोळी’, कै. किशाभाऊ, कै. नाना जोशी यांच्या प्रोत्साहनाने रुजलेली, सर्व

शिक्षिकांच्या अपार कष्टाचे खतपाणी मिळालेली, पालकांच्या सहकार्याने फुललेली आणि मुख्य म्हणजे पाकोळीच्या खऱ्याखुऱ्या आधारस्तंभांनी म्हणजे छोट्या छोट्या मुलांनी फुलवलेली !

**– श्रीमती पुष्पा नडे**

बालविभाग, महिलाविभाग प्रमुख

(सहकार्यवाह)

## थेंबे थेंबे तळे साचे

बालवाडीत येणाऱ्या आपल्या पाल्याने हट्ट केला म्हणून त्याला खाऊला पैसे देण्याची सवय काही पालकांना होती. लहान मुलांच्या हातात नाणे देणे धोक्याचे. पालक सभेत सांगूनही मुलांचा हट्ट पुरवणे सुरूच होते. २००० सालच्या अखेरीला एका पालकसभेत सांगितले की, यापुढे कोणा विद्यार्थ्याच्या जवळ पैसे आढळले तर ते जप्त करून त्याच्या नावे वहीत लिहून ठेवले जातील व वर्ष संपेपर्यंत परत दिले जाणार नाहीत. अल्पबचतीची सुरुवात अशी थोडीशी सक्तीने झाली खरी; पण आपल्या पाल्याच्या नावाने बँक खाते सुरू झाले, त्याच्या नावे पैसे जमा व्हायला लागले, याचा नेमका हेतू समजलेल्या पालकांनी मग या बचत योजनेत सहभाग घ्यायला सुरुवात केली. २००१ वर्षी ही बचत खाती सुरू झाली. आज सुमारे १२० खातेधारक आहेत. सौ. उषाताई पोफळे या वर्धिनीच्या एक पालक कार्यकर्त्या याचे काम पाहतात. २००१ ते २००५ या पाच वर्षाच्या कालावधीत या सर्व बचत खात्यांवर एकूण सुमारे चार लाख रुपयांची बचत रक्कम जमा झाली. कष्टाचे जीवन जगणाऱ्याला बचत करून जमा केलेले पैसे उपयोगी पडतात. त्यामुळे आता स्वयंस्फूर्तीने सहभाग घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. या वाटचालीतील हे आहेत काही प्रेरक अनुभव –

- **श्री. सुनील भडाळे** हा चहाच्या दुकानातील कामगार. दिवसातून कधीतरी वर्धिनीत चहा घेऊन येणारा. हळूहळू त्याला या बचत योजनेचे महत्त्व लक्षात आले. तोही सहभागी झाला.
- **श्रीमती सखुबाई नामदास** या एका पाल्याच्या आजी. भंगार गोळा करण्याचे काम करतात. त्याची विक्री करून मिळणाऱ्या पैशातील काही रक्कम त्यांनी बचत खात्यावर जमा करायला सुरुवात केली. आपल्या खात्यावरची एकूण जमा चार आकडी रक्कम पाहताना त्यांचा चेहरा खुलतो.
- बालवाडीत येणाऱ्या आपल्या नातींसाठी **सौ. माया हके** यांनी खाते सुरू केले. मोलमजुरी करून मिळालेली रक्कम या खात्यावर त्यांनी वेळोवेळी भरली. खात्यावरील ही रक्कम आता कायम ठेवीत गुंतविण्याचा त्यांचा विचार आहे.

# विशेष लेख

'पाकोळी' बालवाडी रौप्यमहोत्सवी विशेषांकानिमित्त पुढील लेखकांनी विशेष लेख दिले आहेत. त्या सर्वांविषयी कृतज्ञतेची भावना आम्ही व्यक्त करतो.

- **मखमली पंख – श्री. रघुनाथ नरवणे सर**
  कै. किशाभाऊ पटवर्धन यांचे सहकारी व वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व मार्गदर्शक.

- **'मुले बदललीत; आपण बदलू या !' – श्री. रमेश पानसे सर**
  अर्थशास्त्राचे प्राध्यापक, बालशिक्षण विषयाचे गाढे अभ्यासक व संशोधक. ग्राममंगल संस्था, महाराष्ट्र बालशिक्षण परिषद या संस्थांचे संस्थापक. पालक प्रबोधन चळवळीत प्राधान्याने सहभागी. त्यांचे बालशिक्षण विषयक विचार व शिक्षणपद्धती या विषयांवरील अनेक पुस्तके व लेख प्रसिद्ध.

- **मातृभाषेला बनवा ज्ञानभाषा – डॉ. माधवीताई वैद्य**
  फर्ग्युसन, मॉडर्न व सेंट मिराज् या महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका. त्यांच्या प्रबंधाला डॉ. वि. रा. करंदीकर पारितोषिक मिळाले आहे. अनन्वय फौंडेशनच्या संस्थापिका. अनेक माहितीपटांची निर्मिती. यातील 'Its Prabhat' या माहितीपटाला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त. समीक्षात्मक व इतर विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध. सध्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्याध्यक्षा. 'मातृभाषेतूनच शिक्षण घ्यायला हवे' यासाठी अनेक संस्थांच्या सहभागातून काम.

- **संस्कारांची अष्टपदी – कवयित्री सौ. हेमाताई लेले**
  M.A. (मराठी) सुवर्णपदकाच्या मानकरी, प्राध्यापिका. सुरभी कल्चरल ॲकॅडमी या नृत्य संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा. ५०० हून अधिक रंगमंचीय अविष्कारांचे सादरीकरण. अनुवादित, ललित, वैचारिक, बालवाङ्मय या संबंधींची ५० हून अधिक पुस्तके प्रकाशित. सुजाण पालकत्वावर आधारित 'बागडणाऱ्या गुजगोष्टी' या सदराचे 'दै. लोकसत्ता'मधून लिखाण. 'संस्कारातून व्यक्तिमत्त्वविकास' या विषयावर पालकांसाठी व्याख्यान.

- **घरची आणि शाळेतली भाषा – वर्षाताई सहस्त्रबुद्धे,** M. A.(German), M. Ed.
  अक्षरनंदन या वैशिष्ट्यपूर्ण शाळेच्या संस्थापिका व माजी मुख्याध्यापिका. २००२ सालापासून अनेक सरकारी व खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकासासाठी काम करत आहेत. तसेच ग्रामीण भागातल्या वनवासी क्षेत्रातल्या प्राथमिक शिक्षणाचे मूल्यमापन व इतर पूरक शैक्षणिक उपक्रमांना साहाय्य करत आहेत. शहरातील अविकसित भागातील मुलांची भाषा सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. 'मुलांची भाषा आणि शिक्षक' व 'मुलांची मने' ही पुस्तके भाषांतरित केली आहेत.



छडी वापरावी लागली तर तो छडीचा आणि आपला अपमान आहे असे समजावे.

## मखमली पंख

दारावरची घंटा वाजली.

''आला वाटतं !'' असे पुटपुटत काकांनी लगबगीने दार उघडले.

दारात श्रीनिवास उभा होता. तो प्रसन्नपणे हसला. मोठ्या प्रसन्नतेने काका म्हणाले, ''येऽ ! तुझीच वाट पहात होतो आम्ही. अहो, श्री आला बरं का !''

श्रीनिवास आत आला. आपली प्रवासी बॅग दाराशेजारच्या स्टुलावर ठेवून खाली वाकून त्याने बूट काढले. बाकीच्या जोड्यांपाशी ठेवले. अगदी सहजपणे सर्व जोड ओळीत लावून तो उभा राहिला.

''काय छान झालायस रे !'' काका कौतुकाने म्हणाले. इतक्यात शेजारच्या खोलीतून फडक्याला हात पुसतच काकू बाहेर आल्या. ''अगं बाई, हा श्री का ? तुम्ही बोलला नसतात तर मी बाई ओळखलंच नसतं हो याला ! श्री-किती मोठा झालायस रे तू ! आणि बदललायस तरी किती !''

श्रीनिवास मनात सुखावला. पुढे होऊन काकाकाकूंना पायाला हात लावून त्याने नमस्कार केला. दोघांनीही त्याला मनापासून आशीर्वाद दिले. काकू म्हणाल्या, ''१२ वर्षे झाली नाही का हो ? आपण त्यावेळी नाशिकला होतो आणि भाऊजी सहकुटुंब भेटायला आले होते. हा तर त्यावेळी ५-६ वर्षांचाच असेल ! त्यानंतर आज भेट होतेय !''

''अरे, उभा का ? बस ना या कोचावर !'' काका बसले. संकोचाने थोडे अंतर राखून श्रीनिवासही बसला.

''बापू कसे आहेत? तेही तुझ्याबरोबर आले असते, तर राम-भरताची भेट झाली असती''

''ठीक आहेत. पण-काम होतं-''

त्याच्या बोलण्यातला सूक्ष्म फरक काकूंच्या लक्षात आला. काकू चार वर्षांपूर्वी एका अपघातात दगावल्या होत्या, जखम अजून ताजी होती आणि अगदी न कळत नवऱ्याने तिला स्पर्श केला होता ! चतुराईने त्या म्हणाल्या, ''अहो, मघा मी बोलले ते जरा चुकलंच बरं का ! मी नक्की ओळखलं असतं याला !''

''मी नाही समजलो !''

''अहो, आपल्या वहाणांच्या जोडांकडे पाहिलंत का ? कसे ओळीनं लावून ठेवलेत ! नाशिकला आला होताना त्यावेळी देखील-एव्हढासा पोर पण आल्या आल्या याने सगळ्यांचे जोडे असेच ओळीने लावून ठेवले होते. तुम्ही किती दिवस त्याचे कौतुक करत होतात ! आजही तेच घडलेय ! काय रे श्री, भाऊजींनी काही सांगून पाठवलं वाटतं ?''

''छे छे ! आता ती सवय अंगात भिनलीय !''

‘‘म्हणून तर म्हटलं, शंभर लोकांतून तुला नक्की ओळखलं असतं ! बरंऽ आता आपल्याच घरी आलायस हां, थोडा आराम कर. अहोऽ–’’

‘‘यस मॅडम !’’

‘‘इश्श्य !’’ काकूंनी हसत तोंडाला पदर लावला. ‘‘श्री आता मोठा झालाय हो !’’ वरपांगी रागावून पण आतून सुखावून काकू आत जाता जाता म्हणाल्या.

‘‘मग काय झालं !’’ काका हसत म्हणाले, ‘‘शिवाय श्री दोस्त आहे आपला !–’’

‘‘काय रे ?’’

‘‘हो ! अन् दोस्तानं दोस्ताची बाजू घ्यायलाच हवी !’’ श्रीनिवास हसत म्हणाला. झालं, एका क्षणात येऊ पाहणारा परकेपणा नाहीसा झाला.

‘‘काका, तुम्ही कामात दिसताय. बाहेर जायचंय ?’’

‘‘थोडासा आहे हे खरं आहे पण...’’

‘‘मग खुशाल जा ना ! आपण सावकाश बोलू माझ्या कामाबद्दल. बरी आठवण झाली. बापूंनी पत्र दिलंय तुम्हाला’’ खिशातून पत्र काढून त्याने ते काकांना दिले.

‘‘तुझे बापू मोठे शिस्तीचे आहेत बाबा !’’ पत्र उघडत काका म्हणाले, ‘‘प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी झाली पाहिजे हा त्यांचा कटाक्षच असतो !’’ ते पत्र वाचू लागले. अचानक म्हणाले, ‘‘अरे !’’ थोड्या वेळाने म्हणाले, ‘‘काय योगायोग आहे ! आज नेमका तू इथं आहेस. श्री, आटप! तुला माझ्याबरोबर यायचंय !’’

’’अहोऽ!’’ काकू आतून म्हणाल्या, ‘‘त्या बिचाऱ्याला बसू दे तरी ! ५–७ तासांचा एसटीचा प्रवास झालाय–दमला असेल !’’

‘‘काय रे ? दमलायस ?’’

‘‘छे, छे !’’

‘‘अहो तो तुमच्यासमोर कसं म्हणेल, दमलोय म्हणून ? श्री तू आपला आत ये कसा ! हात पाय तोंड स्वच्छ धू. मग छानदार चहा आणि मग खूप गप्पा !’’

‘‘बऽरं ! जा रे बाबा ! गृहमंत्र्यांचा आदेश आहे. तो मोडायची या घरात कुणाची शामत आहे ! पण १०–१२ मिनिटात आटपा बरं का. तोवर मीही माझं अर्जंट काम करतो.’’ काकांनी श्रीनिवासला मानेनेच आत जाण्याची खूण केली आणि ते घाईने आपल्या खोलीत गेले.

‘‘हॅलोऽ ! वर्धिनी का ?–’’

त्यानंतर १५–२० मिनिटांनी काका आणि श्रीनिवास संस्थेच्या दारात पोहोचले. दारासमोर छान रांगोळी, रंगीबेरंगी सुंदर कागदी फुले चिकटवलेली, दारावर छान तोरण ! सगळे प्रसन्न! दारात

दोन छोटी मुले स्वागताला उभी ! नेहरू पोषाखातल्या त्या चिमुरड्यांनी पुढे झुकून नमस्कार केला. एकाने म्हटले, ''सुस्वागतम्'' आणि त्यांना फुले दिली. दुसऱ्याने त्यांच्या हाताला अत्तर लावले. श्रीनिवास या आगळ्या स्वागताने आनंदला. मग तिथली ताई त्यांना प्रदर्शन मांडलेल्या वर्गात घेऊन गेली.

वर्गात दोन भिंतींच्या शेजारी लांबट टेबले मांडून त्यांवर मुलांनी बनवलेल्या लहान लहान वस्तू ठेवल्या होत्या. काही मातीच्या, काही कागदाच्या, काही जाड पुठ्ठ्यांच्या, काही कचऱ्यातून कला म्हणाव्यात अशा तऱ्हेच्या !

''मुलांचे हात, मन आणि कल्पना यांची सांगड घालायचा आम्ही प्रयत्न करतो. आम्ही त्यांना मार्गदर्शन करतो पण प्रत्यक्ष कृतीत आमची फार थोडी मदत असते.'' ताईंनी माहिती दिली.

मातीच्या वस्तूंत भांडी, बोळकी, कुंड्या, कप-बशी, वेटोळे घालून फडा काढून बसलेला नाग, लांब पसरलेला साप, अशा पुष्कळ गोष्टी होत्या. मुलांच्या वयाच्या मानाने वस्तू पुष्कळ सुबक होत्या. पुठ्ठ्याच्या खोक्यापासून बनवलेले कौलारू घर आणि काड्यांनी तयार केलेले भवतीचे कुंपण छान जमले होते. काड्यापेट्यांची बस, खुर्ची आणि टेबल, कागदाचे बाक, पंखा, पाकिटे, भिरभिरी, रिबनींची चटई अशा पुष्कळ गोष्टी होत्या त्या मुलांचे डोके कसे चालते त्याची साक्ष देत होत्या.

खोलीच्या इतर भागात चार ठिकाणी तीन तीन मुलांचे गट रांगोळी काढण्यात रंगले होते. एकमेकांशी बोलत, एकमेकांना मदत करत रांगोळी काढण्यात ते छोटे कलाकार इतके दंग झाले होते की कुणी पाहुणे आले आहेत हे त्यांच्या गावीही नव्हते !

श्रीनिवासला त्या लहानग्यांचे खूप कौतुक आणि थोडा हेवाही वाटला. आपणही कधीतरी असेच लहान असणार, असेच जगाला विसरून आवडीच्या गोष्टी करत असणार-ही मुले म्हणजे आपलीच छोटी रूपे-पण आपण कुठे होतो ? त्याला इतक्या लहानपणाच्या आठवणी नव्हत्या, आईही बोलली नव्हती. घरी गेल्यावर बापूंना विचारू असा विचार त्याच्या मनात आला, त्या विचारातच काकांबरोबर तो पुढल्या दालनात गेला.

ते आत शिरल्याबरोबर झांजांचा किण्‌किण् आवाज येऊ लागला. त्यांच्यासमोरच्या कोपऱ्यातून १५-२० वारकऱ्यांची दिंडी त्यांच्याकडे येऊ लागली. गुढघ्यापर्यंत धोतर, नेहरू शर्ट, डोक्याला फेटा, कपाळावर आणि कानावर अष्टगंधाचा टिळा अशी छोटी मुले आणि नऊवारी पद्धतीची पातळे नेसलेल्या मुली झांजा वाजवत होत्या. नंतर ग्यानबा-तुकारामचा आणि विठ्ठल विठ्ठल जर हरी विठ्ठलचा गजर होऊ लागला. एका मुलाच्या हातात वीणा होती. दिंडीमागून माऊलींची छान सजवलेली पालखी दोन मुलांच्या खांद्यावरून येत होती. मध्येच दिंडीबाहेरची दोन मुले आली, त्यांनी पालखीवर डोके टेकले आणि नमस्कार केला. मग दिंडीच्या दोन्ही बाजूंनी दिंडीत अनेक मुले सामील होत गेली. दिंडी

वाढत गेली. एकूण दृश्य मजेदार होते आणि श्रीनिवासला क्षणभर वाटले की आपणही दिंडीत सामील व्हावे ! त्याने स्वत:ला आवरले, पण पालखीला स्पर्श करून नमस्कार मात्र केला. हे पाहताच मुले खूप आनंदली आणि ग्यानबा तुकारामाचा गजर आणखीच मोठा झाला. मुले नाचू लागली. अशाच स्थितीत त्यांच्या बाजूच्या दारातून दिंडी बाहेर गेली.

नंतर त्याच दरवाजातून दुसरी दिंडी आत आली. दिंडीतल्या मुलांच्या डोक्यावर प्लॅस्टिकच्या पिशव्यात लावलेली रोपे होती.

''यावर्षी वटपौर्णिमा मुलांनी साजरी केली त्याचे हे छोटे रूप.'' ताईंनी स्पष्टीकरण केले. दिंडीत सगळ्यात पुढे दोन मुले झांजा वाजवत चालली होती. ती मोठ्याने म्हणाली,

''झाडे आमची मित्र छान'' सगळा समूह म्हणाला, ''मित्र छान. मित्र छान.''

''झाडे तुमची मित्र छान'' परत सगळी मुले म्हणाली, ''मित्र छान, मित्र छान.''

''झाडे सगळ्यांची मित्र छान'' सगळे एका सुरात म्हणाले, ''झाडे सगळ्यांची मित्र छान!''

सगळे परत म्हणाले, ''झाडे आमची मित्र, झाडे तुमची मित्र, झाडे सगळ्यांची मित्र, छान छान छान.''

यावेळपर्यंत सगळी दिंडी वर्गात गोल फेरी मारून काका आणि श्रीनिवास यांच्याजवळ आली होती. मध्यंतरीच्या काळात दोन मोठ्या मुलींनी एक लांबट टेबल आणि पाण्याची छोटी बादली आणि लहान भांडी असलेले एक स्टूल पाहुण्यांसमोर आणून ठेवले होते. टेबलावर मुलांनी आपापली रोपे ठेवली. मग ताई म्हणाल्या, ''झाडे आली, झाडे आली, आपण सारे नाचू या, पाणी त्यांना देऊ या!''

सगळी मुले म्हणाली, ''नाचू या, नाचू या, झाडांना पाणी देऊ या !'' मुलांनी नाचत नाचत टेबलाला फेरी मारली. लहान भांड्यांतून झाडांना पाणी दिले आणि सगळे माना डोलावत रोपे कुरवाळू लागले. मग मुलातलाच मुख्य झाडाला कुरवाळत म्हणाला, ''झाडा झाडा मोठा हो!'' इतरही म्हणाले, ''मोठा हो.'' मग एक म्हणाला, ''झाडे आम्हाला फुले देतात'' इतर सगळे म्हणाले, ''फुले देतात'' त्यानंतर दुसरा म्हणाला, ''झाडे गोड गोड फळे देतात.'' इतर म्हणाले, ''गोड गोड फळे देतात'' याच क्रमाने झाडांविषयी प्रत्येकाने सांगितले– ''झाडे सावली देतात, झाडे औषध देतात, पक्षांना घरे देतात. आम्हाला छान हवा देतात, पाऊस आणतात.'' हे गुणगान झाल्यावर सगळ्या मुलांनी रोपांना छातीशी धरून म्हटले, ''झाडा आम्ही तुला मारणार नाही, मारणार नाही; तोडणार नाही, तोडणार नाही, मारणार नाही, तोडणार नाही.'' असे परत परत म्हणत ती सर्व मुले एका पाठोपाठ एक वर्गाबाहेर गेली.

श्रीनिवासला पर्यावरण रक्षणाबद्दल फार आस्था असल्याने मुलांचा कार्यक्रम फार आवडला. असे अगदी लहानपणापासूनच मुलांच्या मनावर पर्यावरण रक्षणाची कल्पना बिंबवली तर खूप मोठे काम होईल असे त्याला मनापासून वाटले. टाळ्या पिटून (कार्यक्रमाला त्याने) दाद दिली.



**ऐकणे, बोलणे, पाहणे, अनुभवणे या इनपुटमुळे बालवयामध्ये रिकाम्या असलेल्या हार्डडिस्कमध्ये ज्ञान संचित केले जाते.**

ही मुले बाहेर जाताहेत, तोच बासरीचे मंजुळ सूर त्या वर्गात घुमू लागले. दोन मुलींनी बाक आणि स्टूल कोपऱ्यात नेले. ताईंनी छताला बांधलेले रंगीत हंडी असलेले शिंकाळे हळूहळू दोरी सोडून पुरेसे खाली आणले. इतक्यात दरवाजातून मुरली वाजवणारा कान्हा आणि त्याचे दहा बारा सोबती घोळक्याने आत आले. ते सगळे नाचत होते. नाचता नाचता कृष्णाकडे हात करून एक जण गाणे गाऊ लागला, ''खेळगडी हा अमुचा कान्हा पावा वाजवतो ! कान्हा पावा वाजवतो।।'' मग सगळे म्हणाले, ''आम्ही गुराखी या गोकुळचे ! आनंदे नाचतो ! आम्ही आनंदे नाचतो !''– हे सर्वच कडवे दोनदा तीनदा म्हणाले–मग बासरीचे सूर पुन्हा पुन्हा सुरू झाले. तोपर्यंत सगळा घोळका मध्यभागी आला होता.

पुन्हा एकजण गाऊ लागला, ''खूप खेळलो दमलो ! देवा भूक खरी लागली, देवा भूक खरी लागली.'' सगळे म्हणाले, ''भूक खरी लागली ! देवा ! बसू या झाडाखाली ! बसू या झाडाखाली''

कृष्णाने बासरी शेल्यात खोचली, हात पसरून नाचत स्वत:भोवती दोन गिरक्या घेतल्या. सगळे त्याच्याभोवती फेर धरून नाचू लागले. कृष्णाने हात वर करून हंडी दाखवली. सगळे टाळ्या वाजवू लागले. कृष्णाने हात खाली करून गोपाळांना थांबण्याची खूण केली. कृष्णाने दोन गोपाळांना ओणवे होऊन बसायला सांगितले. समोर दोन गोपाळांना उभे केले आणि बसलेल्या गोपाळांच्या खांद्यावर पाय पुढे सोडून तो बसला. गोपाळ उभे राहिले. त्यांना समोर उभे असलेल्या गोपाळांनी आधार दिला. कृष्णाने आपली बासरी काढून ती हंडीवर हलकेच मारली. त्यावेळी ताई पुढे झाल्या. त्यांनी हंडी तिरकी केली. कृष्णाने हंडीत हात घालून मूठभर लाह्या गोपाळांवर उधळल्या. शिंक्यातून हंडी काढून ताईंनी कृष्णाच्या हाती दिली. कृष्ण सावकाश खाली आला. सगळ्या गोपाळांना त्याने लाह्या बत्तासे दिले. सगळे नाचू लागले. कृष्ण पुन्हा बासरी वाजवू लागला. दाराकडे निघाला. 'खेळगडी हा आमुचा कान्हा, गोपाळकृष्ण–गोपाळकृष्ण' असे नाचत नाचत गात सगळे गोपाळ दाराबाहेर पडले.

मुलांच्या सहजसुंदर अभिनयाने आणि गाण्याने श्रीनिवास अगदी मोहून गेला. कृष्णाला काहीतरी द्यावे असे वाटून त्याने स्वत:चे खिसे चाचपले आणि त्याला मनापासून बरे वाटले. खिशात दोन चॉकलेटे होती ! त्याने ताईंना जवळ बोलावले आणि तो त्यांना म्हणाला, ''कार्यक्रम फारच छान झाला. कृष्णाचं काम मला फार आवडले. माझ्या वतीने हे आमच्या कृष्णाला द्या! प्लीज !''

ताई हसल्या. किंचित विचार करून ती चॉकलेटं त्यांनी परत श्रीनिवासच्या हातावर ठेवली.

''ती घेणार नाही !''

''का बरे ?''

''एकटा कसा घेईल तो ? गोपाळकाल्यानं त्याला शिकवलंय ना की खाण्याची वस्तू सगळ्यांनी वाटून घ्यायची !''

विचारांची ही दिशा पाहून श्रीनिवासला स्वत:च्या कृतीची आणि विचारांचीही लाज वाटली ! शरमिंद्या स्वरात तो म्हणाला, ''मला माफ करा, यावेळी मी फक्त त्याचाच विचार केला! माझ्या रोजच्या आयुष्यात असे कधीच होत नाही; पण आज मी फार भारावून गेलो आणि त्या नादात माझ्याकडून ही चूक घडली !'' खिशातून ५० रु. ची नोट काढत तो म्हणाला, ''बूँदसे गयी वो हौदसे नही आती,'' असे म्हणतात ते मला माहीत आहे; पण एकवार क्षमा करा; एवढे पैसे पुरतील का ?''

ताई हसल्या; म्हणाल्या ''तुमच्या चेहऱ्यावरून मला तुमच्या खरेपणाची खात्री झाली. इतके सुंदर संस्कार सुखासुखी एका दिवसात येत नाहीत. लहानपणीच त्यांची खूप मशागत झालेली असते. तुम्ही फार भाग्यवान दिसता. या मुलांच्या वयात तुम्ही कुठे होतात ?''

''मला आठवत नाही आणि माहीतही नाही, पण निरागस मुलात रमून जावेसे वाटते हे मात्र खरे. असो. माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलंत ?''

ताई परत हसल्या; म्हणाल्या, ''पुरतील-नाही पुरले तर मी माझे स्वत:चे पैसे घालीन पण- खरं सांगू ? तुमच्यासारख्या गोड स्वभावाची माणसं आमचं काम पहायला आली, यातच आमच्या साऱ्या श्रमांचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. आम्ही खूप सण, समारंभ, प्रसंग साजरे करतो. त्या सगळ्यांमागे एकच विचारधारा असते. ही सगळी निरागस मुलं मोठेपणी उत्तम नागरिक बनतील. साऱ्या समाजाविषयी त्यांच्या मनात फार आपुलकी असेल आणि समाजाच्या आणि देशाच्या भल्यासाठी त्याग करायला त्यांची तयारी असेल यासाठी प्रयत्न करणे !''

कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात त्या दोघांनाही सन्मानाने शेजारच्या मोठ्या वर्गखोलीत नेण्यात आले. काकांना काही सांगण्याची विनंती करण्यात आली. काकांनी समोरच्या मुलांना समजेल आणि भावेल अशी, मुंगी आणि पारव्याची गोष्ट सांगितली. ते दोघेही एकमेकाला मदत करतात. संकटकाळी दोघे संकटातून एकमेकांना कसे वाचवतात ती गोष्ट काकांनी सोप्या भाषेत सांगितली न् ते मुलांना म्हणाले, ''पारव्यानं कुणाला मदत केली ?'' ''मुंगीला.'' ''मग मुंगीनं संकटातून कुणाला वाचवलं ?'' ''पारव्याला.''

''छान. तशीच आपण एकमेकांना मदत-'' ''करायची'' सगळ्यांचा मोठा आवाज. मग काका पुन्हा म्हणाले, ''आपण एकमेकांना मदत- ''करायची'' मुलांच्या आवाजाने वर्ग दणाणून गेला. ''छान. तुम्ही खूप चांगली मुलं आहात. आता तुमच्या ताई तुम्हाला सांगतील तसं करा !''

दोघे घरी परतले. काकांचा धाकटा मुलगा सतीश नुकताच घरी आला होता.

''सतीश, हा तुझा दादा बरं का - श्री, श्रीनिवास. साखरेसारखा गोड स्वभावाचा आहे.''

सतीश श्रीनिवासला खाली वाकून नमस्कार करू लागला. त्याला वाकू न देता श्रीनिवासने त्याला खांदे धरून उभं केलं. काका हसून म्हणाले, ''हा ही पाकोळीत होता बरं का. आता वर्धिनीत



विविध अनुभव देण्याचा प्रयत्न केल्यास शिक्षणातला एकसुरीपणा कमी होतो.

मोठ्या धडाक्यानं कामं करतो, जबाबदाऱ्या उचलतो.''

''तू खरा भाग्यवान, सतीश ! 'पाकोळी'तले संस्कार आणि वातावरण मला फार आवडले. अशा सुंदर कल्पना आणि भावना यांची देणगीच तुला इथे मिळाली. आज तिथल्या ताईदेखील किती प्रेमाने मुलांशी बोलत होत्या. मला वाटतं सुंदर जगण्याचे हे सुंदर शिक्षण आहे ! प्रश्न एव्हढाच आहे की इतक्या लहान वयातल्या गोष्टी मुलांना कशा आठवणार ? माझंच बघ ना ! मला कुठे माझं हे बालपण आठवतंय ! मग या वयातल्या सांगीप्रमाणे आम्ही कसे वागणार ?''

''मला विचारशील तर मला थोडं वेगळं सांगावंसं वाटतं. मनापासून शिकलेलं आणि शिकवलेलं कधी वाया जात नाही. या लहान वयात मुलं इतकी निरागस, इतकी शुद्ध मनाची असतात की चांगली शिकवणूक त्यांच्या मनावर कायमची कोरली जाते. अन् मग आठवण्याचा प्रश्नच उरत नाही. वागणं आपोआपच तसं होतं ! आज माझा सतीश पक्षी आहे पण लवकरच तो गरुडासारखी कर्तबगारीची झेप घेणार उंच भरारी घेणार यात मला मुळीच शंका वाटत नाही.'' ''नक्की, जाणारच जाणार ! आणि श्रीनिवास दादासुद्धा अशीच उंच भरारी घेणारच ! दादा, तू येण्यापूर्वी बाबा तुझ्याविषयी इतकं छान छान बोलत होते ! तुला कधी भेटीन असं झालं होतं. दादा खरंच आपण दोघेही गरुडासारखी उंच भरारी घेऊ एकमेकांत हात गुंफून !''

''पाकोळीच्या मखमली नाजूक पंखांनी हे (मोठं) बळ तुला दिलंय सतीश !''

''आणि तुलाही–श्री !''

''मला ?''

''हो ! आज तेथे मुलांनी रांगेने लावलेले जोडे पाहिलेस ना – तुझ्या जोडे नीट लावण्याच्या सवयीचं मूळ तिथे आहे श्री ! बापूंनी आपल्या पत्रात तुला पाकोळीचं काम दाखवण्याची विनंती केली होती. मी वर्धिनीत फोन केला. तिथे त्यांनी मला एक पाकीट दिलंय.'' त्यांनी एक पाकीट श्रीनिवासपुढे केले. ते हातात घेऊन श्रीनिवास म्हणाला,

''मी उघडू ना ? काय आहे त्यात – आपले आभार ?''

''मला माहीत नाही. तूच बघ!''

श्रीनिवासने पाकीट उघडले. तो आश्चर्याने थक्क झाला. ''मी इथे–इथे होतो ?''

त्याचा गळा दाटून आला. फोटोत एक चिमखडा हसरा मुलगा पालखीचा दांडा खांद्यावर घेऊन उभा होता. फोटोखाली लिहिले होते.

''चि. श्रीनिवास सदानंद घाटगे. वय ४ वर्षे.''

**– श्री. रघुनाथ नरवणे सर (कथा)**

❖ ❖ ❖

# मुले बदललीत; आपण बदलू या !

**गोमंतक बालशिक्षण परिषदेच्या फोंडा येथे झालेल्या अधिवेशनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. रमेश पानसे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी केलेल्या भाषणाचा हा सारांश :**

गोव्यामध्ये शिक्षणातील परिवर्तनाची नांदी, बालशाळांमधील आचार विचाराच्या पायाभूत बदलांतून होत आहे, आणि त्यात गोमंतक बालशिक्षण परिषद महत्त्वाची भूमिका बजावीत आहे, याबद्दल मी मनापासून परिषदेचे अभिनंदन करीत आहे. याचबरोबर अशी अपेक्षाही व्यक्त करीत आहे की गोमंतक बालशिक्षण परिषदेने गोव्यात सर्वदूर आपले पंख पसरावेत आणि 'शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' हा मंत्र घेऊन, गोव्यातील प्रत्येक बालक याचा लाभ घेईल असे पाहावे.

आजच्या माझ्या ह्या उद्‌घाटनपर भाषणात एका नव्या विचाराकडे आपले लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकांत गिजुभाई बधेका, ताराबाई मोडक आणि सरलादेवी साराभाई यांनी, या देशाला शास्त्रीय बालशिक्षणाची पहिली-वहिली ओळख करून दिली; आपापल्या परीने कार्याचा विचार व विस्तारही केला. त्यामुळे आज भारताला बालशिक्षण नवीन राहिलेले नाही. देशभरच बालशिक्षण आचरणात आणले जात आहे.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीस बालशिक्षणाची नांदी करताना या बालशिक्षणातील प्रणेत्यांसमोर असणारे बालक हे, अर्थातच विसाव्या शतकाच्या सुरूवातीचे बालक होते, बालकाचे शिक्षण करण्याच्या पद्धती त्या काळात मान्य अशा होत्या; बालकाविषयीचा प्रौढांचा आणि एकूण समाजाचा दृष्टिकोनही त्या काळाला साजेसा असाच होता; परंतु आज, एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस, आपल्यासमोर असणारे बालक हे अगदीच वेगळे आहे. त्यामुळे, त्याच्या शिक्षणाचा जो काही विचार करतो आहोत, त्यातही बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. आणि मुख्य म्हणजे, या 'नव्या' 'बालकां'विषयीचा 'नवा दृष्टिकोन' आपण स्वीकारण्याची गरज आहे. साहजिकच, या नव्या दृष्टिकोनातून नवे बालशिक्षण उभारण्यासाठी आपल्याला आपली तयारी करायची आहे.

विसाव्या शतकातले बालक सामाजिकदृष्ट्या, तत्कालीन नितीनियम, रुढींच्या प्रभावाखाली असलेले, धार्मिक परंपरांखाली दबलेले, सांस्कृतिकदृष्ट्या मर्यादित आणि ठराविक-तेच तेच अनुभव प्राप्त करणारे, कौटुंबिक पुरुषप्रधान, प्रौढकेंद्री वातावरणात उपदेशामृत पिणारे, शाळांमधून सैनिकी स्वरूपाच्या शिस्तीखाली दबलेले आणि परिसरात केवळ गृहित धरलेले असे होते. या बालकाला स्वत:च्या आचार-विचारांचे फारसे स्वातंत्र्य नव्हते. त्याचे दैनंदिन व्यवहार कुटुंबाने ठरवून दिलेले

आणि शाळेत विशिष्ट अभ्यासक्रमाने व क्रमिक पुस्तकाने बंदिस्त केलेले होते. त्याचे शिकणे हे केवळ अभ्यासाक्रमांतील विषयांचे नि शिक्षकांच्या शिकविण्यावर अवलंबून असलेले असे होते. शाळेत नि घरीसुद्धा 'गप्प बसा', 'अभ्यास करा' आणि 'हुंदडू नका' या प्रौढांच्या मार्गदर्शक संस्कृतीने बालकाचा विकासक्रम चालत होता. आपल्या आवडी-निवडीने वागण्याची फारशी मोकळीक नव्हती. प्रत्येक बालक हे एकूण सर्व बालकांसारखेच पण, कमी-अधिक बुद्धिमत्ता मात्र प्राप्त केलेले असे मानले जात होते. मनाने अजाण, बुद्धिने 'कोरी पाटी' आणि भावनेने दुर्लक्षित असे हे विसाव्या शतकात वावरणारे बालक होते. बालकाच्या अंतर्गत मनाचा, त्याच्या मेंदूचा फारसा थांगपत्ता लागलेला नसल्यामुळे, बालकाच्या बाह्य वर्तुणुकीलाच सर्वतोपरी वळण लावण्याचा प्रयत्न, हाच बालकाच्या शिक्षणाचा प्रधान हेतू मानलेला होता.

एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस, बालकाचे एक वेगळेच स्वरूप, एक वेगळेच चित्र आपल्यासमोर उभे ठाकते आहे. विसाव्या शतकात उपलब्ध नव्हती, अशी बालकाबाबतची कितीतरी नवीन माहिती आज आपल्याला मिळाली आहे. त्यामुळे आजचे बालक हे एक पूर्वीपेक्षा वेगळे असे 'नवे बालक' आपल्यापुढे आहे. त्याच्या नैसर्गिक क्षमता त्याच्या गरजा, त्याच्या आवडी-निवडी, बुद्धिमत्ता, त्याची भावनिक ता, त्याचा आकलन वेग अशा कितीतरी नव्या गोष्टींचा विचार करूनच त्याच्या शिक्षणाची तजवीज आपल्याला करायची आहे.

१९५० च्या दशकात पियाजेच्या संशोधनाला स्थिरता आली. त्याचे बालकाविषयीचे मानसशास्त्रीय आडाखे, बालकाविषयीची वेगळी दृष्टी देते. बालक ही प्रौढांची लहान प्रतिकृती नसते तर बालक हे प्रौढांपेक्षा गुणात्कमदृष्ट्या वेगळे असते. मुलाच्या बौद्धिकतेचा विकास हा त्याच्या टप्प्याटप्प्याने तयार होत जाणाऱ्या शारीरिक परिपक्वतेशी संबंधित असतो; आणि हे वयोमानानुसार असणारे बौद्धिकतेचे टप्पे असे असतात की प्रत्येक मूल या टप्प्यांतून पायरी-पायरीने जातच असते. या बाबतीत जगातील सर्वच मुले समान असतात. पण, असे जरी असले तरी प्रत्येक बालकाची, विशिष्ट वेळची, विशिष्ट बाबतीतली स्थिती नि गती वेगवेगळी असते, आणि या बाबतीत प्रत्येक बालक भिन्न असते. ही अशाप्रकारची आणि पुन्हा प्रत्येक बालक शिकते कसे, याबाबतची खूपशी नवी माहिती पियाजेचे संशोधन आपल्याला पुरवते.

अगदी बाल्यावस्थेतील मुले, जन्मल्यापासूनच जगाची ओळख करून घेतात ती स्वत:च्या उत्स्फूर्त नि आजूबाजूच्या जगाशी होणाऱ्या नैसर्गिक क्रिया-प्रतिक्रियांतून. पुढे वाढत्या वयाबरोबर अधिक गुंतागुंतीच्या आकलनविषयक संरचना यांतूनच तयार होत जातात आणि मग मुले वाढत्या अमूर्त स्तरांवरच्या मानसक्रिया उपजत पद्धतीने करू लागतात. आपल्या उपजत सामर्थ्यानिशी व्याकरणासहित स्पष्ट भाषेत समजले त्याची अभिव्यक्तीही करू शकतात. अशाप्रकारे, मुले ही आपली

आपणच जगाची ओळख करून घेतात आणि आपल्या कृतिशीलतेने स्वत:चे प्रश्न स्वत:च सोडवत जातात. पियाजेच्या संशोधनांतून झालेली बालकाची ही ओळख जगाला नवी होती; तोवरच्या समाजाच्या बालकाविषयीच्या संकल्पनेशी ही ओळख मिळती-जुळती नव्हती.

१९७०-८० च्या दशकांत, दुसरा एक मानसशास्त्रज्ञ ब्रुनर याने, बालक शिकते कसे याबाबतच्या ज्ञानात एक पाऊल पुढे टाकले. मुले जगाची ओळख करून घेतात, याचाच अर्थ असा की, की याबाबतच्या प्रतिमा स्वत:च निर्माण करीत जातात, विस्तारतात किंवा बदलताततही. ही प्रक्रिया त्यांच्या मानसपातळीवर तीन तऱ्हांनी घडून येते. मुले आपल्या अनुभवांचे रुपांतर ज्ञानात करतात ते स्वत:च्या कृतींद्वारे, किंवा मानसपातळीवर चित्रांकित करून अथवा कालांतराने चिन्हांकित भाषा अवगत करून, ब्रुनरने, मुलांच्या ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत असलेले समाज-संस्कृतीचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.

याच काळात, लहान मुले, कुणीही न शिकविता, अतिशय वेगाने आणि व्याकरणासहित आपली पहिली भाषा कशी आत्मसात करतात, हे चॉम्स्कीने आपल्या संशोधनातून नेटकेपणाने दाखवून दिले. चॉम्स्कीने, बालकाच्या मेंदूमध्ये उपजतच वसलेल्या भाषा आत्मसात करण्याच्या क्षमतांवर आपल्या विवेचनात जोर दिला तर ब्रुनरने त्याला, मुलाच्या भाषा शिक्षणात सहाय्यक असलेल्या सामाजिक व्यवस्थेची जोड दिली. पुढे मेंदू संशोधनातून भाषा आत्मसात होण्याच्या बालकाच्या अंतर्गत प्रक्रियेवर अधिक प्रकाश पडला.

आता, मुलांच्या भाषा आत्मसात करण्याच्या नैसर्गिक प्रक्रिया आणि शिकण्याच्या प्रक्रिया माहीत होऊन, त्यावर मेंदू संशोधनाने शिक्कामोर्तबही केले आहे. त्यामुळे आपल्यासमोर असणारे बालक हे 'मातीचा गोळा' अथवा 'कोरी पाटी' नाही, हे आपणास ज्ञात झाले आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक बालक-म्हणजे त्याचा मेंदू-शोधप्रवृत्ती व शोधक्षमता घेऊन आला आहे. आणि याच्या सहाय्याने बालक ज्ञानाची रचना स्वत:च करू शकते, हेही निश्चितपणे कळले आहे.

१९८० च्या दशकातच, गार्डनर यांचा बहुविध बुद्धिमत्तांचा विचार ठळकपणे सिद्धांत स्वरूपात पुढे आला आणि त्याने जुन्या बुद्धिमत्तेबाबतच्या, सार्वत्रिकरित्या स्वीकारल्या गेलेल्या संकल्पनेला मुळातूनच उखडून काढले आहे. बुद्धिमत्ता एक नसून अनेक असतात, आणि प्रत्येकच बालक कोणत्या ना कोणत्या बाबतीत बुद्धिमान असते असे गार्डनरने मांडले आहे. प्रत्येकालाच बुद्धिमत्तांचा विशिष्ट पट प्राप्त झालेला असतो, पण, प्रत्येकाचा हा पट दुसऱ्यापेक्षा वेगळा असतो. त्यामुळे एक बालक दुसऱ्यासारखे नसते. तरीही प्रत्येक बालक हुशार असते मात्र प्रत्येकाची हुशारी भिन्न क्षेत्रांत असते हे आता आपल्याला माहीत झाले आहे.

१९९० च्या दशकाला 'मेंदू संशोधनाचे दशक' म्हणून संबोधले जाते. या व नंतरच्या म्हणजे

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात मेंदूविषयक संशोधनांना वेग आला, इतकेच नव्हे तर त्याचा बालकाच्या विकासाशी आणि शिक्षणाशी संबंध बांधणारे तात्त्विक व व्यावहारिक विवेचन होऊ लागले. 'मेंदूविकासक शिक्षण', 'मेंदूआधारित शिक्षण', 'मेंदूपूरक शिक्षण', 'मेंदू विघातक शिक्षण', अशा नवसंकल्पना शिक्षणात येऊन स्थिरावू लागल्या. मेंदू हा माणसाचा शिकण्याचा अवयव आहे हे स्पष्ट होऊन, मेंदूचा शिक्षणावर होणारा परिणाम आणि शिक्षणाचा मेंदूवर होणारा परिणाम या दोन दिशांनी बालकाच्या शिक्षणाचा विचार आज होत आहे.

एक ठळक उदाहरण घेता येईल. याच, विसाव्या शतकाच्या अखेरच्या काही वर्षांमध्ये बालकाच्या शिक्षणात त्याच्या भावनांचे स्थान महत्त्वाचे असते असे दिसून आले आहे. मूल शिकायला प्रवृत्त होते, ते मुळी भावनेने ते अस्थिर नसेल तरच. शिवाय त्याच्या शिकण्याच्या किंवा त्याला शिकविण्याच्या पद्धती अशा असल्या पाहिजे की, ज्यामुळे त्याच्यावर भावनिक आघात होता कामा नयेत. बालकाचे मन स्थिर असेल, त्याला शिकण्यात काहीतरी आपणहून करायला मिळणार असेल, त्याच्यापुढे सतत काही काही नवे शिकण्याची छोटी छोटी आव्हाने असतील, तर मुलांचे शिकणे आनंदमय होते. अशा साऱ्या माहितीतून आपल्यापुढे आनंदाने शिकणारे आणि शिकण्यात आनंद घेणारे बालक, हे या नव्या युगाचे बालक म्हणून आपल्यासमोर उभे राहते.

आजच्या तंत्रज्ञानाच्या, शास्त्रज्ञानाच्या आणि गुंतागुंतीच्या सामाजिक वातावरणात आजचे बालक हे उद्याच्या त्याच्या जीवनासाठी, जर शिक्षणातून घडणार असेल तर हे शिक्षण कशाकरता नि कसे असेल याविषयी हॉवर्ड गार्डनर यांनी केलेली एक टिप्पणी मला दिशादर्शक वाटते आहे. गार्डनर लिहितात, ''मला मुलांनी जगाचे आकलन करून घ्यायला हवे आहे. पण ते केवळ जग आकर्षक आहे आणि मानवी उत्सुकतेने भरले आहे म्हणून नव्हे, तर जग अधिक चांगले बनविण्याची पात्रता त्यांच्यामध्ये यावी म्हणून त्यांनी ते समजून घेतले पाहिजे. ज्ञान आणि नैतिकता एक नाहीत, पण, आपल्याला पूर्वीच्या चुका वगळून अधिक उत्पादक दिशेने जायचे असेल तर दोन्हींची आवश्यकता आहे. जगाच्या आकलनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे, आपण कोण आहोत आणि आपण काय करू शकतो हे समजून घेणे. अखेरीस, आपण आपल्या ज्ञानाचे सार आपल्यासाठीच काढले पाहिजे. या आपल्या आकलनाच्या आधारेच, या अपूर्ण जगात ज्ञानाचा उपयोग बरे किंवा वाईट घडविण्यासाठी आपल्याकडून केला जाणार आहे.''

बालकाच्या उद्याच्या जीवनाला वळण लावण्याची जबाबदारी त्याच्या आजच्या शिक्षणाने पेलायची असेल, तर त्यासाठी शिक्षणरचना ठरविण्याची जबाबदारी आपण घ्यायला हवी आहे. ही शिक्षणरचना कशी असावी, याची काही सूत्रे मी आपल्यापुढे ठेवू शकेन.

पहिली गोष्ट अशी की, बौद्धिकता आणि नैतिकता म्हणजेच, ज्ञान आणि नीती हातात घालून

जाईल, अशी शिक्षणरचना आपल्याला करावी लागणार आहे. त्याकरिता शाळांमधील विषयांच्या शिक्षणाला मूल्यशिक्षणाचे कोंदण असावे लागेल.

वेगवेगळ्या विषयांचे पायाभूत आकलन विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमतांचे आकलन शिक्षकांना असेल अशी शिक्षणरचना आता आपल्याला हवी आहे.

मुलांची सामाजिक एकता आणि वैयक्तिक भिन्नता यांचा एकत्रित विचार असणारी शिक्षणरचना आपल्याला बांधायला हवी.

लोकशाहीतील सुजाण नागरिकत्वाचे, निसर्गातील विविधता व पर्यावरणाची शुद्धता सांभाळण्याचे आणि संस्कृतीच्या विविधतेचा आदर ठेवून, विश्वशांतीचे स्वप्न पाहण्याचे उद्दिष्ट शिक्षणाला आपल्यापुढे ठेवावे लागेल.

ही सूत्रे लक्षात घेऊन, एकूण शिक्षणाचे स्वरूप आपण नव्याने ठरवायला हवे आहे. आणि त्याची सुरुवात बालशिक्षणापासून करायला हवी आहे. नव्या शतकाच्या, नव्या बालकाचे नवे शिक्षण अंमलात आणायचे असेल तर पालकांनाही ही नवी दृष्टी देण्यासाठी, त्यांचे प्रबोधन करीत राहावे लागणार आहे. पालक-प्रबोधनाची नवी दिशा घेऊन गोमंतक बालशिक्षण परिषदेने आपले कार्य विस्तारण्याची गरज आहे.

**- श्री. रमेश पानसे**

## ॐ नमस्ते गणपतये...

सोमवार पेठेतील सूर्योदय मंडळाने गणेशजन्माच्या निमित्ताने कार्यक्रम ठरवला होता. यामध्ये सकाळी ७ वाजता अथर्वशीर्षाने कार्यक्रमाची सुरुवात करायची असे ठरले. अथर्वशीर्ष कोणाला म्हणायला सांगावे अशी चर्चा चालू असताना त्यांना कोणीतरी सांगितले की, वर्धिनीच्या बालवाडीतील विद्यार्थी स्पष्ट उच्चारात अथर्वशीर्ष म्हणतात. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्सुकतेने वर्धिनीशी संपर्क साधला व या कार्यक्रमाला बालवाडीच्या मोठ्या गटाला घेऊन जायचे ठरले.

बालवाडीतील 'पाकोळ्या' सकाळी स्वच्छ आंघोळ करून आपल्या पालकांसह उपस्थित झाल्या. बरोबर सात वाजता अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम सुरू झाला. सलग अकरा वेळा अथर्वशीर्ष म्हणून मगच हा गट थांबला. या बालकांचे स्पष्ट उच्चार, आत्मविश्वास, लयबद्धता याचा विलक्षण प्रभाव परिसरात जाणवत होता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या बालचमूचे खूप कौतुक केले. सर्वांना भरपूर प्रसाद दिला व वर्धिनीलाही रु. ५०१/- ची देणगी दिली.



**मला काय जमतं व काय जमत नाही हे समजणे म्हणजे स्वत:ला ओळखणे आणि हे सर्वात महत्त्वाचं शिक्षण आहे.**

## मातृभाषेला बनवा ज्ञानभाषा

**भा**षा ही मानवी व्यवहारातला एक अत्यंत प्रभुत्व घटक आहे. आपल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील सर्व गोष्टींचा आधार भाषा असते. ती खरे तर जीवनव्यवहार सुरळीत ठेवणारी अशी प्रमुख घटक आहे. जीवनव्यवहाराचे सर्वोत्तम साधन आहे. भाषेच्या विकासावरच व्यक्तित्वाचा विकास, त्या त्या प्रदेशातील लोकसमूहाचा विकास अवलंबून असतो. कारण भाषा हे आपल्या मनातील विचारांची संवादवाहक असते. एखाद्या व्यक्तीचा सर्वांगीण विकास भाषेच्या विकासाशिवाय शक्य होत नाही.

भाषा ज्ञानार्जन, अर्थार्जन, उद्योग, कला, शास्त्र यांच्याशी निगडीत असते. सुसंवादी असते. माणसाच्या खाण्यापिण्याच्या गरजेपासून ते कलास्वादाच्या गरजेपर्यंत. त्याहीपलीकडे जाऊन आध्यात्मिक उन्नयनापर्यंत भाषाच जास्तीत जास्ती उपयोगी ठरते. ज्ञानदेव म्हणतातच ना –

**वाचे बरवे कवित्व, कवित्वी बरवे रसिकत्व । रसिकत्वी परतत्त्व, स्पर्शू ऐसे ।।**

माणूस जन्मल्यानंतर आपल्या शारीरिक गरजा भागविण्यासाठी अनुकरणातून भाषा शिकायला लागतो. ह्या शिकवण्यात त्याचे घर, घरातली माणसे, आजूबाजूचा परिसर, त्यात बोलली जाणारी भाषा यांचा फार मोठा वाटा असतो. विशेषत: जी आई आपले लाडाने पालन-पोषण, संगोपन करते तिची भाषा म्हणजेच मातृभाषा त्याच्या कानावर सहज पडते आणि त्या भाषेवर त्याला प्रभुत्व मिळवणे सहज शक्य होते. ज्या गोष्टीवर आपण सहज प्रभुत्व मिळवू शकतो, ती गोष्ट आपल्याला अधिक सुकर, सोयीची आणि सौंदर्यपूर्णही वाटू लागते. मातृभाषेचेही हेच होते. मग त्यात, आपल्या भावभावनांचा आविष्कार करणे, त्या भाषेत आपण अभिव्यक्त होणे, त्या भाषेचा आधार घेत काही नवनिर्मिती साधणे या गोष्टी सहज शक्य होत असतात. त्यात अभिव्यक्त होताना एक अननुभूत आनंद होत असतो. ती भाषा चांगल्या प्रकारे हाताळता आली तर आपले व्यक्तिमत्त्वही चहूबाजूंनी फुलून येणे शक्य असते.

पण आज आपल्या जीवनात विविधांगांनी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आपल्या मातृभाषेसमोर म्हणजेच मराठीसमोर अनेक प्रश्नचिन्हे उभी आहेत. स्वभाषेचे महत्त्व ज्ञानदेवांनी आणि खरे तर सर्वच संत प्रभावळींनी वर्णिले आहे.

**माझी मऱ्हाठीची बोल कौतुके, परी अमृतातेहि पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।।**

अशी जणू प्रतिज्ञाच करून ज्ञानदेवांनी संस्कृतात बद्ध असलेलं तत्त्वज्ञान प्राकृतात आणले. इतकी शतके उलटून गेली तरी ज्ञानेश्वर सर्व मराठी भाषिकांना वंदनीय आहेत.

पण आज आपण आपल्या मुलांना या माय मराठीपासूनच लांब ठेवू बघत आहोत. २०१२ च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''साहित्य हे मानवी संवेदनांना जागवणारे असते... जगातल्या जीवजंतूंविषयी आत्मीयता वाटणे, आपले आणि इतरांचे जगणे सुंदर करावेसे वाटणे हा साहित्याचा, कलांचा संस्कार असतो. अशा

अनुभवांपासून आपल्या मुलांना तोडून टाकणारी शिक्षणपद्धती आपण चालवली आहे. भाषा, साहित्य, कला यांच्यापासून मुलांना तोडू नका.''

आज अट्टाहासाने मराठी भाषेपासून तोडून इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालणाऱ्या पालकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की ते फक्त मराठी भाषेपासूनच आपल्या मुलांना लांब नेत नसतात तर आपल्या संस्कृतीपासूनही त्यांची नाळ कापून टाकायला बघत असतात. आज साधारणत: १५ ते २० टक्के विद्यार्थी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जात आहेत; पण दिवसेंदिवस हे प्रमाण वाढताना दिसत आहे.

असे का घडावे? सरकारी धोरणामुळे? उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकणे आवश्यकच आहे, असे वाटल्यामुळे ? का आमचीच मानसिकता ?

उत्तरे विविध पातळ्यांवर वेगवेगळी आहेत; पण हे इंग्रजी माध्यमाचे लोण आता अगदी आदिवासी पाड्यांपर्यंत पोहोचू बघत आहे आणि ही चिंतेची बाब आहे. मराठी माध्यमांच्या शाळा ओस पडत आहेत. तालुका पातळीपर्यंतही अंगणवाडीपासूनच इंग्रजी माध्यमाच्या शाळा पालकांना आकर्षित करत आहेत. मराठी लोकांच्या हक्काच्या महाराष्ट्रातच मराठी राज्यकर्ते मराठी माध्यमाच्या शाळांच्या उभारणीत अडथळे उत्पन्न करीत आहेत. पालक याला फशी पडताहेत. परिणामी नुकसान होणार आहे आणि होत आहे ते भारताच्या भावी भविष्याची धुरा ज्यांच्या खांद्यावर आहे त्या विद्यार्थ्यांचे आणि परिणामी भारताचेसुद्धा. जागतिकीकरणाचा बागुलबुवा, आधुनिक तंत्रज्ञानाचा राक्षस आज आपल्या मायमराठीला गिळंकृत करू बघतो आहे. या सर्वांतून आपली मायमराठी मुक्त करण्यासाठी आता आपणच जाणीवपूर्वक आणि सत्वर उपाययोजना करणे गरजेचे आहे. जोवर मराठीच्या विविध बोली बोलल्या जात आहेत, मराठीत अजूनही कामकाज, व्यवहार चालू आहेत आणि नाही म्हटले तरी मराठी माध्यमाच्या शाळा चालू आहेत, तोवरच त्वरेनी पावले उचलायला हवीत.

आज अनेक कलावंत, शास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, थोर नेते, वक्ते यांनी सर्वांनी स्वभाषेतून शिक्षण घेतल्याची, मातृभाषेतून शिक्षण घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपण ती जरूर बघावीत. भोवतालच्या परिस्थितीतून स्वाभाविकपणे शिकलेली, अनेक शब्द संपत्ती आत्मसात केलेली मातृभाषाच आपल्या शिक्षणासाठी योग्य माध्यम ठरू शकते. हे वेगळे सांगायला नकोच. जपान, रशिया, फ्रान्स, चीन, स्पेन, इटली, जर्मनी कितीतरी पुढे आलेल्या देशांची नावे सांगता येतील की, ज्या देशातून आजमितीला सर्व पातळ्यांवरील विविध ज्ञान मातृभाषेतूनच मिळते. खरे तर मातृभाषाच ज्ञानभाषा होऊ शकते हे या देशांनी सिद्ध करून दाखवले आहे. आपणच फक्त इंग्रजीच्या कुबड्या वापरून आपल्याला अपंग करू बघत आहोत.

हे अपंगत्व जर झुगारून द्यायचे असेल तर राज्य सरकारचे धोरण अधिक ठाशीव स्वरूपात आखले जायला हवे व ह्या धोरणाने मराठीच्या जतन, संवर्धन, विकासाचा वसा अंगिकारायला हवा.

पालकांनी आपली चुकीच्या दिशेला जाऊ बघणारी मानसिकता सुधारून घ्यायला हवी. इंग्रजी येणे हेच श्रेष्ठ दर्जाचे आहे आणि मराठीतून शिकणे हे निकृष्ट दर्जाचे आहे, हे मानण्याचे काहीच कारण नाही. समाजधुरीण, कलावंत लेखक यांनी आपापल्या परीने आपल्या मातृभाषेसाठी आपले योगदान देणे आवश्यक आहे. माधव जूलियन यांनी आपल्या कवितेत म्हटल्याप्रमाणे ‘हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू, हिला बैसवू वैभवाच्या शिरी’ असे म्हटल्याशिवाय आणि कृतिप्रवण झाल्याशिवाय मराठीची मान उंचावणे शक्य नाही. कुसुमाग्रजांनी जागतिक संमेलनाच्या व्यासपीठावरून केलेल्या भाषणानुसार आपण हे ध्यानात ठेवायला हवे की, ‘आज इंग्रजी ही जगाची ज्ञानभाषा आहे. तिचा तिरस्कार नको; पण स्वभाषेवरील प्रेमही अबाधित राहिले पाहिजे. घराला खिडक्या इंग्रजीच्या चालतील पण छप्पर मराठीचेच हवे.’

आज तरी मराठी भाषेला खऱ्या अर्थाने राजभाषेचा दर्जा मिळवून द्यायचा असेल आणि तिला परत वैभवाचा काळ आणायचा असेल तर मराठी माणसांनी आपल्या मातृभाषेविषयीची आपली मानसिकता सुधारण्याचीही गरज आहे. तिच्याविषयीची आपली न्यूनगंडाची असलेली भाषा, स्वाभिमानाने जागवली पाहिजे. याचबरोबर विद्यापीठातील शिक्षणपद्धती, ज्ञानसंपादनाची भाषा म्हणून मातृभाषेची कास धरणे, मराठी भाषा केवळ ज्ञानवाहक म्हणून न  राहता ज्ञानोत्पादक कशी होईल त्यासाठीचे प्रयत्न व्हायला हवेत. शासकीय पातळीवर सर्वत्र सुलभ आणि सुगम मराठीचा उपयोग कसा वाढवता येईल त्याचा आस्थेने विचार व्हायला हवा. त्यासाठी इंग्रजीला पर्यायी शब्द कसे तयार होतील जे सुगम पद्धतीने सहज वापरात यायला किंवा आणायला फार अडचण पडणार नाही, ते बघितले पाहिजे. यासाठी बोलींचे जतन करणे, कोषनिर्मिती, उत्तम कला निर्मिती प्रकल्प राबविले गेले पाहिजेत. मराठी विकसित होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान मराठीतून उपलब्ध होणेही अत्यंत गरजेचे आहे. त्याद्वारे मराठीतील उपलब्ध होणेही अत्यंत गरजेचे त्याद्वारे मराठीतील उत्तम साहित्य इंग्रजी आणि जगभरच्या इतर भाषांतून अनुवादित होणेही आवश्यक आहे.

आपला देश कृषिप्रधान देश आहे. येथे इंग्रजांची संस्कृती रुजणार कशी? आपल्या संस्कृतीची पाळेमुळेच आपल्या भाषेत असतात. साधेच उदाहरण द्यायचे तर मान्सूनच्या लहरीपणामुळे आकाशाकडे डोळे लावून बसणारा शेतकरी आमच्या मनात रुजणार तो ‘येरे येरे पावसा’ या बालपणी शिकलेल्या गाण्यातून पण आमची मुले मात्र आज इंग्रजी माध्यमाच्या शाळेत बूट आणि टाय लावून जात आहेत आणि बरोब्बर याच्या विरुद्ध भावनेचे गीत गात आहेत. "Rain rain go away, come again another day' या गीतामुळे आमचे लहानगे मूल नकळत आपल्या भाषेपासूनच नाही तर आपल्या देशाच्या संस्कृतीपासून आणि परिणामी देशापासूनही तुटत आहे. हे ध्यानात घ्यायला नको काय ?

**– डॉ. माधवी वैद्य**

❖ ❖ ❖



पाकोळी बालवाडीतील 'पाकोळ्या' १९९१-९२



रौप्यमहोत्सवी वर्ष २०१२-१३



माजी विद्यार्थी विद्यार्थिनी



विठूचा गजर हरिनामाचा



होत्या छोट्या वर्धिका, झाल्या आता कार्यकर्त्या



जादूच्या नगरीत या हो या!



गोंधळाला या आईच्या गोंधळाला या



सोहळा स्वातंत्र्यदिनाचा



वऱ्हाडी वाजंत्री बाहुलीच्या लग्नाची



लग्न माझ्या बाहुलीचं

चला उड्या मारू या, आपली 'उंची' वाढवू या





सगळे मिळून भेळ करूया.



वटपौर्णिमेनिमित्त वृक्ष दिंडी

भक्तिरंगात रंगतो हरि





चल ग सखे वारूळाला

संघटन गढे चलो, सुपंथ पर बढे चलो..



## संस्कारांची अष्टपदी

**''आईने आपल्या मुलाला कुशीत घ्यावं म्हणजे त्याला समजेल की हे जग आपलं आहे ! नि बाबांनी त्याला शिखर दाखवावं म्हणजे त्याला समजेल की हे जग जिंकण्यासाठीही आहे !''**

कवितेच्या या चार ओळी किती सुंदर आणि अर्थपूर्ण आहेत, नाही का ? आईबाबाचं आपल्या मुलासंबंधीचं नेमकं कर्तव्य कोणतं याचं फार छान वर्णन या कवितेत सापडतं.

आईनं मुलाला कुशीत घ्यावं याचा अर्थ हाच की, जगाबद्दलची सारी भावनिक सत्यं त्याला नीट समजावून सांगावीत. जगाबद्दल त्याच्या मनात आपुलकी निर्माण करावी, नातेसंबंध शिकवावेत, कर्तव्याची जाणीव द्यावी. माणसामाणसांमधील संबंधांचं महत्त्व सांगावं. वडिलांनी शिखर दाखवावं म्हणजेच महत्त्वाकांक्षा शिकवावी, आपल्या कर्तृत्त्वाच्या बळावर हे जग जिंकायचं कसं ते सांगावं! थोडक्यात, आईबाबांनीच आपल्या पाल्यावर चांगले संस्कार करणं गरजेचं आहे-हेच या कवितेतून फार सुंदरपणे नि हळुवारपणे सांगितलं आहे.

आज मुळात अनेक आई-बाबांसमोर असा प्रश्न आहे की, नेमके संस्कार करायचे म्हणजे करायचं तरी काय? या प्रश्नाचं उत्तर हेच की, संस्कार म्हणजे व्यक्तिविकासाला मदत करू शकतील, असे विचार आपल्या पाल्यापर्यंत पोहाचविणं. संस्कार करण्याची पहिली पायरी म्हणजे आईबाबांनी आपला वेळ आपल्या पाल्यासाठी राखून ठेवणं. मुलांसाठी वेळ देणं ही गोष्ट आई-बाबांना आजकाल दुरापास्त होत चालली आहे. पण हा वेळ जर दिला गेला नाही, तर संस्कार करण्याची वेळच टळून जाण्याचा धोका संभवतो. ५ ते १३ या वयोगटात मुलं असताना त्यांच्यावर ज्या गोष्टी बिंबविल्या जातात, त्या सहज स्वीकारल्या जातात व त्या फार दूरवर परिणाम करू शकतात- ही गोष्ट अभ्यासाने सिद्ध झालेली आहे.

संस्काराची दुसरी पायरी म्हणजे मुलांच्या मनात ज्या संकल्पनांविषयी उत्सुकता असते, त्या संकल्पना त्यांना नीट, स्पष्ट करून सांगणे. प्रेम, परमेश्वर, जन्म, मरण, शिक्षण, महत्त्वाकांक्षा, श्रीमंती, गरिबी, गुण, अवगुण, सौंदर्य अशा नि अनेक संकल्पनांचं नक्की स्वरूप समजून घेण्याची त्यांची ओढ पूर्ण करता आली पाहिजे. या साऱ्या संकल्पना आजच्या आधुनिक जगाच्या संदर्भात त्यांना स्पष्ट करून सांगता आल्या पाहिजेत.

संस्काराची तिसरी पायरी म्हणजे आपल्या पाल्याचे गुण आणि अवगुण, मर्यादा या साऱ्यांची नीट जाणीव त्याला आईबाबांनीच करून द्यायला हवी. उगीच अवास्तव अपेक्षा त्यामुळे तो ठेवत नाही किंवा न्यूनगंडाची शिकारही होत नाही.

संस्काराची चौथी पायरी म्हणजे प्रयत्नांचं महत्त्व आणि चिकाटीचा सराव, एकाग्रतेचा सराव त्याला समजावून सांगणं. हे जर त्याला कळलं, तर कोणतंही काम तो निषिद्ध मानणार नाही आणि मेहनत करताना कचरणार नाही. श्रमप्रतिष्ठेचा पाया घातला जाईल.

संस्काराची पाचवी महत्त्वाची पायरी म्हणजे आपल्या पाल्याला सकारात्मक विचार करावयाचे बाळकडू देणे. आपले जगणे हे अत्यंत सुंदर असून ते चांगल्या, सकारात्मक विचारांच्या मदतीने आपण अधिक सुंदर बनवू शकतो, याबद्दल त्याच्या मनात विश्वास निर्माण करणे फारच महत्त्वाचे आहे. पराभवामुळे हरून, थकून न जाता, आपल्या चुका ओळखून अधिक जोमाने प्रगती करण्याचे शिक्षण देणे हे आज या वाढत्या स्पर्धा-युगात अत्यंत गरजेचे आहे.

संस्काराची सहावी नि अत्यंत महत्त्वाची पायरी म्हणजे परस्परातील प्रेमभावनेचे, माणुसकीचे, नातेसंबंधांचे महत्त्व शिकविणे. समाजाबद्दलची कृतज्ञता त्याला समजावून सांगणे. देशप्रेम, मातृभाषा यावर प्रेम करावयास शिकविणे.

संस्काराची सातवी पायरी म्हणजे विरंगुळ्याचे क्षण एखाद्या छंदापोटी खर्च करण्याचे, नवनिर्मिती करण्याचे मार्गदर्शन त्याला करणे. वाचन, पर्यटन, गायन, वादन, चित्रकला, नृत्य, अभिनय, खेळ यांसारख्या जीवन समृद्ध करणाऱ्या अनेकविध छंदापैकी त्याच्या अगंभूत गुणांना साजेसा छंद जडवून घेण्याचे शिक्षण लहानवयातच मिळाले तर त्याचे जगणे जास्त सुंदर नि अर्थपूर्ण नाही का होणार ?

संस्काराची आठवी नि महत्त्वाची, सर्वात महत्त्वाची पायरी म्हणजे प्रत्येक अनुभवातून काही ना काही शिकण्याची वृत्ती जोपासावयाचे शिक्षण देणे. यामुळेच तुमच्या पाल्याची प्रगती होईल नि आयुष्यात आलेला प्रत्येक अनुभव त्याच्या कामी येईल.

**विचारामधली स्पष्टता, स्वत:च्या गुणांची जाणीव, कमतरतांचं भान, महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी चिकाटीने मेहनत, श्रमप्रतिष्ठा, माणुसकी, देशप्रेम, मातृभाषा-प्रेम, सकारात्मक विचार, सुरेखसा छंद अशा नि एवढ्या गुणांमुळे उत्तम व्यक्तिविकास होणार, हे निश्चितच! पण हे सारे घडविणे मात्र मुलांच्या नव्हे, तर पालकांच्या हाती असते.**

मुलांवर कोणते संस्कार करा, हे सांगतानाच शेवटची अत्यंत महत्त्वाची बाब सांगावयास हवी. हे सारे संस्कार करण्यासाठी पालकांनी स्वत:वर कोणता महत्त्वाचा संस्कार ताबडतोब करून घ्यायला हवा? तर जी तत्त्वे आपल्या पाल्याला शिकवाल, त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न स्वत: करावयास हवा. 'आचरण हाच संस्कार' या अगदी सर्वमान्य उक्तीप्रमाणे पालकांना जर त्यांच्या मुलांवर संस्कार करावयाचे असतील आणि त्यांचा विकास घडवायचा असेल तर स्वत:ही चांगलेच आचरण करणे भाग आहे. 'लोका सांगे ब्रह्मज्ञान' असे वागणे असता कामा नये !

म्हणूनच मुलांवर संस्कार करून त्यांचा व्यक्तिविकास घडविणे म्हणजे त्यासोबत स्वत:ही विकसित होणे असा अर्थ निघतो. ही जबाबदारी ओळखून वागणाऱ्या पालकांनाच आपण 'सुजाण' म्हणू शकतो. मला खात्री वाटते की, संस्कारातून व्यक्तिविकास करण्यासाठी आपले 'सुजाण पालक' आता अजिबात मागे-पुढे पाहणार नाहीत. म्हणूनच सांगते की शुभश्च शीघ्रम् !

**- कवयित्री सौ. हेमा लेले**

❖ ❖ ❖

**मुले अनुकरणातून शिकत असतात. त्यामुळे शिक्षक, आईवडील, शेजारी ह्या सर्वांचा मुलांच्या संस्कारक्षम मनावर फार मोठा परिणाम होत असतो.**

# घरची आणि शाळेतली भाषा

**आ**पली भाषा आणि आपली जडणघडण यांचा फार जवळचा संबंध असतो. एकीकडे भाषा आपल्या विचाराला आकार देत असते तर दुसरीकडे भाषाच आपल्याला भौतिक मर्यादांच्या पार नेते आणि प्रत्यक्ष अनुभवापलिकडच्या ज्ञानाच्या जगात, कल्पनेच्या विश्वात घेऊन जाते. जगाकडे बघण्याच्या आपल्या दृष्टिकोनावर, आपण बोलतो त्या भाषेच्या रचनेचा परिणाम होत असतो, असं आतापर्यंत झालेल्या विविध अभ्यासांवरून दिसतं. आपल्या भाषेची आपली नाळ जुळलेली असते.

मातृभाषा ही आपल्या अस्तित्वाचा अविभाज्य असा भाग असते. उच्चार, स्वरलहरी, शब्दभांडार, रचना, अर्थच्छटा, सौंदर्य यांच्यासह बाळवयापासून होणारा आपल्या भाषेचा विकास आणि जगाबद्दलची आपली जाण विकसित होणं हे हातात हात घालून घडतं. पहिल्यापहिल्या संवेदना, जाणिवा, त्यांची वाढत गेलेली वलयं, त्यांचे बदलत विस्तारत जाणारे आयाम या सगळयाशी आपल्या भाषेचं घट्ट नातं असतं. तसं ते आपल्या भाषेशी असणं, संवेदनशील आणि विचारी माणूस म्हणून होणाऱ्या आपल्या वाढीसाठी तर उपकारक असतंच; पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे जगाचा अर्थ लावताना, आपलं त्याच्याशी असलेलं नातं समजून घेताना, स्वत:ला समजून घेताना त्या नात्याचा आपल्याला अविचल असा आधार असतो.

मातृभाषेखेरीज निराळ्या भाषेच्या माध्यमातून लहान वयापासून शिकणं वाढी-घडणीसाठी उपकारक असतं, असं आतापर्यंत एकाही अभ्यासानं मांडलेलं नाही. मातृभाषा म्हणजे प्रादेशिक भाषा नाही; तर मुलांच्या घरीदारी, शेजारीपाजारी बोलली जाणारी भाषा. या भाषेचं आणि मुलांच्या रोजच्या जगण्याचं, अनुभवविश्वाचं अतूट असं नातं असतं. मुलाच्या मातृभाषेचा जेव्हा वर्गात स्वीकार होतो, तेव्हा मुलांचा आत्मसन्मान जपला जातो, शिवाय, शिक्षक, वर्ग, शिकणं, वाचणं-लिहिणं याकडे बघण्याचा अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन मुलाच्या मनात आकाराला येतो आणि याचा केवळ तात्कालिकच नव्हे तर एकंदर शिकण्यावर दीर्घकाळासाठी उत्तम परिणाम होतो. मूल जेव्हा शाळेत येतं, तेव्हा आपल्या घरी बोलल्या जाणाऱ्या भाषेच्या जवळजवळ सर्व रचना लवचिकपणे आणि आत्मविश्वासानं वापरायला शिकलेलं असतं. त्या भाषेतल्या काही हजार शब्दांचं भांडार त्याच्या जिभेवर असतं. बोलल्या जाणाऱ्या भाषेशी असणारा खऱ्याखुऱ्या जगण्याचा, दैनंदिन घटनांचा संदर्भ वाचायला आणि लिहायला शिकण्याशी जोडला जाणं महत्त्वाचं असतं. यामुळे दोन गोष्टी साधतात. एक म्हणजे मुलाचे अनुभव, मुलाची जीवनदृष्टी यांना शिकण्याच्या प्रक्रियेत कळीची जागा मिळते आणि दुसरं म्हणजे, शिकण्याच्या आशयाशी नातं जोडता आल्यामुळे शिकलेलं आत्मसात करण्याची प्रक्रिया वेग घेते आणि मुलांचा शिकण्यातला रस टिकून राहतो.

काही वर्षांपूर्वी एका बालशाळेत केलेलं हे निरीक्षण पाहिलं तर मातृभाषा हेच माध्यम असण्याचं महत्त्व सहज अधोरेखित होतं.

त्या शाळेत एक वर्ग होता मराठी माध्यमाचा आणि एक वर्ग होता इंग्रजी माध्यमाचा. दोन्ही वर्गात त्या दिवशीचा विषय होता ''नारळ.'' इंग्रजी माध्यमाच्या वर्गात प्रत्यक्ष नारळ दाखवून ताईंनी विचारलं, ''हे काय आहे?'' मुलांनी मराठीत उत्तर दिलं, ''नारळ''. ताईंनी 'कोकोनट्' शब्द सांगून मग ब्राऊन, हार्ड, टेंडर कोकोनट् असे काही शब्द सांगितले आणि मुलांकडून म्हणवून घेतले.

तोच नारळ मग मराठी वर्गात गेला. ताईंना विशेष काही बोलावं-सांगावंच लागलं नाही. मुलांनी उत्स्फूर्तपणे बोलायला सुरुवात केली - ''आमच्याकडे पण नारळाचं झाड आहे. खूप उंचय्'' ''त्याच्या आत खोबरं असतं.'' ''खिचडी केली ना की आजी त्याच्यावर खोबरं घालते'' ''आणि आत पाणी पण असतं, गोड लागतं'' ''मी एकदा नळीनी पाणी प्यालेलं'' ''आई असं असं करून खोबरं काढते'' ''आम्ही देवळात गेलो होतो तिथे देवाला नारळ दिलावता'' ''नारळाची बर्फी मला आवडते''... एक ना दोन ! मुलांनी असंख्य प्रतिसाद दिले. कोणाच्याही मदतीशिवाय! कुठे तीनचार वदवून घेतलेले शब्द आणि कुठे उत्स्फूर्त वाक्यरचनांमधल्या प्रतिसादांचा धबधबा ! प्रेरक तेच; पण परभाषेत मुलांना किती बिचारेपणाचा अनुभव देतं आणि मातृभाषेत बहुदिश विचाराला, मुलांच्या अनुभवविश्वाला कवेत घेत कसा दिलखुलास अनुभव देतं !

वाचा-लिहायला शिकणाऱ्या मुलाच्या जीवनात एक मर्मदृष्टी देणारी महत्त्वाची घटना घडावी लागते. काळाच्या संदर्भात बोलले जाणारे शब्द, वाक्यं, उद्गार अवकाशाच्या संदर्भात पृष्ठभागावर विशिष्ट आकार काढून उमटवणं म्हणजेच लिहिणं हे त्याला उमगावं लागतं. बोलले जाणारे शब्द, वाक्यं मुलाच्या अनुभवाशी घनिष्ठ नातं असणारी आणि त्याच्या भाषेतली असतील तरच हा प्रत्यय मुलाला येण्याची शक्यता निर्माण होते आणि मर्मदृष्टी येण्यासाठी पूरक वातावरण वर्गात निर्माण होतं. ज्याच्याशी मुलांचं नातं सहज जुळणार नाही असा अपरिचित भाषेतला आशय ही मर्मदृष्टी येण्याच्या प्रक्रियेसाठी अत्यावश्यक असा भाषानुभव द्यायला अपुरा आणि निरुपयोगी ठरतो. ही मर्मदृष्टी ज्यातून येईल असा भाषानुभव द्यायचा तर, आपल्या अनुभवाला येतं ते, आपल्याला जे वाटतं ते मांडता येतं, मांडायचं असतं, ते लिहिता येतं, लिहायचं असतं आणि लिहिलं की ते टिकून राहतं याचा प्रत्यय मुलांना यायला हवा. यातून जे जे घडतं ते भाषिकदृष्ट्या खूप गुंतागुंतीचं पण फार महत्त्वाचं असतं. विचार आणि भाषा, आत्मप्रतिमा आणि भाषा, भाषेच्या लिखित रूपाचं मानवी जीवनातलं स्थान, आकलन आणि अभिव्यक्ती, दृष्टिकोनांची विविधता आणि अनुभवांची संपन्नता यांची जोपासना अशा विविध अंगांनी मुलाला भाषेच्या ताकदीचा प्रत्यय येत जातो.

सकस भाषाशिक्षणात तर याचं महत्त्व अनन्यसाधारण आहेच, पण केवळ आरंभीच्या

वाचनलेखनाच्या पातळीवर विचार केला तरी याचं महत्त्व वादातीत आहे. आणि म्हणून माध्यमाच्या मुद्द्याशी ते जोडलेलं आहे. बाल शिक्षणासाठी, बालहक्कासाठी आणि भाषाविविधतेसंदर्भात काम करणाऱ्या जागतिक पातळीवरच्या संस्था आणि युनेस्को यांचं या मुद्द्याबाबत एकमत आहे, की औपचारिक शिक्षणाच्या निदान सुरुवातीच्या काळात मुलाच्या शिक्षणाचं माध्यम त्याची स्वत:ची भाषा हेच असायला हवं आणि त्याचं महत्त्व निर्णायक असं असतं. हे वेळोवेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर नमूद केलं गेलेलं आहे. ज्या मुलांची मातृभाषा मर्यादित समूहात वापरली जाते त्यांना स्वभाषेच्या जोडीनं व्यापक समूहाची भाषा, प्रमाणभाषा शिकण्याची संधी मिळण्याची तजवीज असण्याचा मुद्दाही विविध दस्तऐवजांमध्ये आलेला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या देवघेवीसाठी आणखी एखादी भाषा शिकण्याचा मुद्दाही यात आहे, परंतु तो स्वभाषेच्या मुद्द्यानंतर येणारा मुद्दा आहे.

प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी शाळेत येणाऱ्या मुलांमध्ये शिकणारी घरातली पहिलीच पिढी असलेल्या मुलांचं प्रमाण गेल्या काही वर्षांत झपाट्यानं वाढलं. या मुलांबरोबरच त्यांच्या त्यांच्या भाषा, अनुभवविश्वही शाळेत येऊन पोहोचली. मात्र त्यांच्या भाषांची, भाषेबरोबर अपरिहार्यपणे येणाऱ्या अनुभवविश्वाची, घ्यायला हवी, अशी दखल आपण आपल्या व्यवस्थेमध्ये घेतली नाही. मुलांच्या भाषांची आणि तदनुषंगानं सोबतच येणाऱ्या त्यांच्या अनुभवविश्वाची दखल न घेताच आपण त्यांना वाचायला-लिहायला-शिकवायला घेतलं आणि तेही थेट प्रमाण मराठी भाषेत आणि त्या भाषेतून त्यांनी इतर विषयांमधल्या संकल्पना समजून घ्याव्यात, कौशल्य मिळवावीत अशी अपेक्षा केली. साक्षर होण्यासाठी लिपीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या अगणित मुलांना अडखळायला का होतं, जेमतेम उंबऱ्यापल्याड जाऊन पुढे जाण्याची कितीकजणांची इच्छा कोमेजून का जाते याचं मर्म वास्तवाची गुतांगुत वाढवणाऱ्या या सगळ्या घटकांमध्ये आहे.

मूल शाळेत येतं त्या सुरुवातीच्या काळात त्याला स्वभाषेच्या नजरेनं स्वभाषेच्याच खिडकीतून जगाकडे पाहायला मिळण्याचा आणि स्वभाषेतूनच व्यक्त होण्याची संधी मिळण्याचा त्याच्या शिकण्यातल्या सहभागावर, शिकण्याच्या गुणवत्तेवर आणि एकंदर पल्ल्यावर निर्णायकरीत्या परिणाम होतो. सहज कल्पना करता येणार नाही एवढा हा परिणाम दूरगामी ठरतो. आपल्या घरच्या भाषेपलीकडे जाऊन प्रमाण मराठीवर प्रभुत्व मिळवण्याचं महत्त्व वादातीत आहे. परंतु प्रमाण मराठीपर्यंत पोचण्याचा प्रवास आनंदाचा आणि सहज होणं हाही प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे.

शालेय शिक्षणाच्या आरंभीच्या टप्प्यावर मूल बोलतं त्या भाषेसाठी अवकाश निर्माण करण्याला पर्याय नाही. याचा अर्थ प्रमाणभाषेचं महत्त्व नाकारायचं किंवा या मुलांना प्रमाणभाषेपासून दूर ठेवायचं असा नाही. या मुलांना प्रमाणभाषेपासून दूर ठेवून काही संधींपासून वंचित ठेवण्याचा हेतू यामागे असल्याचा आक्षेप काही विचारवंत, राजकारणी मंडळी यावर घेऊ शकतात. इथे, मुलांची भाषा

वाचन-लेखनाच्या पहिल्या टप्प्यावर वापरली जाणं का महत्त्वाचं आहे हे लक्षात घ्यायला हवं.

व्यापक भौगोलिक प्रदेश आणि सांस्कृतिक-सामाजिक-भाषिक विविधता यांच्या संदर्भात एकच पाठयपुस्तक सुरुवातीपासून वापरण्यातून आपण समान संधी देतो असं मानण्यातला शैक्षणिक फोलपणा त्यासाठी समजून घ्यायला हवा. 'समान संधी'चा सखोल अर्थ, विविध पार्श्वभूमीतल्या सगळ्या मुलांना एकाच प्रकारे हाताळणं असा नव्हे तर प्रत्येकाला त्याच्या त्याच्या भाषेचा, परिस्थितीचा, गरजांचा आणि क्षमतांचा विचार करत समान उद्दिष्टांपर्यंत पोचायला मदत करणं असा होतो. मराठीशी कमीअधिक जवळीक असणाऱ्या मराठीच्याच विविध रूपांचाही प्राथमिक शाळांमधील वर्गावर्गातून मोकळ्या मनानं स्वीकार व्हायला हवा. आणि शिक्षकानं वेळोवेळी प्रमाण मराठीतल्या रचनांचा, शब्दांचा पर्याय कुशल सहजपणानं पुरवायला हवा. जोडीला मुलांची भाषाही काही प्रमाणात तरी आत्मसात करायला हवी. अशा रीतीनं सुरुवातीच्या टप्प्यावर मुलांची घरची भाषा आणि प्रमाण मराठी या दोन्ही भाषांचं बोट धरून काही काळ मूल चाललं की मग मराठी माध्यमातून शिकणं ही यांत्रिक बाब राहणार नाही. स्वभाषेतून शिकण्याची सुरुवात होणं, प्राथमिक शिक्षण प्रामुख्यानं स्वभाषेत होणं आणि व्यापक समूहाची भाषा एक विषय म्हणून शिकणं, या अनेक अभ्यासांवर आधारित अशा विचाराला जागतिक पातळीवर मान्यता मिळालेली आहे. जगभर या मताचा पुरस्कार केला जातो. मात्र अनेक देशांमध्ये, आणि भारतातही, तत्वत: हा विचार स्वीकारला गेला असला तरीही त्याचं वास्तवात रूपांतर झालेलं नाही. महाराष्ट्रापुरतं बोलायचं, तर स्वभाषेत सुरुवातीचं शिक्षण होण्यासाठी, त्याला प्रमाणभाषेच्या परिचयाची हळुवार जोड मिळण्यासाठी मूलभूत असं काम होण्याची गरज आहे.

**– वर्षा सहस्त्रबुद्धे**

❖ ❖ ❖

## पैशाचे झाड आणि अंगठीचा वेल

'पाकोळी' बालवाडीमध्ये अनेक गमती जमती घडतात. मुलांमधील उत्कंठा, औत्सुक्य वेगवेगळ्या निमित्ताने प्रकट होते. बालवाडीच्या मोठ्या गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या ताईंनी वर्धिनीच्या गच्चीवर नेले. प्रत्येकाला एकेक कुंडी व कुंडीत लावण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बिया दिल्या. दोन विद्यार्थ्यांनी मात्र वेगळीच मागणी केली. एक म्हणाला, 'ताई, मला पैशाचे झाड लावायचे आहे' तर दुसरी म्हणाली, 'ताई, मला अंगठीचा वेल लावायचा आहे.' त्यांच्या इच्छेप्रमाणे एका कुंडीत नाणे तर दुसऱ्या कुंडीत अंगठी पेरली. सर्वजण रोज पाणी घालत होते. अन्य कुंड्यात अंकुर आले, कोवळी पाने आली, पाने वाढू लागली पण या दोन कुंड्यात मात्र काहीच उगवेना. शेवटी त्यांनाच पुन्हा कुंडी उकरायला सांगितल्यावर पैशाचे झाड आणि अंगठीचा वेल लागत नाही हे सगळ्यांनाच समजले.

## आठवणी औट घटकेतील मुख्याध्यापिका पदाच्या...

**'स्व'**-रूपवर्धिनीच्या अनेक प्रकल्पांपैकी एक म्हणजे बालवाडी होय. माझ्या आधीच्या बालवाडीच्या मुख्याध्यापिकांच्या आजारपणामुळे हे औट घटकेची जबाबदारी काही काळासाठी माझ्यावर आली. लहानपणापासून माझा आदर्श होता शिक्षक आणि माझे स्वप्न होतं शिक्षक बनण्याचं. काळाच्या ओघात एम. ए. होऊनही अर्थार्जनाऐवजी मी घर व त्याच्या जबाबदाऱ्यांना प्राथमिकता दिली. आता साठीनंतरच्या काळात चालून आलेली ही स्वप्नपूर्तीची संधी नाकारावीशी वाटली नाही.

सध्या अडीच वर्षापासून बालवाडीत प्रवेश मिळतो. त्यामुळे अडीच ते साडेपाच या वयोगटातली छोटा, मध्यम व मोठा अशा ३ गटातील मुले म्हणजे मला मोठे अप्रूप होते. सर्वात संवेदनशील, संस्कारक्षम वयातल्या या छोट्यांनी माझे विश्व आनंदानं भरून टाकलं. रोज 'नमस्ते ताई' म्हणत, इवल्या हातांनी नमस्कार करीत शाळेत प्रवेशणारी ही मुलं मी करीत असलेल्या बाहुलीनाट्यांमुळे मला चटकन चिकटली. आमच्यात नात्याचा बंध बांधला जायला अजिबात वेळ लागला नाही.

त्यांच्याशी बोलणारे ससे, मांजर, उंदीर, माकड त्यांना खूप आवडले. शाळेचा जिना चढायला सुरुवात करताच आपल्याबरोबर आलेल्या पालकांना ते ''या ताई, किनई खरा उंदीर, मांजर आणतात आमच्याशी बोलायला.'' अशी गंमत सांगत. एखाद्या रडत येणाऱ्या विद्यार्थ्याला जर मी ''चल लवकर आज ससा येणार आहे हं'', असं सांगितलं तर त्याचं रडणं थांबत असे. एकाचं तर माझ्यावर असं प्रेम की रोज न चुकता तो नमस्काराबरोबरच जास्वंद किंवा कोरांटीचं एक फूलही माझ्या हातावर ठेवे आणि ते मी घालतेय ना केसात हेही मागे वळून पाही.

हे औट घटकेचं राज्य औट घटकेतच कधी संपलं तेही मला कळलं नाही. पण हे असंख्य हसरे चेहरे माझ्या स्मृतीत कायम उजळत माझ्या आनंदास बहर आणत असतात.

**– सौ. संध्या साबणे**

❖ ❖ ❖

---

## वात्सल्याला पंख सृजनाचे

**'स्व'**-रूपवर्धिनीच्या पाकोळी बालवाडीशी माझे सुरूवातीचे नाते, हे पालकाचे होते. नंतर त्याचे रूपांतर बालवाडी शिक्षिका असे झाले. बालकल्याण, त्यादृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन, उत्तमातील उत्तम गोष्टींना सदैव प्रोत्साहन यामुळे वर्धिनीच्या बालवाडीचे वेगळेपण टिकून आहे. मुलांना आपली संस्कृती जतन करून ठेवता यावी, त्याचे भान त्यांना राहावे, यासाठी वर्षातील सर्व सण चांगल्याच दिमाखात व उत्साहात साजरे केले जातात. पालखी बरोबरच्या दिंडीत मुलांच्या रूपातील विठ्ठल-रखुमाईची मनमोहक छबी असो वा राधाकृष्ण यांची छबी असो. यात परमेश्वरच भूमीवर अवतरल्यासारखे वाटते! मुलेही याचा मनमुराद आनंद लुटतात. मुलांना गणपतीत अथर्वशीर्ष म्हणण्यास मंडळात घेऊन जातात. पालकांना नवरात्रात 'श्री सुक्त' म्हणण्याचा आग्रह धरतात. पालक-शिक्षक यांच्यात सलोख्याचे नाते राहील, याकडे लक्ष दिले जाते. सक्रांत उत्सव उल्हासपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येतो. त्याला



नवीन शिकल्याचा आनंद मुले लगेच व्यक्त करतात.

पालक-बालकांचा चांगलाच प्रतिसाद मिळतो.

मुलांची शाळापूर्व तयारी नकळत हसत-खेळत, सोप्या पद्धतीने, गाणी गप्पा गोष्टी यातून वर्गाच्या शिक्षिका करून घेतात. शिक्षक मुलांना केंद्रबिंदू मानून शिक्षणातले निरनिराळे प्रयोग करतात. यातूनच मुलांची अभ्यासातली रूची वाढवली जाते. गणित, विज्ञान हे विषय मुलांना उदाहरणे देऊन रंजकपणे शिकवले जातात. काड्या अंकांचे कार्डस् मेक्यानो या खेळातून मुलांना अंक ओळख करून दिली जाते. आदरणीय ताराबाई मोडक, अनुताई वाघ, सिंधूताई अंबिके या मान्यवरांच्या मते प्रेम, वात्सल्य, जिद्द, परिश्रम, सृजनशीलता हे शिक्षकांचे पंचांग आहे. अशाच प्रकारे 'स्व' रूपवर्धिनीतील शिक्षिका कार्यरत आहेत. त्यामुळे मला वर्धिनीत मुलांच्या मध्ये राहून त्यांना शिकविताना समाधान व आनंद मिळतो. मन शांत होते. तृप्त होते. शाळेची मुलांना ओढ लागते. अनेक आपुलकीचे मार्गदर्शक आधारस्तंभ, वर्धिनीला लाभल्यामुळे आपली 'स्व'-रूपवर्धिनी सदैव प्रगतीपथावर आहे आणि राहीलच.

**– सौ. राणी हनुमंत काळे (बालवाडी शिक्षिका)**

❖ ❖ ❖

## स्वयंसिद्धीचा पाया

**सि**द्धी दोन, सव्वादोन वर्षांची झाली. तेव्हा तिला बालवाडीत घालण्याचा निर्णय झाला. माध्यम मराठीतच असावे, ह्यावर घरात एकमत होते. त्यामुळे लगेच 'स्व'-रूपवर्धिनीचा पर्याय वडिलांच्या डोक्यात आला व त्याप्रमाणे सिद्धीचा प्रवेश वर्धिनीत झाला. तीही आनंदाने शाळेत जाऊ लागली. शाळा तिच्या आवडीची झाली. शाळेतील ताई तिला आपल्या वाटू लागल्या. ती तिथे रमून गेली. पण कुठे तरी इतर मुलांपेक्षा सिद्धीची ताकद, दृष्टी कमी पडत होती. आणि हा फरक आमच्या व शिक्षकांच्याही लक्षात येत होता. त्या प्रमाणे शाळेतही तिच्याकडे विशेष लक्ष दिले जात होते.

सिद्धीतील आत्मविश्वास व नवीन काही शिकण्याची आवड मात्र वाढत होती. आणि हाच पाया होता. ती घडत गेली. शिक्षकांच्या देखरेखीत मोठी होत गेली. आणि शिक्षकांबरोबरच चिमुकल्या मित्र मैत्रिणींचे हातसुद्धा सिद्धीच्या मदतीसाठी तयार झाले. त्यामुळे ती आणखी धीट झाली. स्नेहसंमेलन, सहल, भातुकली या सगळ्यामध्ये हिरिरीने भाग घेऊ लागली. एकेका उणिवेवर मात करत 'स्व'-रूपवर्धिनीतील बालवाडीची तीन वर्ष अत्यंत आनंदात पार पडली.

तीन वर्षे पार पडली. सिद्धी तिथून पुढच्या शाळेत गेली इतरांना छोट्या-छोट्या वाटणाऱ्या पण अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टी ती कायमच्या सोबत वर्धिनीतून घेऊन आली होती. दोन्ही वेळेस जेवताना स्वच्छ हात धुणे, ताटावर बसल्यावर नमस्कार करणे, ताटातील सर्व संपवणे, शाळेतून आल्या आल्या गणवेश बदलणे, घरात आलेल्या मोठ्यांच्या पाया पडणे. अशा ज्या छोट्या वाटणाऱ्या पण अत्यंत मौल्यवान गोष्टी सिद्धी अजूनही आचरणात आणते. आता ती स्पेशल स्कूलमध्ये लेव्हल II मध्ये शिकत आहे. पण वर्धिनीची वर्धक म्हणून तिची ओळख कायमच राहणार आहे.

**– सौ. मेधा राऊत (माजी पालक)**

❖ ❖ ❖

## शाळा नव्हे; माहेर !

२००९ चा मे महिना. लग्न होऊन चार महिने झाले होते. संसार व्यवस्थित चालू झाला होता. संसारात कोणताही उणेपणा न आणता काहीतरी चांगले करावे, असे सारखे वाटत होते. आणि एक दिवस अगदी छान उजाडला. सकाळी वर्तमानपत्रात जाहिरात वाचली. ' 'स्व'-रूपवर्धिनी या संस्थेत बालवाडी शिक्षिका पाहिजेत.' लगेचच अर्ज लिहिला. मुलाखत दिली. माझी माहिती सांगितली. माझा अभ्यासक्रम झालेला नव्हता, पण मी एका शाळेत लग्नाअगोदर सहा महिने शिकवले होते. ताईंनी विचारले की, मुलांची आवड आहे का? मुलांना शिकवता येईल का? मी सहा महिन्यांच्या अनुभवावरून 'हो' म्हणाले. नंतर त्यांनी मला एक जूनपासून वर्धिनीत बोलावले आणि मी सुद्धा आनंदाने वर्धिनीत आले.

पहिला दिवस खूप छान गेला. शिक्षिकांची सभा झाली. मला मोठा गट शिकवायला दिला होता. एक ते दहा जूनपर्यंत सर्व शिक्षिकांनी मुलांच्या स्वागतासाठी छान-छान वर्ग सजवले आणि सर्व शिक्षिका इतक्या सुंदर, छान गप्पा मारत एकमेकींबरोबर हसत-खेळत काम करत होत्या की, मी पण जणू नव्याने हसायला लागले. अगदी मला माझे माहेर आठवले. मी एकदा शाळेत गेले की, मला माहेरी गेल्यासारखे वाटायचे. 'स्व'-रूपवर्धिनीच्या रूपाने मला माझी आईच भेटली जणू ! इतक्या छान, एकमेकांना समजावून घेणाऱ्या मैत्रिणी, असा माझा छान परिवार तयार झाला. मी जेव्हा मुलांना शिकवण्यासाठी वर्गात गेले, तेव्हा खरेच काही शिकविता येत नव्हते. पण 'स्व'-रूपवर्धिनीची मुले खूप हुशार आणि त्यांचे पाठांतरही खूपच छान. पहिल्या आणि अखेरच्या प्रार्थनेपासून ते भजनापर्यंत सगळी मुले छान म्हणायची. आणि मी त्या मुलांना बघतच बसायचे! कारण मी ज्या शाळेत सहा महिने नोकरी केली त्या शाळेत १ ते १०० अंक आणि अ, आ, ई ही मूळाक्षरे एवढेच होत असे. असे करत करत तीन महिने शिकवीत राहिले. पण मी त्या तीन महिन्यांत फक्त १०% शिकले असेन. एकदा पुष्पाताई माझा पाठ बघण्यासाठी आल्या व त्यांनी मला एक वर्षाचा अभ्यासक्रम कर, असे सांगितले. हे ऐकून मला खूप वाईट वाटले. अभ्यासक्रम शुल्क तीन हजार रुपये इतकं होतं. तीन महिने मला हजार रुपये पगार मिळत होता आणि तो पगार मी घरात सांगत असे. माझ्या घरात कोणीच मला पगार मागितला नाही. पण त्यांना आनंद होता की, हिला पगार मिळतो. त्या पगारातून मी अभ्यासक्रमाचे शुल्क भरले. मी एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यावेळेस आईने मला खूप साथ दिली. पुष्पाताईच्या साथीने त्या एक वर्षात इतके शिकायला मिळाले की, सर्वप्रथम कळले, 'मुलांना एक, दोन आणि अ, आ, ई एवढेच शिकवणे नसते, तर मुलांना प्रत्येक विषय कशा प्रकारे शिकवायचा हे कळणे खूपच महत्त्वाचे असते. उदा. भाषा, गणित, इंद्रियशिक्षण, सामान्य ज्ञान, जीवन व्यवहार, हस्तकला, मुक्त व्यवसाय, खेळ, गोष्टी, बडबड गीतं, अभिनय गीतं आणि बरेच काही ह्या



शिकताना जितकी बंधने कमी तितके सर्जनशील विचार जास्त निर्माण होतात.

अभ्यासक्रमामध्ये शिकायला मिळाले.' एक वर्षानंतर येथेच मी शिक्षिका म्हणून रुजू झाले. दोन वर्ष येथे काम केले आणि नंतर दुसऱ्या शाळेत जास्त पगाराच्या हव्यासापोटी शिक्षिका म्हणून कामाला लागले. तेथे मला एक वर्ष झाल्यावर चांगली शिक्षिका म्हणून बक्षीसही मिळाले आणि वर्षानंतर त्यांनी मला ब्रेक दिला.

काही महिन्यानंतर मी पुन्हा पुष्पाताईंना भेटले आणि माझी एवढी मोठी चूक असतानाही त्यांनी खूप मोठ्या मनाने 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये शिक्षिका म्हणून घेतले. मी पुष्पाताईंची सदैव ऋणी राहीन. पुष्पाताईंसारख्या श्रीमंत मनाच्या व्यक्ती शोधूनही मिळणार नाही. पुष्पाताईंच्या ओरडण्यामध्ये प्रेम, रागावण्यामध्ये शिकवणे, बोलण्यामध्ये गोडवा यातून मला नेहमी स्फूर्ती मिळते. 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये आल्यापासून रोज सकाळी होणारा ओंकार, अथर्वशीर्ष, रामरक्षा, श्रीसुक्त, प्रार्थना ह्या सगळ्या गोष्टींमुळे स्वत:मध्ये खूप बदल झाला. कारण माणसं ओळखायला, समजून घ्यायला शिकले तेही इथेच.

**– सौ. कविता जाधव (बालवाडी शिक्षिका)**

---

## सुविचारांची पाककृती

''**आ**वड असली की सवड मिळते''

खरंच हा सुविचार माझ्या जीवनात खरा ठरला. असेच मी एक दिवस वर्तमानपत्र वाचत होते. त्या वर्तमानपत्रात 'स्व'-रूपवर्धिनीबद्दल बातमी आली होती की, इथे बालवाडी शिक्षिकांकरिता प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू होणार आहे. मी वर्धिनीत प्रवेश घ्यायचे ठरवले. बालवाडी अभ्यासक्रमासाठी यायला लागले.

''कर्तृत्वास किंमत असते'' हे मला इथे आल्यावर पटले. जीवनामध्ये काहीतरी नवीन शिकायला मिळणार याचा आनंद खूप झाला. ''एका विचाराने वागू या, आपले कुटुंब समजू या'' या भावनेचे वर्धिनीत वातावरण असल्याने मला खूप समाधान वाटू लागले. सततच्या सहवासाने सर्व शिक्षिकांशी मैत्री झाली आहे. त्यांच्याकडूनही खूप काही शिकायला मिळते.

संस्थेतल्या आठवणीतील माझ्या आयुष्यातील एक प्रसंग आहे. वर्धिनीत पाककृतीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. पौष्टिक पदार्थ स्पर्धा. मी पालकपुऱ्या केल्या. स्पर्धेच्या दिवशी सगळ्याजणी उत्साहाने आपापल्या टेबलावर सुंदर सुशोभन करून आपले पदार्थ ठेवत होत्या. मीही डिशमध्ये पदार्थ झाकून ठेवला. आम्ही सर्वजणी बाहेर आलो. पदार्थाविषयी चर्चा करीत होतो. तेथे आलेल्या पाहुण्यांनी प्रत्येक पदार्थाची चव घेतली. काही वेळेनंतर सर्व शिक्षिका आत गेल्या. माझ्या पाककृतीला प्रथम पारितोषिक मिळाले. उत्तम, पौष्टिक, कमी खर्चाचा व स्वादिष्ट यामुळे मला प्रथम क्रमांक

मिळाला. बक्षीस स्वीकारण्याचा तो क्षण माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय आनंद क्षण होता.

'स्व'-रूपवर्धिनीचे एक आणखी विशेष मला सांगावेसे वाटते ते म्हणजे इथे मुलांचे वाढदिवस, सण, उत्सव सर्व काही साजरे केले जातात. त्यात आम्ही शिक्षिकाही उत्साहाने भाग घेतो.

मा. किशाभाऊ सरांच्या घरी आम्ही सर्वजणी दत्तजयंतीच्या दिवशी गेलो होतो. ताईंनी आमची सर्वांची ओळख करून दिली. सरांनी छान गप्पा मारल्या. वर्धिनीची माहिती सांगितली. त्यांच्या बोलण्यातून आपलेपणा जाणवला. वर्धिनीचे संस्थापक एवढे थोर आहेत हे पाहून मनात विचार आला, ''खरोखरच आपले भाग्य चांगले आहे. खरंच वर्धिनीच्या आशीर्वादाने मी आज बालवाडी शिक्षिका आहे.''

'विकसित व्हावे! अर्पित होऊनी जावे!' 'स्व'-रूपवर्धिनीचे हे ब्रीदवाक्य माझ्या जीवनावर परिणाम करणारे ठरले. कारण वर्धिनीचे आमच्यावर अफाट प्रेम आणि संस्कार आहेत. वर्धिनीत चांगल्या प्रकारे काम करून आपला या संस्काराचा ठसा कसा उमटवायचा या विचाराने मी काम करीत आहे. 'स्व'-रूपवर्धिनीला माझ्या मनापासून शुभेच्छा !

**- शामल टापरे (मुख्याध्यापिका)**

❖ ❖ ❖

## शिबिर मुलांचं, शिक्षण पालकांचं

यंदा बालवाडीतील मोठ्या गटाचे एक दिवसाचे निवासी शिबीर झाले. ६७ जणांनी यात सहभाग घेतला. ही मुलं ३-४ वर्षांची, पालकांपासून कधीही दूर न राहिलेली. शिक्षकांना पूर्ण विश्वास की ही मुलं आनंदाने राहणार. पालकांनीही उत्साहानी त्यांना शिबिरात पाठवलं. पण रात्री मात्र काही पालकांना रहावेना. शिबिरस्थानी म्हणजे वर्धिनीच्या इमारतीत फोन येऊ लागले. माझा मुलगा कसा आहे ? मुलगी कशी आहे ? मुलं जेवली का ? रडत नाही ना ? अहो खरं सांगू का, आम्हालाच चैन पडत नाही त्याच्याशिवाय/तिच्याशिवाय. फोन करणाऱ्या पालकांनाच समजावून सांगावं लागत होतं, ''काळजी करू नका.'' शिबिरातील मुलं मात्र गाणी गोष्टीत रमलेली. शहाण्यासारखी जेवली. स्वत:ची स्वच्छता, ताट धुणं सगळं स्वत: केलं. आई-वडिलांची आठवण काही मुलांना झाली. तेही साहजिकच होतं. पण 'ताई' त्यांच्याबरोबर होत्या. त्यांनी गोष्ट सांगितली, अंगाई गीतंही म्हटली आणि आईच्या जवळ झोपण्याची सवय असलेल्यांना मग केव्हा झोप लागली ते समजलंच नाही.

एक दिवसाच्या या शिबिरात चिकटकाम, कातरकाम, मातीकाम, रंग भरणे अशा विविध उद्योगात मुलं रमली होती. फुलदाणी, पताका, पाकिटे, फुले, तोरणे, भेटकार्ड, घडीचा कुत्रा अशा अनेक वस्तू रंगीत कागदांचा वापर करून बनविल्या तर मातीकामात माती हाताने मळून कुणी गणपती, कुणी पक्षी, कुणी फळं अशा अनेक वस्तू स्वत:च्या कल्पनेने बनविल्या.



**जेव्हा मानसिकता हरवते तेव्हा सर्जनशीलता तोंड लपविते.**

# आनंद पसरवणारी शाळा

**'स्व'**-रूपवर्धिनी नाव ऐकताच मला प्रसन्नता, आपलेपणा जाणवतो. माझा मुलगा आदेश आठव्या महिन्यात झाला. प्रत्येक बाबतीत उशीरा प्रगती असल्यामुळे चार वर्षाचा झाला, तरी चालता बोलता येत नसल्यामुळे कुठल्याही शाळेत घ्यायला तयार नव्हते. त्यावेळी 'स्व'-रूपवर्धिनीने मला आधार दिला. त्याच्या सोबत बसण्याच्या अटीवर त्याला प्रवेश मिळाला.

पहिल्याच दिवशी तीन महिन्याच्या मुलीला घरी सोडून आदेशला घेऊन शाळेत गेले. शाळेत जाताच खूप प्रसन्न वाटले. सगळीकडे रंगीबेरंगी चित्र, पताका, रांगोळी, समोरच स्वागताला बाई उभ्या हे सर्व पाहून आदेशला फारच आनंद झाला. तो आनंदाने टाळ्या वाजवू लागला. वर्गात जाताच तेथील वातावरण, इतर मुले पाहून न रडता खेळत बसला. घरी एकाच जागेवर तासन्तास बसून राहणारा माझा मुलगा खेळताना दिसला. आदेशच्या बाई अगदी आपुलकीने आणि प्रेमाने 'इथून पुढे आम्ही त्याची काळजी घेऊ', असं बोलल्या. आदेश खूप छान रूळला. मला रोज त्याच्यासोबत थांबण्यास सांगितले होते; परंतु बाईंनी पहिल्याच दिवशी त्याची जबाबदारी घेऊन मला घरी जाण्यास सांगितले. माझ्यापासून पहिल्यांदा माझ्या मुलाला दोन तास दूर ठेवले, परंतु मनाला थोडीही काळजी वाटली नाही. आता रोज शाळेत सोडायला, आणायला गेले की, बाई रोज तो काय करतो याविषयी सांगायच्या. आदेशच्या आधी मलाच त्याला सोडण्याची, आणण्याची, त्याच्याविषयी ऐकण्याची ओढ लागायची. थोड्याच दिवसांत त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल व प्रगती दिसून येत होती. तो बोलण्याचा प्रयत्न करत होता. वस्तू जागच्या जागी ठेवणे, पोळीला भाजी लावून स्वत:च्या हाताने जेवणे, पाहुणे आल्यावर दोन हात जोडून नमस्कार करणे या गोष्टी करू लागला. चपळता मोठ्या प्रमाणात वाढली. सर्वात प्रथम म्हणजे माझ्यामध्ये पण मोठ्या प्रमाणात बदल झाले. व्यवस्थितपणा वाढला. आदेशविषयी सतत नकारात्मक विचार करणारी मी, आता सकारात्मक विचार करू लागले. आता माझ्यामध्ये विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्याची आवड निर्माण झाली. चित्रकला माझा आवडता विषय. परंतु अनेक वर्षांपासून त्याच्याकडे माझे पूर्णपणे दुर्लक्ष झाले होते. त्या दिवशी वर्धिनीत झालेल्या चित्रकला स्पर्धेत भाग घेताना मला खूप आनंद झाला. पण माझ्यापेक्षा मी चित्र काढताना आदेशला जो आनंद झाला, ते पाहून मला खूप रडू आले आणि हा आनंद पाहण्याची संधी मला 'स्व'-रूपवर्धिनीने दिली. आता माझ्या मुलाला प्रगतीपथावर नेण्याचे काम माझ्याऐवजी 'स्व'-रूपवर्धिनी व तेथील शिक्षिका करत होत्या. इतर मुलांच्या सान्निध्यात तो अगदी सर्वसाधारण मुलांसारखा राहतो. बालवाडीत आल्यानंतर त्याच्याशी प्रेमाने आपलेपणाने वागतात. वर्धिनी संस्कारांची खाण आहे. येथील प्रत्येक गोष्ट आपल्यामध्ये चांगले बदल घडविणारी आहे. शाळा कशी असावी ? तर 'स्व'-रूपवर्धिनी सारखी, मुलाबरोबर पालकांनाही वळण लावणारी शिस्तप्रय 'स्व'-रूपवर्धिनी !

**– सौ. राणी शिनगारे (पालक)**

❖ ❖ ❖

## चीज शिक्षकांच्याही कलागुणांचे

**मी** माझ्या आयुष्यातील २७ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात घालवली व अजूनही काम करत आहे. आपल्याला जे काही येतं ते दुसऱ्याला देत राहावे असे नेहमी वाटते. आपल्या अनुभवाचा उपयोग चांगल्या ठिकाणी व्हावा असे नेहमी वाटते. दुसऱ्याला देत राहावे, म्हणजे आपल्या ज्ञानात भर पडत असते. तो आनंद घेताना मनाला जे समाधान होते, ते तर पैशातसुद्धा मिळवता येत नाही. या विचारांचा आदर करत मला 'स्व'-रूपवर्धिनी' या संस्थेने आपल्या बालवाडीत 'मुख्याध्यापिका' या पदावर काम करण्यास माझी निवड केली, आदराने आणि विश्वासाने माझ्यावर जबाबदारी दिली.

येथील संस्थेतील वातावरण अतिशय मनमिळावू आहे. आलेल्यांचे स्वागत इतके मनमोकळेपणाने करतात की, येथून जावंसंच वाटत नाही. आपण तेथील एक घटकच होऊन जातो. लळा लावणारे व आपल्या मनाला घट्ट चिकटून टाकणारे वातावरण आहे. आपल्यातील ' 'स्व'रूप' येथे प्रकट करता येते. दुसरीकडे कुठेही तुम्हाला असे वातावरण मिळणार नाही. तेथील मुलांना मी आवडीने संगीत व अभिनय शिकवायची. मुले रमून जात असत. मी सुद्धा किती वेळ मुलांमध्ये आहे, हे कळतच नसे. शाळा सुरू होण्यापूर्वी सकाळी जी उपासना शिक्षक एकत्र येऊन करतात, ती खरोखरच पूर्ण दिवस मन प्रसन्न ठेवणारी आहे. अशी उपासना मी कुठल्याही शाळेत पाहिली नाही. मुलांना शिकविणाऱ्या ताईसुद्धा आपलेपणाने व तळमळीने शिकवतात. माझ्याकडून आवडीने जे येत नाही ते शिकून घेत मला नेहमी म्हणत 'ताई तुमच्याकडून खूप शिकण्यासारखं आहे.'

मुलांचे जसे स्नेहसंमेलन असते. तसेच शिक्षिकांचेसुद्धा स्नेहसंमेलन असते. शिक्षिकांमध्ये जे गुण आहेत, त्यांना वाव मिळावा हा विचार प्रत्यक्षात उतरवलेला मला इथेच पाहायला मिळाला. सर्व शिक्षकांचा 'महाराष्ट्राची लोकधारा' हा कार्यक्रम बसवला. पहाटेची भूपाळी पासून ते गोंधळ असे सगळे लोकगीतांचे प्रकार मनापासून सगळ्यांनी केले. मी सूत्र संचालन केले व कार्यक्रमातील सगळे लोकगीतांचे प्रकार बसवले. अतिशय उत्तम असे स्नेहसंमेलन झाले. मला सुद्धा वाटले नव्हते, आपल्याकडून इतके सुंदर काम होईल ! हा माझ्या आयुष्यातील सुखद आनंद ठेवा होता. इतके वर्षे काम करत असताना प्रत्येकाची इच्छा असते, या पदावर, म्हणजे मुख्याध्यापिकेच्या पदावर काम करण्याची संधी मिळावी. 'स्व-रूपवर्धिनी' व पुष्पाताईंमुळे माझी ही इच्छा पूर्ण झाली. माझ्यातील कलागुण ओळखून त्यांनी माझी निवड केली. माझ्यातील गुणांचे चीज झाले. मी माझ्या कामास पुरेपुर न्याय दिला व देत राहीन.

**– सौ. संगीता येवले (माजी मुख्याध्यापिका)**

❖ ❖ ❖

# एका शिक्षिकेची घडण

‘**य**शाचे मधूर चांदणे हवे असेल, तर प्रयत्नांचा चंद्र सतत वर्धिष्णू ठेवला पाहिजे.’

११ जून २०१२ हा माझा ‘स्व’-रूपवर्धिनीच्या शाळेचा पहिला दिवस होता. तो दिवस फार आनंददायी असा होता. मी बालवाडी शिक्षण प्रशिक्षण वर्गात प्रवेश घेत होते. हा अभ्यासक्रम करताना मला खूप छान अनुभव आले. मी शाळेत येण्यापूर्वी माझ्यात आत्मविश्वास आहे की नाही हे मलाच माहीत नव्हते. पण अभ्यासक्रम करताना हळूहळू असे वाटू लागले की, मी काही तरी करू शकते. आत्मविश्वास जागृत होत गेला आणि हे सगळे पुष्पाताईंमुळे घडले. मी एकटी असतानादेखील त्यांनी मला अभ्यासक्रमाला प्रवेश दिला. त्यांच्यामुळे आज मी आनंदाने जगत आहे. आणि मला जगण्यासाठी एक नवीन मार्ग मिळाला त्याचा अनुभव मी आज शिक्षिका म्हणून घेत आहे.

त्याचबरोबर माझ्या सहकारी शिक्षिकांनीसुद्धा मला खूप सहकार्य केले. माझ्या प्रत्येक अडीअडचणीला मला सर्व शिक्षकांनी खूप साथ दिली. आणि हे मी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत विसरू शकत नाही. मला लहान मुलांमध्ये रमण्यास फार आवडते. ‘स्व’-रूपवर्धिनीमध्ये प्रत्येक सण साजरे केले जातात. मुलांना प्रत्येक सणाची माहिती-गोष्ट सांगितली जाते. जुलै महिन्यातील आषाढी एकादशी या दिवशी विठ्ठल-रखुमाईची पालखी काढली जाते. बालशाखेचे रिंगण केले जाते. सर्वांना विठ्ठलाच्या मंदिरात नेले जाते. विठ्ठलाचे नामस्मरण केले जाते. यावेळी विठ्ठलाची आरती करण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले. दुसरा विशेष सण म्हणजे दिवाळी. इथे दीपोत्सव साजरा केला जातो. आणि मुलांना दिव्यांची गोष्ट सांगितली जाते. वर्गात दिवे सजवले जातात. रांगोळी काढली जाते.

त्याबरोबर गुरूपौर्णिमा, नागपंचमी, ध्वजवंदन, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जयंती निमित्त दहीहंडी असे विशेष दिन व उपक्रम साजरे केले जातात. शिक्षक दिनही साजरा केला जातो. तसेच गांधी जयंतीही साजरी केली जाते. विजयादशमीला पाटी पूजन केले जाते. कोजागिरी पौर्णिमा, लक्ष्मीपूजन साजरे केले जाते. मुलांना आकाश कंदील, शुभेच्छा पत्रे, खाऊ देण्यात येतो.

तसेच २१-२२ डिसेंबर २०१२ या दिवशी बालमेळावा साजरा करण्यात आला. मेळाव्यामध्ये प्रत्येक वर्गात भाषा, गणित, विज्ञान, जीवन-व्यवहार यांची मांडणी खूप छान पद्धतीने केली होती. चित्रकलेमध्ये वेगवेगळी चित्रे, बाटीक काम, ठसे काम असे सर्व मांडले होते. तसेच चित्र रंगवणे, ब्रेसलेट बनवणे, भिजवून ठेवलेल्या शाडूच्या मातीने वेगवेगळ्या वस्तू बनवणे हेही चालू होते.

वर्गामध्ये मुलांना खूप छान पद्धतीचे शिक्षण दिले जाते. सकाळी ९ वाजता शाळा सुरू होते. ९.३० वाजता प्रार्थना, श्लोक, भजन, शुभंकरोती अशी प्रार्थना घेतली जाते. वाराप्रमाणे पाठ घेतले जातात. वेगवेगळे खेळ घेतले जातात. मुलांमध्ये शाळेची आवड निर्माण केली जाते. संस्कृत, इंग्रजी या

भाषांची तोंड ओळख करून दिली जाते. बालवाडीमध्ये मुलांसाठी वेगवेगळे विषय घेतले की, मुलांना शाळेची आवड आपोआप निर्माण होते, हे मला यातून समजले.

प्रत्येक शिक्षिकेची शिकविण्याची पद्धत मला इथे अनुभवण्यास मिळाली. या अनुभवानेच मी आज 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये शिक्षिका म्हणून काम करत आहे, याचा फार अभिमान वाटतो.

**– सौ. अपर्णा आढाव (बालवाडी शिक्षिका)**

❖ ❖ ❖

मोठ्या गटातील सुमारे ११० विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम ८ एप्रिल २००८ रोजी संपन्न झाला. शुभेच्छा कार्यक्रमाला बहुतेक विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. आपल्या पाल्याला बालवाडीमध्ये मिळालेले संस्कार किती महत्त्वाचे आहेत याबाबत पालकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या....

- ❖ माझ्या नातीला आई नाही पण येथील सर्व शिक्षिकांनी तिला आईचे प्रेम दिले, तिची तशी काळजी घेतली. **(कु. अवंतिका गायकवाड हिचे आजोबा)**
- ❖ घरातील भांडणांमुळे अनेक दिवस मी माझ्या मुलाला शाळेत पाठविले नव्हते पण तो यायला लागल्यानंतर त्याच्या बाईंनी त्याला जवळ बसवून त्याचा अभ्यास करून घेतला. असं प्रेम त्याला आता नव्या शाळेत मिळेल का ? **(कु. प्रद्युम्न शिंदेची आई)**
- ❖ माझी धाकटी मुलगी या शाळेतून आता पहिलीसाठी दुसऱ्या शाळेत जाणार आहे. या बालवाडीमध्ये तिला जे संस्कार मिळाले ते खूप महत्त्वाचे आहेत. मला एका गोष्टीचे वाईट वाटते की माझ्या मोठ्या मुलीच्या वेळेस मला या बालवाडीची माहिती नव्हती आणि त्यामुळे मी तिला अन्य शाळेत पाठविले. **(श्री. खोत)**
- ❖ माझ्या मुलीच्या पायात दोष आहे. मी तिला या शाळेत दाखल केले तेव्हा ती स्वत: चालू शकत नव्हती. तिच्या अपंगत्वामुळे तिला अनेक ठिकाणी प्रवेश नाकारला गेला. या शाळेत प्रवेश तर मिळालाच पण येथील वातावरणामुळे तिच्या पायातील दोष खूप कमी झाला आहे. आज माझी मुलगी स्वत: जिने चढू-उतरू शकते आहे. वर्धिनीच्या वार्षिक उत्सवात तर तिला नाटुकल्यामध्ये महत्त्वाची भूमिका करायला मिळाली. **(कु. आत्मजा खेतकरची आई)**

❖ ❖ ❖

# विकसता विकसता विकसावे !

**'स्व'**-रूपवर्धिनीच्या 'पाकोळी' बालवाडीत मी मे १९९६ पासून रुजू झाले. त्यावेळी शिक्षिकांचे शिबीर होते. शिबीर खूपच आवडले व त्याचा उपयोग पुढील कामात मला चांगला झाला. शाळा सुरू होणार म्हणून पूर्ण वर्षाचे नियोजन, साधने, तक्ते इ. शिक्षिका स्वत: करत होत्या. हे मला खूपच भावले. शाळेतील मुले वस्तीतील असल्याने पालकांमध्ये व मुलांमध्ये नीटनेटकेपणा कमी होता. पण शाळेवरील प्रेम व विश्वास ह्या गोष्टी मला पालकांच्या डोळ्यांत, वागण्यात दिसत होता आणि म्हणूनच माझ्यातील आई ही शिक्षिकेपेक्षा जास्त जागरूक राहून पालकांशी सतत संवाद करत असे. माझ्या आवडीचे काम मिळाल्याने मुलांना शिकवताना सतत वेगवेगळे प्रयोग करत मी ही शिकत गेले व वर्धिनीचे स्वयंविकसनाचे विचारसूत्र अनुभवले. मी बरेच वर्षे मोठ्या गटात काम केले. ह्या मुलांच्या मोठ्या होण्याबरोबर परिपक्वतेबरोबर माझी चित्रकला, गोष्टी सांगण्याची, कविता करण्याची आवडही वाढत गेली.

वर्धिनीत नवीन, चांगल्या व उपयुक्त विचारांचा-उपक्रमांचा नेहमी आदर केला जातो. यातून आषाढी एकादशीच्या पालखीबरोबर देवळात 'बालांचे कीर्तन' हा उपक्रम सातत्याने होत आहे. त्यामुळे माझ्याकडून दरवर्षी पाणी, प्रदूषण, आरोग्य अशा विषयांवर कीर्तन लिहिले गेले. बालशाखेची दिंडी करूयात असे ठरल्यावर माझ्या यजमानांनी वयोवृद्ध वारकरीबाबांकडून सर्व माहिती नीट घेऊन मला मदत केली. प्रत्येक चौकाचौकात मुलांचे रिंगण सादर होताना खूप आनंद होत असे. त्यामुळे ही मुले पुढे कधीही वारकरी संप्रदायाचा 'आपण सर्व एक आहोत' हा विचार विसरू शकणार नाहीत हा विश्वास वाटू लागला.

साप्ताहिक बैठकीत पुष्पाताई विषय मांडायच्या व त्यावर सर्व शिक्षिकांचे विचार ऐकून नवीन उपक्रम घेतले जायचे. हे विचार नाटक, प्रकल्प, अभिनय गीत किंवा स्तोत्रे अशा वेगवेगळ्या माध्यमातून मुलांपर्यंत पोचवले जायचे. आम्हा प्रत्येक शिक्षिकेच्या तोंडी ''माझी मुलं हे निश्चित चांगलंच करणार'' हे वाक्य असायचे. त्यामुळे सर्व ताईंच्या चढाओढीत पण एकीने मुलांबरोबर पाकोळी बालवाडीही उत्कर्ष साधत होती.

वर्धिनीत 'संपर्क' या तंत्राचा खूप आग्रह असे. वर्गात गैरहजर असणाऱ्या मुलांच्या घरी आम्ही शिक्षिका शाळा संपल्यावर जात असू. मुलांच्या घरच्या परिस्थितीचे आकलन आम्हाला होत असे. पालकांशी सुसंवाद होत असे. त्यामुळेच आम्ही शिक्षिका, पालक व मुले बालवाडीत आलो; पण वर्धिनीचे वर्धक, कार्यकर्ते कसे होऊन गेलो, ते मला पण समजले नाही. माझ्या यजमानांच्या आजारपणात वर्धिनीने मला खूप मदत, तसेच मानसिक उभारीही दिली. या स्वानुभवातून छोट्या

सागर पोटेचे ऑपरेशन झाले म्हणून खाऊ घेऊन मी भेटायला गेले; तेव्हा त्याच्या व पालकांच्या डोळ्यात मला दिसलेले प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही.

मोठ्या गटाच्या पालकांनी मुले पहिलीला दुसऱ्या शाळेत जाणार म्हणून मोठ्या गटाच्या शिक्षिकांना भेटवस्तू देण्याचे ठरवले. तेव्हा मी त्यांच्यापुढे विचार मांडला की, 'तुम्ही शाळेसाठी मुलांच्या उपयोगी पडणारी वस्तू द्या. तिचा उपयोग आम्ही सर्व शिक्षिका करू.' त्यांनाही हा विचार पटला व त्यांनी पूजेचे साहित्य शाळेला भेट दिले. नंतर मी खूप वर्षे पुष्पाताईंची सहकारी म्हणून कार्यालयात व नंतर मुख्याध्यापक म्हणून काम केले. आता रोज मुलांबरोबर होणारा संवाद सुटला म्हणून प्रथम हिरमुसले. पण यामुळे माझ्यातील सुप्तगुणांना अजून वाव मिळाला. इतर सर्व शिक्षिकांना त्यांच्या कामात मदत करणे, नवीन उपक्रमांचे नियोजन करणे या गोष्टी सुरू झाल्या. बाहुलीचे लग्न, बोरन्हाण, छंदवर्ग, बालमेळावा, मुलांच्या सहली अशा अनेक उपक्रमांमुळे 'पाकोळी' बालवाडी सगळ्यांच्या मनात घर करून राहिली आहे. या सर्व उपक्रमात पुष्पाताई, शिक्षिका, सेविका सर्वजणी घरचे कार्य असल्याप्रमाणे काम करत. पुष्पाताईंचे व संस्थेतील मान्यवरांचे मार्गदर्शन, शिक्षिकांचे नियोजन आणि सगळ्यांची कष्ट करायची तयारी यामुळेच ही 'पाकोळी' १२ मुलांवरून ३२५ मुलांपर्यंत मजल गाठू शकली. यामध्ये काही मुले सर्वसाधारण नसतानाही त्यांना इतर मुलांप्रमाणे 'पाकोळी'ने शहाणे केले. त्यांचा आत्मविश्वास वाढवला. त्यांचे पालक याचे श्रेय वर्धिनीच्या बालवाडीला देतात.

शिक्षिका, सहकारी व नंतर मुख्याध्यापिका असा सर्व पदांवर काम करताना मला पण खूप आनंद व समाधान मिळाले आणि मला खात्री आहे 'पाकोळी' बालवाडीतून बाहेर पडणारी ही फुलपाखरे स्वच्छंदपणे स्वत:चा उत्कर्ष साधत सर्वांना आनंद देत विहरत राहतील.

**– श्रीमती स्वाती कारेकर**

❖ ❖ ❖

## तुम्ही तुळस कशी वाहिली ?

दर श्रावणी सोमवारी बालवाडीच्या एका गटाला परिसरातील शिवमंदिरात नेण्यात येते. गटावरच्या ताईंनी शिकविलेल्या गोष्टीतून कोणत्या देवाला काय आवडते हे मुलांचे पाठ झाले. एका सोमवारी यातून एक गंमतीचा प्रसंग घडला. परिसरातील एक महिला देवळात आली व तिने तिच्याजवळील तुळशीची पाने महादेवाच्या पिंडीवर वाहिली. बालवाडीतील एक विद्यार्थी त्या बाईंना म्हणाला, 'अहो, शंकराला बेल वाहतात. तुम्ही तुळस कशी वाहिली ? तुळस तर विठ्ठलाला वाहतात.' मंदिरातील सर्व उपस्थितांना हसू आले व या मुलाचे कौतुक वाटले. या देवळातील पुजाऱ्याने मग मुलांना बेल, तुळस यातील औषधी गुणांची माहिती खूप सोपी करून सांगितली व सर्वांना प्रसाद देऊन आनंद व्यक्त केला.

# वर्धिनीची साथसंगत

वर्धिनीतील प्रवासाची सुरुवात अर्थातच बालवाडीतून झाली. लहान वयात विचार करून वागायचं कळत नसतं. पण जे काही संस्कार होतात, ते आपोआप आपण आत्मसात करत जातो आणि माझ्यासोबतही तेच घडत गेलं. बालवाडीतील शिक्षक वर्ग, पुष्पाताई यांच्या संपर्कात राहून प्रवास सुरू झाला आणि मी खूप नवीन गोष्टी शिकत आणि त्याचबरोबर आत्मसात करत गेलो. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट बालवाडीमध्ये शिकलो ती म्हणजे स्वत:ची जबाबदारी म्हणजे स्वत:ची कामे स्वत: करायची. बालवाडीत सुरू झालेला प्रवास पुढे सरकून बालशाखेकडे वळला.

मग तेव्हापासून सुरू झाली ती अभ्यासाची जबाबदारी. ही तर गोष्ट आम्ही वर्धिनीकर सहज पेलू शकू एवढं छान सगळे मदत करणारी लोकं सोबत होती. फक्त अभ्यास नाहीतर खेळ आणि त्याचबरोबर मन शांत होण्यासाठी होणारी प्रार्थना या गोष्टी विसरून चालणार नाही. या सगळ्यात वर्धिनीच्या सहली आणि शिबिरे खूप काही आठवणी आणि शिकवण देऊन गेल्या. परत एकदा स्वत:ची जबाबदारी, व्याख्यानं आणि सर्वांसोबत एकत्र राहण्याची आणि नवीन गोष्टी शिकण्याची संधी. बालशाखेतून पुढे म्हणजे समर्थ रामकृष्ण शाखा प्रवासात मला अजून थोडं मोठं आणि जबाबदार बनवण्यासाठी होती. तिथे माझ्यापेक्षा थोड्या मोठ्या (वयाने) दादा आणि युवक यांच्यासोबत वेळ जाऊ लागला. यावेळी मी छोट्या छोट्या पण महत्त्वाच्या अशा गोष्टी शिकायला लागलो. अभ्यासवर्गामुळे अभ्यास, खेळामुळे क्रीडा क्षेत्रात प्रगती, शिबिरांमुळे स्वावलंबन, सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे आनंद आणि सामाजिक कार्यामुळे सामाजिक बांधिलकी आणि अजून खूप अशा गोष्टी की मी वर्धिनीत नसतो तर कधी शिकूच शकलो नसतो.

आज मी इन्स्ट्रुमेन्टेशन इंजिनियरिंगमधील पदविका नंतर ऑडिओ इंजिनियरिंगपर्यंत शिक्षण घेतलं आहे आणि आता एका कंपनीत ऑडिओ इंजिनियर म्हणून कार्यरत आहे. माझ्या या शैक्षणिक आणि नोकरी व व्यवसाय क्षेत्रात वर्धिनीचा नक्कीच मोठा वाटा राहिला आहे हे जरूर सांगावंसं वाटतं.

आता कामाच्या व्यापामुळे वर्धिनीच्या कामासाठी वेळ देता येत नाही पण जसं जमेल तसं संपर्कात नक्की असतो आणि राहीन. सगळ्या आठवणी अजूनही तशाच्या तशाच अजूनही मनात घर करून आहेत आणि त्या तशाच राहतील. मी आज माझ्या आयुष्याचा जेवढा प्रवास केला त्यात वर्धिनी वेळोवेळी मागे उभी राहिली. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या... आणि पुढेही राहील हा विश्वास नक्की आहे. वर्धिनीसाठी मी नेहमी काहीतरी करू शकेन असं वाटतं. संधी असेल तर मी नक्कीच त्यावेळी त्या गोष्टींसाठी तत्पर आणि उपलब्ध असेन एवढंच सांगतो. शेवटी वर्धिनीने जे काही दिलं त्यासाठी कृतज्ञ.

**– विराज गुंजाळ (माजी विद्यार्थी)**

## शाळा असावी घरासारखी

**मा**झा शाळेत शिक्षिका म्हणून प्रवेश झाला तो 'स्व'रूपवर्धिनीच्या शिक्षिका शिबिरापासून. हा आगळावेगळा उपक्रम मला पौष्टिक खाद्य देऊन गेला. अभ्यासक्रमातील निरनिराळ्या विचारांची उजळणी झाली. ही शिदोरी मला वर्ग घेताना खूप उपयोगी पडली. मान्यवरांच्या मार्गदर्शनाने आपण आपला वर्ग आनंदी, खेळकर ठेवू शकू, मुलांची अभ्यासाची भीती नाहीशी करून त्यांना याची गोडी लावू शकू हा आत्मविश्वास दृढ झाला.

शाळा असावी घरासारखी । नकोत नुसत्या भिंती ।।
तिथे असावा मोकळेपणा । अन् ज्ञानाशी नाती ।।

मुलांची अभ्यासाशी गट्टी व्हावी म्हणून सुरुवातीला होणाऱ्या प्रार्थनेस जास्त महत्त्व असते. ओंकार उपासना आमचे मन स्थिर करते, तर मुलांमध्ये नवचैतन्य निर्माण करते. या संस्कारक्षम वयात ही प्रार्थना चांगलीच रुजते. अन्य शिक्षिकांसोबत काम करताना त्यातून प्रत्येकाचे गुण आत्मसात करून कामाला सुरुवात झाली. 'आपला स्वत:वर विश्वास असेल, तर कितीही अवघड काम सोपे होते' हा शिबिरातून मिळालेला सकारात्मक विचार.

**– सौ. कविता गोसके (बालवाडी शिक्षिका)**

❖ ❖ ❖

## मीही विद्यार्थीच...

**१**० जून २०१३ हा माझा पाकोळी बालवाडीतील शिक्षिका म्हणून पहिला दिवस. 'खरी शाळा' सुरू होईपर्यंत मीही विद्यार्थीच होते. 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' ह्या माडगावकर सभागृहातील सुविचाराने माझे मन प्रसन्न व आनंदी झाले. सर्व शिक्षिका एकत्र बसून चित्रे रंगवीत होत्या. माझे नवीनपण पटकन विरघळून कसे गेले ते मला समजलेच नाही. शाळा सुरू होण्यापूर्वी 'शाळा सजावट' 'वर्ग सजावट' हा अनुभव मन प्रसन्न करणारा होता. कारण यात बाजारातून काहीही विकत न आणता आमचे सर्वांचे कलाकौशल्य पणाला लागले होते.

खरी शाळा सुरू झाली, १७ जूनला. शाळा भरायच्या आधी आमची उपासना झाली. यामुळे घरच्या सगळ्या गोष्टी विचार बाजूला सरले आणि त्यामुळेच आम्ही सगळ्याजणी नवीन मुलांच्या स्वागतासाठी उल्हसित झालो. नंतर रोजच सकाळी शाळेत लवकर येऊन उपासना करून वर्ग सुरू करणे माझ्या मनास, शरीरास ताजेतवाने करते असे वाटते.

शाळेच्या नित्य परिपाठात इथे साजरे होणारे सण विशेष आहेत. मुलांना सणांचे महत्त्व समजावे, आपल्या संस्कृतीचा त्यांना अभिमान असावा हे यामागील उद्दिष्ट आहे. शाळेत येताना वर्गापाशी प्रत्येक मुलाचे स्वागत होते. तसेच शाळा सुटल्यावर शिक्षिका दारापाशी मुलांचे पालक त्यांना नेत आहेत ना यांकडे लक्ष देतात. त्यामुळे पालकांशी रोजच संवाद आपोआप होतो, हे जास्त

भावले.

दर शनिवारी होणाऱ्या बैठकीतून आपल्या कामाचा आढावा घेतला जातो. शिक्षकांच्या विचारांच्या देवाण-घेवाणीतून स्वत:चे ज्ञान वाढते. श्रीमती पुष्पाताईंच्या मार्गदर्शनातून आपल्याला अजून कसे चांगले शिकवता येईल याचे मंथन होते.

वर्गातील रोजचे नवीन सुविचार, उपासना, साप्ताहिक बैठक अशा उपक्रमांनी मी बालवाडीत लवकर रमले आणि म्हणून वाटते,

''अशी स्वरूपवर्धिनी संस्था । कुठेही नाही दिसणार ।
मंगळवारातील स्व-रूपवर्धिनीचे नाव पुण्यात गर्जत राहणार.''

**– सौ. स्वाती तंटक (बालवाडी शिक्षिका)**

❖ ❖ ❖

## चौकट ओलांडताना

'**श्री** गणेशाय नम:' या वाक्याने सुरुवात करते. कारण माझ्या आयुष्यातील पहिल्यांदा बाहेर पडण्याची संधी ही मला 'स्व'-रूपवर्धिनीमुळे मिळाली आणि हे माझे भाग्य आणि गणेशाची कृपा असावी असे मी मानते.

'हेचि थोर भक्ती आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।।'

असे तुकाराम महाराज म्हणतात, असे माझे झाले आहे. संसाराची माया बाजूला सारून देवाची भक्ती करा. माझी भक्ती मला 'स्व'-रूपवर्धिनीत मिळाली कारण की माझे जीवन, माझा परिवार, माझी नाती आणि संसार इथपर्यंत सीमित होते. यापलीकडे मला दुसरे काहीतरी केलेच पाहिजे असे मला रोजच वाटायचे. म्हणून मीही कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले आणि आपण आता घरबसल्या काहीतरी करू शकू असे वाटले. पण तेसुद्धा मला शक्य झाले नाही. म्हणून काही दिवसांनी शिवणवर्गावर गेले. आता तरी आपण पुढे जाऊ शकू पण त्यातही मी काही कारणांनी मागे सरकले.

मी माझ्या मैत्रिणीला सारखी सांगायची की आता मला बाहेर पडून काहीतरी करायचे आहे. चार भिंतींच्या आत रहाणे शक्य होणार नाही. मला तुमच्या शाळेत संधी मिळेल का ?

शेवटी एक दिवस मला दूरध्वनी आला. तिने मला सांगितले की 'तू तुझी सगळी कागदपत्रे घेऊन शाळेत ये.' मी एक वाजता वर्धिनीत गेले. पुष्पाताईंना भेटले. अर्ज आणि कागदपत्रे त्यांच्याकडे दिली. पुष्पाताईंनी कागदपत्रे व अर्ज शांतपणाने पाहिले. त्या म्हणाल्या की तुला एक महिन्यात सगळे शिकून घ्यायचे आहे. तू उद्यापासून यायचे आहेस. हे ऐकून मला खूप आनंद झाला.

जसा एखादा पक्षी पिंजऱ्यात असतो आणि त्याला अचानक बाहेर काढल्यावर तो जशी आकाशात भरारी घेतो त्याप्रमाणे माझे झाले. हा पिंजरा म्हणजे मीच आखून घेतलेली माझ्या भोवतालची चौकट. ती ओलांडून मी 'स्व'-रूपवर्धिनीत आले.

४ सप्टेंबर २०१३ रोजी मी सकाळी शाळेत आले. मला असे वाटत होते की, 'काय लहान मुलांना तर शिकवायचे आहे.' पण लवकरच अनुभवास आले की, ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. पहिल्या दिवशी मी छोट्या गटावर गेले होते. त्या वर्गात मुलांचा वाढदिवस साजरा केला होता. वर्धिनीत त्यांना खाऊ आणि भेटवस्तू दिल्या. त्या मुलांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद होता. दुसऱ्या दिवशी मोठ्या गटावर गेले. मुलं माझ्याकडे बघत होती. त्यावेळेस गीताताईंनी सांगितले की 'ह्या तुमच्या नवीन बाई आहेत.' त्यावेळेस मुले म्हणाली की, 'ह्या आमच्या बाई नाहीत.' मग त्यांनी सांगितले की, 'ह्यापण तुमच्या बाईच आहेत.' कुणी कल्पनाही करू शकणार नाही अशी ही मुले हुशार होती. त्यांना प्रार्थना, भजने, गाणी, सामान्यज्ञान या सगळ्या गोष्टींची उत्तमरीत्या माहिती होती. गीताताईंनी मुलांना इतके छान तयार केले होते की सांगायला नको ! गीताताईंकडून मला शिस्त कशी लावायची, मुलांकडून गोडीत काम कसे करून घ्यायचे, मुलांचा अभ्यास कसा घ्यायचा हे शिकायला मिळाले.

वर्धिनीतील बालवाडीतील मुलं 'अथर्वशीर्ष' इतकं सुंदर म्हणत होती की ते ऐकून मला माझी लाज वाटली. आपण काय मुलांपुढे आहोत ! त्यासाठी मीही 'अथर्वशीर्ष' म्हणायला सुरुवात केली. यावेळेस घरी गणपती बसवून झाल्यावर मी पहिल्यांदाच 'श्री गणपती अथर्वशीर्ष' म्हटले. आमच्या घरात सर्वांना चांगले वाटले. हा माझा पहिला बदल 'स्व'-रूपवर्धिनीच्या बालवाडीमुळे झाला.

शनिवारचा दिवस म्हणजे मुलांना एकत्र करून एकच वर्ग घ्यायचा यामागचा उद्देश मला खूप आवडला. मुलांना एकत्र करण्याचा उद्देश म्हणजे मुलांमध्ये एकमेकांबद्दल प्रेम, मैत्री, जिव्हाळा व एकोपा निर्माण व्हावा हा आहे. याचा उपयोग हा मुलांना त्यांच्या आयुष्यात होणार आहे. कारण या गोष्टीची आपल्या देशाला कमालीची गरज आहे. 'स्व'-रूपवर्धिनीतील सर्व उपक्रमात देशहिताला प्राधान्य दिलं जातं. मुलांची पहिली आई म्हणजे घरातील आई व दुसरी आई म्हणजे पुष्पाताई आणि या शाळेच्या शिक्षिका.

'स्व'-रूपवर्धिनीत आल्यामुळे माझ्या जीवनाला एक शिस्तप्रिय वळण लागले आहे हे मी अभिमानाने सांगेन. 'स्व'-रूपवर्धिनीबद्दल माझा आदर असाच कायम राहील. 'स्व'-रूपवर्धिनीला वंदन.

**– सौ. अश्विनी महाडीक (बालवाडी शिक्षिका)**

❖ ❖ ❖



**चुकीबद्दल शिक्षा करता कामा नये. चूक समजावून सांगावी. शिक्षेमुळे मुलांची मानसिकता खचते.**

## दाभोळकरांच्या पावलांवर...

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची २० ऑगस्ट रोजी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. श्री. दाभोळकरांनी राज्यात अंधश्रद्धा आणि बुवाबाजीच्या विरोधात प्रखर आंदोलने केली. त्यावर 'ऐसे कैसे झाले भोंदू', 'लढे अंधश्रद्धेचे', 'विवेक जागर', 'भ्रम आणि निरास' इ. पुस्तके पण लिहिली. त्यांच्या कामाची व्याप्ती मोठी होती. हेच काम छोट्या प्रमाणात असेल कदाचित; पण 'स्व'-रूपवर्धिनीतून केले जाते. आमच्या परिचारिका वर्गाच्या विद्यार्थिनी गणपती व नवरात्र उत्सवात अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री सक्षमीकरण व वेगवेगळ्या सामाजिक विषयांवर पथनाट्य सादर करून समाजात जागरूकता निर्माण करतात. आम्ही सर्वजणी बालवाडी शिक्षिकांसह आमच्या पालकवर्गामध्ये व आमच्यातही जर अशा काही समस्या दिसल्या तर आम्ही त्या सोडवण्याचा नक्कीच प्रयत्न करतो. अगदी आमच्यापासूनच ही सुरुवात केली आहे.

छोट्या गटातील 'राणी'. तिला नीट बोलता येत नव्हते. शिक्षकांनी तिच्या पालकांशी वारंवार संपर्क साधला, तरी ते प्रतिसाद देत नव्हते. तिला देवाचा काहीतरी त्रास आहे, असे ते सांगत होते. शेवटी 'स्व'-रूपवर्धिनीने दीनानाथ रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधला. तिची सर्व माहिती त्या डॉक्टरांना दिली. तिची केस समजून घेऊन त्यांनी तिला तपासले असता त्यांच्या असे लक्षात आले की तिच्या स्वरयंत्रात थोडी समस्या आहे. मग तिच्यावर थोडा औषधोपचार केला आणि ती छान बोलायला लागली.

अडीच वर्षाची छोटी 'सिद्धी'. २०१२ ते १३ या वर्षी छोट्या गटात माझ्या वर्गात होती. जन्मापासून तिचे डोक्यावरचे केस तसेच होते. (तिचे जावळ काढले नव्हते). त्यामुळे त्या केसांची जट झाली होती. तिला त्याचा खूप त्रास व्हायचा. ती खूप डोके खाजवायची. तिला डोक्यावरून आंघोळ घातली, तरी तिचे केस लवकर वाळायचे नाहीत. त्यामुळे तिच्या डोक्याचा खूप वास यायचा. तिच्या आईला मी खूप वेळा सांगितले की हिचे केस कापा. त्या म्हणाल्या की, 'बाई ! तिचे जावळ काढायचे आहे तुळजापूरला जाऊन. पण पैशाची सोय होत नाही.' मी त्यांना म्हणाले की 'तुम्ही इथे जावळ काढा आणि जेव्हा तुळजापूरला जाल तेव्हा तिला बरोबर घेऊन जा.' पण त्या म्हणाल्या, 'माझ्या सासूबाई, मुलीचे वडील ऐकत नाहीत.' मी त्यांना म्हणाले, 'तुम्ही त्यांना शाळेत आणा. मी त्यांना समजावून सांगेन.' पण त्या काही ऐकत नव्हत्या. शेवटी मी पुष्पाताईंना, मेघाताईंना सांगून ती मुलगी दाखवली. तिच्या आईशी भेट घालून दिली. त्यांनी पण समजावून सांगितले. मग त्यांनी इथेच तिचे जावळ काढले. नवरात्रात त्या तुळजापूरला गेल्या तेव्हा त्यांनी ते केस बरोबर नेले. पण त्यानंतर सिद्धीमध्ये खूप बदल दिसला. खूप बारीक दिसणारी सिद्धी एकदम टवटवीत, छान दिसायला लागली. सगळा डबा खायला लागली. वर्गामध्ये आनंदी राहायला लागली. शांत शांत राहणारी, सर्व मुलांमध्ये मिसळायला लागली. छान बोलायला लागली.

**– सौ. अनुराधा वखारकर (बालवाडी शिक्षिका)**

# वर्धिनीचे माझ्या जीवनातील मोल

१९९० चा मार्च महिना. प्रथमच 'स्व'-रूपवर्धिनीच्या इमारतीत प्रवेश केला. २००६ पर्यंत रोज जातच होते आणि त्याचा मला कधीही कंटाळा आला नाही. त्या वास्तूत प्रवेश केला व किशाभाऊ पटवर्धनसरांनी अगदी आपुलकीने व प्रेमाने स्वागत केले. त्या स्वागतामुळे मला तेथे मी आजच आले असे वाटलेच नाही. हे ठिकाण जणू माझ्या पूर्ण परिचयाचे असेच वाटले.

सरांनी खूप गप्पा मारल्या. इमारत पूर्ण दाखवली. पुढे आणखी बांधकाम होणार आहे, ते सांगितले. मग मला विचारले, 'आता सांगा काय काम करणार ?' मी बालवाडीला मान्यता दिली. सरांना विचारले, 'उद्यापासून येऊ का ?' सर म्हणाले, 'आता थांबला तरी हरकत नाही.' मी नियमित वर्धिनीत जाऊ लागले. आधी बालवाडी नंतर वाचनालयात थांबायची. तेथे पुस्तकांना कव्हर घालणे, नंबर चिकटवणे, पुस्तके क्रमवार लावणे ही कामे करीत असे. तेव्हा सुमंत बाई बालवाडीच्या वर्गात असत. लेले सर वाचनालयाचे थोडा वेळ काम बघत. ह्या कामामुळे खूप आनंद मिळू लागला.

मी जेव्हा वर्धिनीत सुरुवातीला गेले तेव्हा पुष्पाताई कुठल्यातरी परीक्षेमुळे येत नव्हत्या. त्यामुळे त्यांची भेट नंतर झाली. हळूहळू मी बालवाडीत पूर्ण रमले. पण माझ्याकडे बालवाडी शिक्षिकेचा दाखला नव्हता. त्यानंतर मी बाहेरून बालवाडी कोर्स केला. तेव्हा 'स्व'-रूपवर्धिनीत बालवाडी कोर्सचे वर्ग नव्हते. बालवाडी शिक्षिका म्हणून दाखला मिळाला. तो पुष्पाताईंनी बघितला व मला एक वर्ग दिला. तोच वर्ग मी शेवटपर्यंत सांभाळत होते. तो होता छोटा गट.

बालवाडीत वर्षभर अनेक कार्यक्रम असत. संक्रांतीनंतर वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम होत असे. त्याची तयारी डिसेंबर महिन्यात सुरू होत असे. मुलाकडून करून घेताना खूप मजा येत असे. मुलांची मनधरणी करावी लागे. नवीन कपड्याचे आमिष दाखवले की ती खूष होत. काही मुले चक्क नकार देत. कार्यक्रमासाठी कधी गणपती स्तोत्र, पसायदान, मारुतीस्तोत्र, रामरक्षेतील काही श्लोक. एकदा तर गीतेतील १२ वा अध्याय पाठ करून घेतला होता आणि मुलांनी उत्तम प्रकारे सादर केला. नागपंचमी, रक्षाबंधन, गणपती, गोकुळाष्टमी, दसरा, दिवाळी इत्यादी सण साजरे करत. सगळ्यात सुंदर म्हणजे ज्ञानेश्वरांचा पालखी सोहळा. शाळेपासून कण्वाश्रमापर्यंत मिरवणूक काढतात. विठोबा, रुक्मिणी, ज्ञानेश्वर, तुकाराम, टाळ वाजविणारे, केशरी पताका घेतलेले वारकरी व डोक्यावर तुळशीची कुंडी घेतलेल्या मुली असे छान कपडे घालून येत. प्रत्येक चौकात रिंगण करत. ते पाहण्यासाठी रस्त्याने बरीच गर्दी होते. असे प्रत्येक सण उत्साहाने साजरे होत. मुलांच्या बुद्धिमत्ता वाढीसाठी अनेक उपक्रम राबविले जातात.

सुरुवातीला वर्गाशेजारीच मुलांसाठी रोज दूध व आठवड्यातून खिचडी करण्याची सोय होती. सेविकांना दूध नीट करता येत नसे. त्यावर लक्ष देणे, खिचडी कशी करतात हे बघणे व त्यांना थोडी

मदत करणे हे मला करावे लागे. दिवाळीच्या सुट्टीच्या आधी मुलांना एक मेजवानी मिळे. आम्ही सर्वांनी पुरी, भाजी व शिरा देण्याचे ठरविले. मुले जेवावयास बसली. आमचा अंदाज चुकला. पुष्पाताईंच्या घरून जेवढे पीठ होते ते आणले व पुऱ्या केल्या. अशी मुलांनी आमची फजिती केली. पण खूप आनंद झाला. बालमेळावा भरतो तेव्हा तर खूपच मजा येते. आठ दिवस आधीपासून तयारी करावी लागते. कामाची वाटणी, कोण कुठला विभाग सांभाळणार, मांडणी कशी करायची, हे सर्व करून तो दिवस छान साजरा होई. एकदा तर आदल्या दिवशी तयारी करताना रात्री ११-११।। वाजून गेले. पण सकाळी ७ वाजताच मी व मृणाल हजर झालो.

वर्धिनीमुळे मला खूप फिरायला मिळाले. श्री. गिरीश प्रभुणे यांच्या यमगरवाडीच्या फासेपारधी मुलांच्या निवासी आश्रमात जाता आले. फारच छान काम चालले होते. मी माझ्या मोठ्या मुलाकडून आश्रमातील मुलांसाठी चपला व ब्लँकेटची देणगी दिली. आमची एक वार्षिक सहल होते. वर्धिनीच्या गाडीतून अष्टविनायक, कोसबाड, पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर, गणपतीपुळे, पावस व चिपळूण वगैरे ठिकाणी गेले. मुलांच्या सहली होत, शिबीरं भरत, त्यांना पण जात होते. २००३ मध्ये वर्धिनीचे रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून मोठे शिबिर भरले होते. त्याला पण गेले होते. अचानक खूप पाऊस, वादळ आले. तंबू पडले. पण कार्यकर्त्यांनी न डगमगता ते शिबीर छान पार पाडले.

मला 'स्व'-रूपवर्धिनीने खूप आनंद व समाधान दिले. माझी पात्रता नसतानासुद्धा मी एक कर्तृत्ववान कार्यकर्ती असल्यासारखे सर माझ्याशी वागले. मला कधीच मी कमी असल्याची जाणीव करून दिली नाही. माझ्या कानाचा काही प्रॉब्लेम होता. सरांनी स्वत: मला त्यांचा विद्यार्थी असलेल्या प्रसिद्ध घैसास डॉक्टरांकडे नेले होते. त्यांना मी कधीच विसरू शकत नाही. पुष्पाताईंनी तर मला त्यांच्या आईचीच जागा दिली. एक सुंदर साडी दिली. बालवाडीचा कुठलाही कार्यक्रम असो किंवा काही खरेदी, समस्या असोत त्या सर्वांना एकत्र करून सल्ला घेत. कधी उदास असले तर लगेच जवळ बसून विचारीत व चांगला सल्ला देत असत. माझ्या आयुष्यातील १७ वर्षे खूप आनंदात व सुखात गेली. शरीराने साथ दिली असती तर अजूनही वर्धिनीत रोज गेले असते. हे सगळे भाग्य मिळवून देणाऱ्या व्यक्तीच्या नावांचा उल्लेख केलाच पाहिजे. माझ्या मुलाचा मित्र विजय भांबुरकर, यानेच मला सरांपुढे नेऊन उभे केले. त्यामुळेच मी हे सुख मिळवू शकले.

पुष्पाताईंचे सहकार्य, किशाभाऊंचा आधार, पुढे पुढे चालले ती वाट, घेतली नाही माघार.
ग्रंथालय, कार्यालय, बालवाडी शिक्षिका अशी अनेक जबाबदारी सोपवली वर्धिनीने,
मी तिची लेक, देवाची देणगी म्हणून आले वर्धिनीत.
मला नाही काही मूल्य आयुष्याच्या वाटेवर, वर्धिनीचा वाटा खूप, तोच आहे अमूल्य, अमूल्य...

**– श्रीमती कमल टाककर**

❖ ❖ ❖

## माझी इच्छापूर्ती

२००९ मध्ये बालवाडी शिक्षिकेचा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर नोकरी करायची असे मनात ठरवले. घरातून फारसे प्रोत्साहन नसतानाही मी मात्र अर्ज टाकायला सुरुवात केली. आयुष्यातली पहिली मुलाखत वर्धिनीत झाली. मनात थोडीशी भीती होती. पण प्रत्यक्ष भेटीत स्वातीताई व पुष्पाताईंशी प्रश्नोत्तरांतून छान गप्पा झाल्या. बाहेर पडताना आपली इथे निवड निश्चित होईल असे वाटत होते आणि माझी निवड झाल्याचा निरोप वर्धिनीतून आला. माझ्या आयुष्यातला हा सर्वात आनंदाचा क्षण होता. घरातली सगळी कामे आवरून मी शाळेत गेले. आज शिक्षकांची बैठक होती. संपूर्ण वर्षातल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांचे नियोजन, शिक्षकांची वर्गनिश्चिती असे अनेक विषय या बैठकीत झाले. पुष्पाताईंनी सर्वांशी माझी ओळख करून दिली. या ओळखीने माझ्या मनावरील नव्याचे दडपण लगेचच दूर झाले. श्यामलाताईंबरोबर आठ दिवस मी मधला गट घेतला. पण नंतर एकटीनेच वर्ग सांभाळताना थोडी धांदल उडाली. हळूहळू वर्गात मुलांबरोबर, शिक्षिकांबरोबर मी ही रुळले. ह्या बालवाडीची सुरुवात कशी झाली ? हे शिक्षिकांकडून मला समजले. लहानशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर करण्यासाठी पुष्पाताईंनी खूप कष्ट घेतले. तेही आनंदाने आणि जिद्दीने. आज आम्ही या वटवृक्षाच्या छायेखाली उत्साहाने, आनंदाने वावरत आहोत. नवनवीन गोष्टी, उपक्रम शिकत आहोत.

त्यांचा आदर्श समोर ठेवून मी माझ्या वर्गातील मुलांना सुसंस्कारित करण्याचा, चांगल्या गोष्टींचे ज्ञान देण्याचा प्रयत्न करते. खरं तर मोठ्या मुलांपेक्षा छोट्या मुलांना घडवणे अवघड असते. प्रत्येक मूल हे वेगळेच असते. त्याला समजून घेऊन शिकवणे हळूहळू जमत गेले. संपर्क, सुसंवाद हे तर वर्धिनीचे मर्म. मुलांबरोबर पालकांशीही संवाद, संपर्क वाढला. त्यामुळे शिकवता शिकवता मीही बालवाडीत रमून गेले.

मुलांना आईबाबांपेक्षा शाळेतल्या ताई जास्त जवळच्या वाटतात. मुलांच्यात रमल्याने मुले घरातल्या गोष्टी, स्वतःच्या गोष्टी मला सांगू लागली. आठवणीने फुलं, गजरा आणू लागली. 'ताई, मी तुम्हाला साडी घेणार आहे', 'ताई, मी तुम्हाला घरी जेवायला बोलाविणार आहे', 'ताई, आम्ही गाडी घेतली', 'ताई, आमच्या घरी आज भांडणं झाली,' अशा अनेक गप्पा मुलांबरोबर होऊ लागल्या. त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव, डोळ्यातला विश्वास बघून आपण त्यांचेच होऊन जातो. बालवाडी बरोबर वर्धिनीत होणाऱ्या इतर उपक्रमातून आपल्याला सतत शिकायला मिळते, चांगले अनुभवायला मिळते. वर्धिनी ही संस्था नसून एक कुटुंब आहे. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा पण उद्दिष्ट मात्र एकच, 'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे.' अशा संस्थेत काम करायला मिळाले हे माझं भाग्यच आहे.

**– सौ. गीता बोधे (बालवाडी शिक्षिका)**



दुसऱ्याचे ऐकणे, समजावून घेणे हा शिक्षणाचा प्रभावी मार्ग असतो.

## उर्जेचा स्रोत

'**बा**लपणीचा काळ सुखाचा, आठवतो मज घडी घडी' असे कवीने म्हटले आहे. मीही माझ्या बालपणीच्या व त्यानंतरच्या शाळेच्या आठवणीत रमून जाते. जर तुम्हाला या बालपणीच्या निरागसतेचा आनंद लुटायचा असेल तर तुम्ही वर्धिनीच्या 'पाकोळी' बालवाडीत जरूर या.

'Kinder Garten' किंवा 'बालवाडी' किती सुंदर शब्द आहेत ! फुलांची बाग तशी बालकांची बाग ! तसेच सुंदर, नाजूक, टवटवीत आणि रंगीबेरंगी वातावरण आमच्या पाकोळीत दिसेल. वर्गांना नावेही 'गुलाब', 'सूर्यफूल', 'लिली', 'चाफा' अशी मन उत्साहित करणारी. अडीच वर्षांपासूनची छोटी बालके कधी कडेवरून, कधी चालत शाळेत येतात, बोबडे बोलतात, त्यांचे बोलणे ऐकण्यात गंमत वाटते.

आमच्या सर्व ताई मुलांशी समजुतीने आणि प्रेमाने वागतात. इथे सर्वांना भरपूर खेळणी, उत्तम शिस्त, प्रेमळ व मोकळे वातावरण अनुभवता येते. मुलांना दिला जाणारा खाऊ साधा पण पौष्टिक असतो. मुलांच्या विकासासाठी जे जे करता येईल ते ते इथे केले जाते. वर्धिनीतील व बाहेरील सर्व मुलांसाठी इथे 'बालमेळावा' असतो. सर्व शिक्षिका अतिशय मेहनत घेऊन विषयानुसार साहित्याची मांडणी करतात. मेळाव्यात प्रत्येकाला प्रत्यक्ष कृतीतून अनुभव दिला जातो. अनेक उपक्रमांनी समृद्ध अशी ही बालवाडी आहे.

मीही दिवसेंदिवस इथल्या कौटुंबिक वातावरणात रमून गेले आहे. मी संगीताचा तास घेते. नवनवीन गाणी इथल्या शिक्षिकांना शिकवताना वेगळाच आनंद मिळतो. इथे 'राष्ट्रावर प्रेम करा, राष्ट्राचा अभिमान धरा, इतिहास स्मरा' ही शिकवण दिली जाते, जी अतिशय मौलिक आहे. अशा वातावरणाचा आपल्या पाल्यांना उत्तम लाभ होतो, याचा पालकांना खूप आनंद व अभिमान वाटतो. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे' अशी जगण्याची उर्जा मला या वातावरणातून मिळत राहते.

**– श्रीमती नीला गुळवणी (संगीत शिक्षिका)**

❖ ❖ ❖

## शिक्षणाचे महत्त्व

मला दोन मुली व एक मुलगा. ही तिन्ही मुलं 'पाकोळी' बालवाडीत शिकली. घरी मोठा परिवार आणि माझा रिक्षाचा धंदा. पण काटकसरीत संसार केला. वर्धिनीतल्या सर्व उपक्रमांमध्ये पालक म्हणून भाग घेतल्याने मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व मला समजले. मुलगा-मुलगी हा भेद न करता मुलींना पण शिक्षणात प्रोत्साहन दिले. आज सर्व मुलं पदवीधर आहेत. त्यांच्या यशात वर्धिनीचा वाटा मोलाचा आहे.

**– श्री. कडू (पालक)**

## आवाहन

विद्येचे माहेरघर म्हणून ख्याती असलेल्या पुणे शहरातही २५ वर्षांपूर्वी विकासाच्या दृष्टीने उपेक्षित राहिलेल्या पुण्याच्या पूर्वभागात अशी अनेक घरे होती, जिथे शिक्षणाचे महत्त्व पोहोचलेच नव्हते. १९८७-८८ मध्ये वर्धिनीच्या वास्तूचे बांधकाम चालू असताना त्याच्या समोरील बाजूस असलेल्या सेवावस्तीचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणातील निरीक्षणांनी तर या वास्तुच्या भोवतालीच अज्ञानाचा अंधार किती गडद आहे याची जाणीव झाली. बालवाडीत प्रवेश घेण्याच्या वयातील पण बालवाडीत प्रवेश न घेतलेली ५८ % मुलं या एका वस्तीत सापडली. या दाहक वास्तवानेच वर्धिनीच्या वास्तुतील पहिला प्रकल्प बालवाडीच्या रूपाने साकारला. गेल्या पंचवीस वर्षात ५५०० हून अधिक मुलांना 'पाकोळी' बालवाडीच्या अंगणातून शिक्षणाचे मोठे अवकाश दाखवता आले. आज परिस्थितीत खूप बदल झालेला जाणवतोय पण अजूनही समस्या संपल्या आहेत असे नाही.

आपला देशही आज बदलाच्या आणि विकासाच्या दिशेने वेगाने पुढे जाण्याच्या मनस्थितीत दिसतो आहे. अशा वळणावर एक पालक म्हणून, समाजातील एक जागरुक नागरिक म्हणून आपल्या प्रत्येकालाच विकसित देश घडविण्यासाठी हातभार लावता येईल. त्यासाठी आपल्याला आवाहन आहे की –

- ❖ जगातील सर्वात अधिक युवा लोकसंख्या असलेला देश अशी आपल्या देशाची ओळख होत असताना आपल्या देशातील युवा पिढी शिकलेली असेल याची काळजी समाज म्हणून आपण प्रत्येकाने घ्यायला हवी.
- ❖ त्यासाठी प्रत्येक मूल शिकेल याकडे आपण सर्वांनीच लक्ष द्यायला हवे आहे.
- ❖ जगातील अनेक प्रबळ देशांमध्ये आजही शिक्षण मातृभाषेतच दिले जाते. मातृभाषेतील शिक्षणामुळे आपली संस्कृती, आपली मूल्ये याचा वारसा पुढच्या पिढीकडे सहजपणे पोहोचविता येतो. मातृभाषेतील शिक्षणामुळे अनेक विषयातील संकल्पना समजायला सोपे जाते. परिणामतः मुलांवर नकळत येणारा मानसिक ताणही कमी होतो. म्हणून शिक्षण मातृभाषेत मिळावे असा आग्रह ठेवू या.
- ❖ ज्यांना शक्य आहे त्यांनी किमान एका गरजू मुलाच्या शिक्षणासाठी त्याचे पालकत्व स्वीकारावे. अशी मुले शोधणे आपल्याला शक्य नसेल तर वर्धिनीसारख्या ज्या ज्या संस्था प्रामाणिकपणे समाजातील गरजूंपर्यंत पोहोचून शिक्षणक्षेत्रात काम करीत आहेत त्यांच्या संपर्कात राहावे. अशा कामात सहभागी व्हावे.
- ❖ भाषा समृद्ध होण्यासाठी ती तशी आग्रहपूर्वक उपयोगात आणायला हवी. नवे ज्ञान, नवे तंत्रज्ञान मातृभाषेतून सुलभतेने कसे पोहोचवता येईल यावरही सातत्याने काम करायला हवे आहे.

# प्रार्थना

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।



हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।। ३ ।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास द्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।


'स्व'-रूपवर्धिनी